१५७०
म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. नं. १०१

# द ण्यां त

हि. ना. निबंध
मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें.
संग्रहालय/वाचनालय शाखा.
अनुक्रम नं. २५२ | विभाग निबंध | क्रमांक ४०
पुस्तकाचें नांव दवंडण्यांत
लेखक वि. स. खांडेकर
सूचना—पुस्तक आठ दिवसांवर ठेवूं नका पुस्तकाची खराबी करूं नका.
RFFBK-0006828

किंमत दोन रुपये

# चांदण्यांत

REFBK-0006828

वि. स. खांडेकर

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे

किंमत दोन रुपये

प्रकाशक :
रा. ज. देशमुख
देशमुख आणि कंपनी
१९१ शनिवार, पुणें २

प्रथम आवृत्ति १९४६
द्वितीय आवृत्ति १९४७

१ सर्व हक्क सौ. उषा खांडेकर यांच्या स्वाधीन आहेत.

२ मुखपृष्ठावरील व आंतील चित्रें श्री. दलाल यांचीं आहेत.

३ ब्लॉक डी. डी. नेरॉय यांनीं केले आहेत.

मुद्रक :
रघुनाथ अनंत मोरमकर
श्रीलक्ष्मी-नारायण प्रेस,
३६४ ठाकुरद्वार,
मुंबई नं. २

१९४७

प्रिय पुतणे

चि. राजाराम आठलेकर

आणि

चि. बापुराव भडकमकर

यांस सप्रेम अर्पण

# अनुक्रम


| | | | पृष्ठ |
|---|---|---|---|
| | चार शब्द:... | ... | ७ |
| १ | भांडण... | ... | १७ |
| २ | पुनर्जन्म | ... | २३ |
| ३ | तिसऱ्या वर्गाचा प्रवास | | २८ |
| ४ | एक तप | ... | ३४ |
| ५ | शिव्या ... | ... | ४१ |
| ६ | आपलीं पत्रें | ... | ४८ |
| ७ | दोन चित्रें | ... | ५४ |
| ८ | शास्त्रीय सत्य | ... | ५८ |
| ९ | संकेत ... | ... | ६२ |
| १० | स्मृति-चित्रें | ... | ६८ |
| ११ | रम्य आणि रम्यतम | | ७४ |
| १२ | झोंका ... | ... | ७९ |
| १३ | सुखाचा शोध | ... | ८४ |
| १४ | अर्पण-पत्रिका | ... | ८९ |
| १५ | रहस्य ... | ... | ९३ |
| १६ | गोवाऱ्यांच्या शेंगा | | ९८ |
| १७ | एक पैसा | ... | १०३ |
| १८ | चांदण्यांत | ... | १०९ |

पुढील प्रकाशन

वटपत्रें

वि. स. खांडेकर

म. ग्रं. सं. ठाणें.

६८२९

## चार शब्द

‘ चांदण्यांत ’ हा माझा दुसरा लघुनिबंध-संग्रह. या संग्रहांतले सर्व निबंध मीं १९३६–३७ सालीं लिहिले. त्या वेळीं आम्ही सात स्नेह्यांनीं ‘ जोत्स्ना ’ मासिक नुकतेंच सुरू केलें होतें. ‘ ज्योत्स्ने ’च्या प्रत्येक अंकांत ‘ हिरवा चांफा ’ या चालू कादंबरीच्या प्रकरणाप्रमाणें माझी लघुकथा अथवा लघुनिबंध येईल असें आम्हीं जाहीर करून चुकलों होतों. त्यामुळें प्रत्येक अंकासाठीं मला लघुकथा किंवा लघुनिबंध लिहावाच लागे. या संग्रहांतले अनेक लघुनिबंध असे गरजेच्या पोटीं जन्माला आले आहेत. मात्र एवढ्यावरून गरज ही कल्पकतेची आई आहे हें सुभाषित कलेला लागू पडतें अशी समजूत कुणी करून घेऊं नये. ‘ गरज ही कल्पकतेची आई आहे ’ असें म्हणणाऱ्या मनुष्याइतकाच ‘ गरजवंताला अक्कल नसते ’ हे उद्गार काढणारा सद्‌गृहस्थही शहाणा होता !

‘ ज्योत्स्ने ’साठीं नियमितपणें लिहावें लागल्यामुळें मला हे निबंध सुचत गेले असें मुळींच नाहीं. साहित्याच्या क्षेत्रांतही कच्चा माल पिकविणें आणि त्याच्यापासून पक्का माल तयार करणें असे दोन निरनिराळे कारखाने असतातच कीं !

लघुनिबंधांच्या नवनवीन कल्पना सुचण्याचा आनंद ' ज्योत्स्ने 'च्या जन्मापूर्वीच मीं मनसुराद लुटला होता. पण त्या कल्पनांपैकीं फारच थोड्या मीं कागदावर उतरविल्या असतील ! याचें कारण स्वभावत: मी आळशी आहें असें नाहीं. पण एखाद्या सुंदर कल्पनेचा पाठलाग करण्यांत किंवा एखाद्या नव्या विचाराच्या चिंतनांत गुंग होऊन जाण्यांत लेखकाला जो आनंद लाभतो तो त्या कल्पनांच्या अथवा विचारांच्या मूर्ती घडवितांना अनुभवाला येणाऱ्या आनंदापेक्षां मला अधिक सरस आणि उत्कट वाटतो. या स्वभावविशेषामुळें—तो स्वभावदोषही असूं शकेल—मी लेखनक्षेत्रांत चिरप्रवासी झालों आहें. त्याच त्याच आवडत्या कल्पनांचें, भावनांचें अथवा वाङ्मय-गुणांचें कुटुंब करून त्यांत वर्षानुवर्षें रमून जाणें मला कांहीं केल्या जमत नाहीं. साहित्यिकांत सावकार आणि सट्टेबाज असे दोन वर्ग मानले, तर माझी बहुधा दुसऱ्या वर्गांत गणना होईल. नवीन लेखन करतांना आपलें भांडवल सुरक्षित रीतीनें गुंतवून त्याचें निश्चित किती व्याज येईल हा हिशेब करण्याची प्रवृत्ति माझ्यामधें फार कमी आहे. कोणत्या का कारणानें होईना, माझ्या मनाला ज्यांचें आकर्षण वाटूं लागतें, असे अपरिचित विषय, विचार, कल्पना आणि तंत्रें यांच्याकडे माझें मन फार लवकर ओढ घेतें. त्यांचा व्यापार करण्याची इच्छा मनांत नेहमीं बळावते. या दृष्टीनें चंचल मनाच्या उतावळ्या मुलाशींच माझ्यांतल्या लेखकाचें अधिक साम्य आहे. असला मुलगा घरीं असला कीं शाळेची वेळ झाली म्हणून गडबड करूं लागतो ! शाळेंत वर्ग सुरू झाले कीं तो खिडकींतून बागेंतल्या फुलांकडे पाहूं लागतो. सुट्टींत तो बागेंत जातो खरा ! पण तें कांहीं फुलांचे रंग जवळून न्याहाळण्याकरतां अथवा त्यांच्या सुगंधानें आनंदित होण्याकरतां नाहीं ! तर फुलांवरून भुरुभुरु उडणारीं फुलपांखरें पकडण्याकरतां !

माझ्यांतल्या या चंचल अवखळ मुलाला ' ज्योत्स्ने ' मुळें थोडें नियमित काम करावें लागलें आणि ' चांदण्यांत ' हें पुस्तक निर्माण झालें. नाहीं तर त्यावेळच्या मला सुंदर वाटणाऱ्या इतर अनेक कल्पना जशा माझ्या मनांतल्या मनांत विरून गेल्या, तशीच ' तिसऱ्या वर्गाचा प्रवास, ' ' शिव्या, ' ' एक तप, ' ' संकेत, ' ' चांदण्यांत, ' ' अर्पणपत्रिका, ' ' एक पैसा ' वगैरे या संग्रहांतल्या अनेक निबंधांची स्थिति झाली असती. ' ज्योत्स्ने 'चा दर महिन्याचा तगादा मला

तेव्हां मोठा तापदायक वाटे. आमचे कार्यकारी संपादक ढवळे हे पगाराच्या दिवशीं गिरणीच्या दारांत उभे राहणारे शुद्ध पठाण आहेत असेंच मी मनांतल्या मनांत म्हणत असें! पण आतां राहून राहून वाटतें, 'ज्योत्स्ना' हें मासिक नसून पाक्षिक अथवा साप्ताहिक असतें तर किती बरें झालें असतें! 'चांदण्यांत'-सारखा आणखी एखादा लघुनिबंध संग्रह आपल्या हातून त्या वेळीं सहजासहजीं लिहून झाला असता.

होय. सहजासहजीं असेंच मी म्हणतों. असें म्हणतांना माझ्या डोळ्यांसमोर त्यावेळच्या अनेक आठवणी उभ्या राहत आहेत. दिवसभर शाळेचें काम करून घरीं परत आल्यानंतर माजघरांतल्या कॅलेंडरवरल्या तारखेकडे माझें लक्ष जाई. बापाचें भूत दिसल्याबरोबर हॅम्लेटची काय स्थिति झाली असेल याचा त्या क्षणीं मला चांगली कल्पना येत असे. ढवळ्यांनीं लघुनिबंध पाठविण्याकरतां नेमून दिलेली मुदत उद्यां संपत आहे हें लक्षांत येतांच शाळेचा शीण घालविणारा संध्याकाळचा चहा कांहीं केल्या मला गोड लागत नसे. दारांत सावकारानें धरणें धरल्यानंतर कर्जबाजारी कुळानें खिडकींतून पोबारा करण्याचा प्रयत्न करावा ना? तशी कांहीं तरी युक्ति माझें मन शोधूं लागे. वाटे, प्रकृति बरी नाहीं अशी ढवळ्यांना थाप मारावी ती थाप खरी वाटावी म्हणून हवी तर एक तार ठोकावी नि या महिन्याच्या कटकटींतून मुक्त व्हावें! मी खरोखरच आजारी आहें कीं नाहीं हें पाहायला वामनराव थोडेच मुंबईहून शिरोड्याला येणार आहेत!

पण थाप मारण्याची ही लहर थोड्याच वेळांत ओसरून जाई. घरासमोरच्या टेंकडीवर किंवा मैलभर दूर असलेल्या समुद्रतीरावर जाऊन मी बसलों कीं माझें मन हां हां म्हणतां प्रसन्न होई. मग मी स्वतःशींच म्हणें—दारांत सावकार धरणें धरून बसला असला आणि घरांत रोख पैसे नसले म्हणून काय झालें? दागिने तर आहेत ना घरांत? ठीक आहे! त्यांतला एखादा मोडून टाकूं नि—

टेंकडीवर, समुद्रतीरावर, सकाळ संध्याकाळ फिरायला जातां-येतांना, मध्यरात्रीं अचानक जाग आली असतांना किंबहुना शाळेच्या मधल्या सुट्टींत आरामखुर्चीत पडून विश्रांति घेत असतांनासुद्धां अनेक नवनव्या कल्पनांशीं मी स्वच्छंदानें खेळत असें. तेच हे माझे दागिने! या दागिन्यांतला कुठला मोडायचा हें रात्रीं अंथरुणाला पाठ लागेपर्यंत माझें मलाच नक्की ठरवितां येत नसे. ती निवड

करायचें काम मी खुशाल झोंपेवर सोंपवून द्यायचा ! सकाळीं सहा सातला उठून चहा घेऊन बाहेरच्या खोलींतल्या बैठ्या मेजाखालीं मांडी दुमडून मी बसलों कीं माझा लघुनिबंध सुरू होई. नवाला दुसरा चहा येईपर्यंत बहुधा तो लिहून पूर्ण झालेला असे !

× × ×

माझ्या लघुनिबंधांतल्या दोषांवर पांघरुण घालण्याकरतां त्यांच्या लेखनाचा हा इतिहास मी दिलेला नाहीं. कुठल्याही कलाकृतीचें परीक्षण करतांना तिला सर्वस्पर्शी सौंदर्यमूल्यांची कसोटी लावणें हेंच टीकाकाराचें काम आहे. ती कलाकृति कोणत्या परिस्थितींत निर्माण झाली हें पाहण्याची त्याला जरूरी नाहीं. सराफानें सोन्याचा कस पाहायचा असतो; त्यांत हिण कुठून आलें याच्याशीं त्याला काय कर्तव्य आहे ? म्हणूनच चांदण्यातल्या लघुनिबंधांची जी जन्मकथा मी वर दिली आहे, ती न्यायनिष्ठुर परीक्षकांकडे सहानुभूतीची याचना करण्याकरतां नाहीं ! तर या निबंधांत जे गुणदोष आहेत त्यांत माझ्या त्या कालच्या वाङ्मयीन व्यक्तित्वाचें बरेंवाईट पण स्वाभाविक प्रतिबिंब पडलें आहे एवढें नम्रतेनें त्यांच्या नजरेला आणण्याकरतां ! हें व्यक्तित्व घांसून पुसून किंवा नटवून सजवून प्रगट करावें अशी इच्छा माझ्या मनांत कधींच उद्भवत नसे, असा मात्र याचा अर्थ नाहीं. पण हा सारा थाटमाट करायला मला कधीं सवडच मिळाली नाहीं. ' हेतुपुरःसर केलेला कलाविलास ' असें माझ्या लेखनाचें नुकतेंच कुणी तरी केलेलें वर्णन मीं वाचलें. यापलीकडे जाऊन माझ्या वाङ्मयावर कृत्रिमपणाचा शिक्का-छाप मारणारे पंडितही मी पाहिले आहेत. परंपरागत वाङ्मयनिकष किंवा संकुचित आत्मनिष्ठेतून उत्पन्न होणाऱ्या पूर्वग्रहांचे चष्मे यांपलीकडे ही पंडित मंडळी परीक्षण करतांना सहसा पाऊल टाकीत नाहींत. एका लेखकाच्या लिखाणांत कृत्रिम वाटणारी एखादी गोष्ट दुसऱ्या लेखकाच्या लेखनांत अकृत्रिम रीतीनें येऊं शकते एवढें जरी मीं वर दिलेल्या हकीगतीवरून त्यांच्या ध्यानांत आलें, तरी माझे हे चार शब्द सार्थकीं लागले असें मी म्हणेन.

× × ×

मात्र आज-कालचे सारेच वाङ्मयपरीक्षक या चाकोरींतून जाणारे, परंपरागत मतांचा अवास्तव उदोउदो करणारे अथवा लेखकाचे गुणदोष

त्याच्या व्यक्तित्वांतून निर्माण होत असल्यामुळें व्यक्तिमनाची मीमांसा केली तरच लेखकाला पूर्ण न्याय देतां येणें शक्य आहे या टीकाशास्त्राच्या मूलतत्त्वाकडे दुर्लक्ष करणारे असतात असें नाहीं. प्रा. वा. ल. कुलकर्णी हे एक असेच सन्मान्य अपवाद असलेले तरुण टीकाकार आहेत. ते जसे रसिक व बहुश्रुत तसेच समतोल आणि चिकित्सकही आहेत. ' चांदण्यांत ' या संग्रहाची चिकित्सा करतांना ते म्हणतात:

'खांडेकरांच्या लघुनिबंधांचें स्वरूप कांहींसें कठिण पृष्ठभागावर उच्छृंखलपणें उड्या मारीत जाणाऱ्या रबरी चेंडूसारखें आहे. पहिला टप बसतांच चेंडू हवेंत उड्डाण मारतो व कांहीं वेळ तसाच हवेंत राहून खालीं येतो. तो कशासाठीं ? तर परत तितक्याच आवेशानें वर जाण्यासाठीं. अंगांत जोम आहे तोंपर्यंत तो असाच उड्या मारीत राहील व केवळ जोम संपला म्हणूनच जमिनीवरून थोडाफार सरपटेल. प्रत्येक टप्प्यागणिक तो जमिनीला शिवेल. तेवढाच त्याचा आणि भूमीचा संबंध. त्याचा अवतार खरोखर अंतराळांत संचारण्यासाठींच ! परंतु केवळ नाइलाज म्हणूनच हें भूमीशीं अधून मधून संमीलन. खांडेकरांच्या लघुनिबंधांतील उपमा-उत्प्रेक्षांची एक एक चढती कमान पाहिली म्हणजे वाचक तिचीं दोन्ही टोकें विसरूनच जातो व केवळ तिच्या वांकदार मनोहर आकृतीकडेच क्षणभर स्तिमित नेत्रांनीं पाहत राहतो. त्यांच्या कल्पनाशक्तीचा जोसाट वारा वाहूं लागला कीं विवेचित सिद्धांताचीं बीजें चुकून कोठल्या कोठें उडवून देण्याची शक्ति त्यांत असते. एखादें लहान मूल एखाद्या सुंदर बगीच्यांत सोडावें, या ताटव्यावरून त्या ताटव्याकडे त्यानें हर्षभरित अंत:करणानें बागडत बागडत हिंडावें, फुलांचे नयनमनोहर रंग, फुलपांखरांच्या रंगेल भराऱ्या, थुईथुई करीत वागडणारे कारंजाचे तुषार, गोड लुसलुशीत हिरवळ, या सगळ्यांनीं त्याला भुरळ पाडावी आणि भटकत भटकत त्यानें आपल्या निवासस्थानापासून लांववर जावें: मग चुकून मागें वळून पाहतांच त्याला आपण जेथून निघालों तें ठिकाण दिसण्याऐवजीं जर जिकडे तिकडे फुलें, पानें, आणि फुलपांखरेंच दिसलीं, तर त्यांत काय नवल ? लघुनिबंध लिहितांना खांडेकरांची स्थिति अशीच होते; व त्यांचे लघुनिबंध वाचतांना वाचकांचीही

स्थिति तीच होते. अगोदरच त्यांना कल्पनाविलासाची हौस; त्यांत लघुनिबंधासारखा लवचिक वाङ्मयप्रकार हाताळावयास मिळालेला. मग काय विचारतां? कल्पनांच्या कोलांटउड्या खात खात त्यांची लेखणी इकडून तिकडे वागडूं लागली कीं तिला भुई थोडी होते. या कोलांटउड्यांत मधूनच सुविचारांचे धक्के वाचकांना बसतात. ममतेचा ओलावा त्यांच्या अंगाला लागतो. परंतु हें सर्व कसें होतें तर तुटकपणें. विषयांतर होतें, तें इतकें कीं मूळ पदावर कथा आवयाला शेवटीं बरीच ओढाताण—लेखकाला व म्हणूनच वाचकांना करावी लागते—मग मीं असें म्हणतों, कीं कथा मूळपदावर आणण्याची जरूरी काय? लघुनिबंध हा एखाद्या झऱ्यासारखा असावा. एखाद्या खडकांतून तो अचानकपणें उगम पावतो: वाट फुटेल तसा तो धांवत जातो, मार्गांत एखादी नदी किंवा मोठा ओहोळ भेटला तर त्यांना तो मिळतो किंवा पाणी आटल्यामुळें अर्धेमर्धेंच जिरून जातो असेंच कां नसावें?

म्हणून खांडेकरांबरोबर 'चांदण्यांत' वावरतांना मला जेवढी मौज वाटते, तेवढेंच थोडेंसें चमत्कारिकही वाटतें. आपण नक्की कोठें चाललों आहोंत याची मला धड कल्पनाही येत नाहीं आणि या गोष्टीचा विसर पडण्याइतकें माझें मन प्रवाहाबरोबर वाहतही जात नाहीं. कल्पना आणि विचारशक्तीचा (उच्छृंखल) विलास असेंच मी खांडेकरांच्या लघुनिबंधाचें वर्णन करतों.'

प्रा. कुलकर्णी यांचें हें विवेचन अत्यंत सहानुभूतिपूर्ण आहे. त्याविषयीं मला कांहीं म्हणावयाचें नाहीं. त्यांच्या जागीं मी असतों तर या एका पानांत खांडेकराला चार दोन चिमटे घेतल्याशिवाय—निदान जातां जातां एखादा ओचकारा काढल्याशिवाय-माझें मुळींच समाधान झालें नसतें!

पण या विवेचनाच्या ओघांत कुलकर्ण्यांनीं लघुनिबंधाच्या स्वरूपाविषयीं जो एक महत्त्वाचा मुद्दा उपस्थित केला आहे त्याची रसिकांकडून चर्चा होणें इष्ट आहे असें मला वाटतें. ते म्हणतात 'मी असें म्हणतों कीं, लघुनिबंधांत कथा मूळपदावर आणण्याची तरी जरूरी काय? लघुनिबंध हा एखाद्या झऱ्यासारखा असावा. एखाद्या खडकांतून तो अचानकपणें उगम पावतो, वाट फुटेल तसा तो

धांवत जातो, मार्गांत एखादी नदी किंवा ओहोळ भेटला तर त्यांना तो मिळतो. किंवा पाणी आटल्यामुळें तो अधेमधेंच जिरून जातो. असेंच कां नसावें ?'

कांहीं कांहीं लघुनिबंधांचे शेवट फार कृत्रिम असतात आणि अनेकदां त्यांतून लेखकानें सूचित केलेलें तत्त्वज्ञान मोहरममधल्या वाघाच्या शेपटासारखें चिकटविलेलें वाटतें हें कांहीं खोटें नाहीं. फडक्यांसारखा रसाळ गुजगोष्टी लिहिणारा लेखकसुद्धां लघुनिबंधाचा एक ठराविक सांचा असला पाहिजे या कल्पनेला जिथें बळी पडतो, तिथें 'लघुनिबंध स्वभावतः स्वैर आहे. त्याच्या प्रकृतिधर्माप्रमाणेंच त्याचा विकास व्हावा. विषयसूत्र मूळपदावर आलें नाहीं म्हणून त्याचें सौंदर्य थोडेंच कमी होणार आहे ?' असे उद्गार कुलकर्ण्यांनीं काढावे यांत नवल नाहीं. उदाहरणार्थ फडक्यांची 'सहल' ही गोड गुजगोष्ट घेऊं. निरनिराळ्या वेळीं आणि निरनिराळ्या स्थळीं मनसोक्त भटकून लेखकानें जें आनंदभांडार संपादन केलें आहे, तें तो मोकळ्या मुठींनीं वाचकांवर उधळीत आहे, असेंच या निबंधाच्या पहिल्या वाक्यापासून वाचकाला वाटत राहतें. फिरायला जाणें ही सुद्धां वीणावादनाइतकीच एक मोहक कला आहे, आपल्याला मात्र हें आतांपर्यंत ठाऊक नव्हतें, अशी या निबंधाचा मध्यभाग वाचतांना त्याची खात्री होऊन चुकते. सहलीसारख्या प्रत्येकाला सुलभ असणाऱ्या साध्या गोष्टींत किती सौंदर्य भरलेलें असतें हें जणूं कांहीं त्या सौंदर्यावरला पडदा दूर करून लेखक आपल्याला दाखवीत आहे असा हा निबंध संपत आला म्हणजे वाचकाला भास होतो. पण निबंधाचा शेवटचा परिच्छेद सुरू होतांच आतांपर्यंत स्वैर कवि असलेला लेखक झटपट तत्त्वज्ञानी बनतो आणि 'आपली ही इहलोकांतील यात्रा म्हणजे देखील एक सहलच होय असें माणसानें मानावें म्हणजे तो सुखी राहील' असा त्यांना उपदेश करूं लागतो. हळदीकुंकवाकरतां हरतऱ्हेची आकर्षक वेषभूषा करून जमलेल्या तरुणींचा गांवाला गेलेल्या नवऱ्यावरून किंवा त्यांना लागलेल्या डोहाळ्यांवरून गोड थट्टा करतां करतां यजमानीणबाईनें त्यांना खादी वापरण्याचा उपदेश करायला सुरुवात करावी ना ? तसें कांहीं तरी हें वाटतें यांत संशय नाहीं. 'लघुनिबंधाचा शेवट त्याच्या आरंभाशीं जुळता असलाच पाहिजे हा हट्ट का ?' असें कुलकर्णी विचारतात याचें कारण त्यांना आम्हां सर्वांच्या निबंधांत दिसून येणारी असली कृत्रिम रचना हेंच असलें पाहिजे.

या कृत्रिमतेचें मूळ लघुनिबंधाचे प्रवर्तक फडके यांच्या या वाङ्मय-प्रकाराविषयींच्या एकांगी कल्पनेंतच आहे असें म्हणतां येईल. 'गुजगोष्टी'च्या प्रस्तावनेंत ते म्हणतात, 'चमत्कृति हा गुजगोष्टीचा आत्मा होय. ही चमत्कृति विषयाच्या निवडींत असावी किंवा त्यांत नसेल तर गोष्टीच्या ओघांत आणावी. म्हणजे असें कीं साध्यासुध्या गोष्टीविषयीं बोलतां बोलतां त्यांत अचानक एखाद्या मोठ्या तत्त्वावर प्रकाश पाडल्यासारखें करावें. या संग्रहांतील शेवटच्या 'सहल' या गुजगोष्टीची अखेर मीं याच धोरणानें केली आहे.' 'अचानक' 'मोठें तत्त्व' आणि 'प्रकाश पाडणें' या तीन्ही गोष्टी लघुनिबंधाच्या सहजतेशीं किती विसंगत आहेत! जातां जातां कुठल्याही तत्त्वावर सहज प्रकाश पडला तरच त्यानें लघुनिबंधाची खुमारी वाढू शकेल.

फडक्यांची चमत्कृतीची कल्पनाही अशीच सदोष आहे. चमत्कृतिजनक विषयांच्या दृष्टीनें त्यांनीं 'पाऊस' व 'जुनीं पुस्तकें' या आपल्या गुजगोष्टींचा मुद्दाम उल्लेख केला आहे. पण त्यांची पाऊस ही गुजगोष्ट सरस आहे हें मान्य करूनही तिच्यांत वाचकांना अपरिचित अशा सौंदर्याचें लेखकानें दर्शन करून दिलें आहे असें म्हणतां येईल काय? पर्जन्याच्या उच्छृंखल विलासांतलें सौंदर्य सर्वसामान्य मनुष्याला बोलून दाखवितां येत नसेल पण जगाच्या आरंभापासून तें त्याला जाणवत आलें आहे. शिवाय विषय जितका क्षुद्र, तितका त्याच्यावर आधारलेला लघुनिबंध श्रेष्ठ ही कल्पनाच मुळीं चुकीची आहे. लहान लहान दृश्यांशीं अथवा अनुभवांशीं समरस होऊन लघुनिबंधकाराची प्रतिभा क्रीडा करूं शकते हें खरें! पण त्याच्या या प्रतिभाविलासांत जो रंग भरतो तो त्याच्या स्वच्छंदानें फुलणाऱ्या व्यक्तित्वाचा असतो. 'छत्री,' 'चावी,' 'सिगारेट' किंवा 'फुकट आइस्क्रीम' या विषयावर जसा लघुनिबंध लिहितां येतो, तसे 'श्रावण,' 'मध्यरात्र,' 'ताजमहाल' किंवा 'हिमालय' हेही त्याचे विषय होऊं शकतात. लघुनिबंधाला रमणीयता येते ती क्षुल्लक अथवा उपेक्षित विषयांच्या निवडीनें, कृत्रिम तत्त्वज्ञानाच्या प्रदर्शनानें किंवा भाषेच्या आतषबाजीनें नाहीं. विषय कोणताही असो, लेखक 'पहा उघडिलें हृदयाला' असें म्हणून आपणाला बोलावीत आहे असें वाचणाराला वाटायला लागलें कीं लघुनिबंधाची भट्टी मनासारखी साधली असें खुशाल मानावें.

लघुनिबंधकार हा कवि असायला हवा, विनोदी लेखक असायला हवा आणि तत्त्वचिंतकही असायला हवा. पण यांतला कोणताही विशेष त्यानें केवळ शोभेसाठीं किंवा प्रदर्शनासाठीं वापरतां कामा नये. ‘ गुजगोष्टीच्या शेवटीं अचानक एखाद्या तत्त्वावर प्रकाश पाडल्यासारखें करावें ’ हें फडक्यांचें म्हणणें याच कारणामुळें रसभंगकारक ठरतें. लघुनिबंधकारानें असलेंच काय, पण दुसरें कुठलेंही नाटक करूं नये, कुठलेंही सोंग—मग तें पंडिताचें असो, तत्त्वज्ञाचें असो वा दुसरें कुठलेंही असो–त्यानें सजवून दाखवूं नये. तो जसा आहे तसाच वाचकांना दिसला, त्याच्या बोलण्याचालण्यांत बालकाची सरलता आहे अशी त्याची खात्री झाली, म्हणजे त्यांचें त्याच्यावर आपोआप प्रेम जडतें.

× × ×

रिचर्ड किंग किंवा काणेकर यांच्यासारखे कांहीं लघुनिबंधकार विचार-प्रवर्तनाच्या भूमिकेवरूनच लिहीत असतात. तत्त्वदर्शन हाच त्यांच्या निबंधांचा आत्मा असल्यामुळें त्यांचे तात्त्विक शेवट ओढून ताणून आणले आहेत असें सहसा वाटत नाहीं. मात्र लघुनिबंधाचा शेवट स्वाभाविक असला पाहिजे, निबंधाचा जो मुख्य रस असेल त्याच्याशीं तो सहज मिसळून गेला पाहिजे, किंबहुना वेलीवर जशी कळी उमलते तसा तो प्रगट व्हावा, हें म्हणणें निराळें आणि एखादा झरा जसा मधेंच वाळवंटांत आटून जातो तसा लघुनिबंध मूळपदावर न येतां संपला तरी चालेल असें म्हणणें निराळें !

आकाशांत स्वच्छंदानें भ्रमण करणाऱ्या पांखराला घरटें नसलें तर त्याची काय अवस्था येईल ? कळस नसलेलें देऊळ कसें दिसेल ? हे किंवा असले प्रश्न प्रा. कुलकर्ण्यांना विचारण्यापेक्षां मी वाङ्मयांतलेंच एक उदाहरण त्यांच्यापुढें ठेवतों. सुनीत चौदा ओळींचें असतें. त्यांतल्या एका प्रकारांत शेवटच्या दोन चरणांत मध्यवर्ती कल्पनेला कलाटणी दिलेली असते. सुनीताचे हे शेवटचे दोन चरण गाळून टाकले तर त्याचें वैशिष्ट्य कायम राहील का ? लघुनिबंधाचेंही तसेंच आहे. गाण्यांत समेवर येण्यांत जें कौशल्य असतें तेंच लघुकथा किंवा लघुनिबंध यांचा परिणामकारक शेवट साधणाऱ्या लेखकाच्या अंगीं असायला हवें. लघुनिबंध म्हणजे नुसतें स्वैर आत्मदर्शन नव्हे. त्या स्वैरतेचें नियमन करणारें विचाराचें अथवा भावनेचें सूत्र त्यांत असायलाच हवें ! हार तयार

करतांना आपण हरतऱ्हेचीं फुलें त्यांत गुंफतों. लघुनिबंधही असाच फुलत जातो. पण त्या पुष्पहाराच्या दोन्ही टोंकांची शेवटीं आपण गांठ मारतोंच ना ? लघुनिबंधाच्या आरंभ आणि शेवट यांत अशी सुसूत्रता असणें हें प्रमाणबद्धतेच्याच नव्हे, तर परिणामकारकतेच्या दृष्टीनेंही अवश्य आहे. फडक्यांची 'हरवली म्हणून सांपडली' ही गुजगोष्ट या दृष्टीनें नमुनेदार ठरेल !

लांबचीं उदाहरणें कशाला हवींत? 'तिसऱ्या वर्गाचा प्रवास,' 'संकेत,' 'एक तप', 'अर्पणपत्रिका' इत्यादि या संग्रहांतल्या लघुनिबंधांचे शेवट गाळून टाकल्यानें त्यांची गोडी वाढेल कीं कमी होईल हें तुमचें तुम्हीच ठरवूं शकाल.

कोल्हापूर,
२३-४-४७

वि. स. खांडेकर

ग्रं. सं. ठाणे.
आंडण ६६७८
(स्थळ प्रत)
१०५१ ना.

ल्यू[illegible] लहानसा लेख आहे तो. एका क्लबांतले एक म्हातारेसे गृहस्थ कांहीं दिवस गैरहजर होते. स्वारी कुठें गडप झाली होती हें कुणालाही ठाऊक नव्हतें. बऱ्याच दिवसांनीं त्यांचें दर्शन होतांच कुणी तरी कुतूहलानें विचारलें, 'आजारी बिजारी होतां कीं काय ?'

आयुष्याच्या उतरणीला लागलेल्या मनुष्याला दुसरा काय प्रश्न विचारायचा ? पण सदरहू गृहस्थांचा आजाराशीं छत्तीसाचा आंकडा होता अगदीं. त्यांनीं ऐटींत उत्तर दिलें, 'प्रवासाला गेलों होतों.'

आश्चर्यचकित प्रेक्षकांपैकीं एक प्रसंगावधान राखून म्हणाला, 'आगगाडीनंच गेलां होतां ना ?'

'छे: ! मोटरनं.'

दुसरें आश्चर्य ! म्हातारेबुवा मजेखातर मोटरीनें प्रवास करतात !

या धक्क्यानेंही चित्ताची शांति ढळूं न देणारा श्रोता तिथें होताच. त्यानें पृच्छा केली, 'एकटेच गेलां होतां ?'

'छे छे ! मातोश्री होत्या ना बरोबर !'

या वेळीं जगांतलीं सारीं आश्चर्यें श्रोत्यांच्या चेहऱ्यावर गोळा झालीं असलीं तर त्यांत नवल कसलें ? सदरहू वृद्धबुवांच्या मातु:श्री जिवंत असून त्या मोटरींतून हौसेनें प्रवास करतात ! ताजमहाल, पिरॅमिड सर्व कांहीं रद्द आहे यापुढें.

बावरलेल्या तरुण श्रोत्यांना पुढें काय बोलायचें हें कळेना. पण त्या गृहस्थांच्या वयाचेच दुसरे गृहस्थ पुढें सरसावले व म्हणाले, 'तुमच्या आईचं वय काय आहे ?'

'—एक्याण्णव.'

विजयानंदानें दुसरा गृहस्थ उद्गारला, 'माझ्या आईचं ब्याण्णव आहे.'

झालें. शर्यत चालू झाली. दोघांनीं एकमेकांची कसून उलट तपासणी केली अगदीं ! लष्करांत दाखल होतांना तरण्याबांड शिपायांच्या प्रकृतीचीसुद्धां जेवढी

सूक्ष्म चौकशी होत नसेल, तेवढी नव्वदावर पावसाळे पाहिलेल्या या म्हाताऱ्या आयांच्या प्रकृतींची झाली. एकीला चांगलें चालतां येत होतें; पण चाळिशी-शिवाय वाचतां येत नव्हतें. दुसरी बिनचाळिशीनें सुईंत दोरा ओवूं शके; पण तिच्या कर्नाटक प्रांतांत दुष्काळ पडला होता. दोघांनीं एकमेकांच्या आयांचीं वैगुण्यें अगदीं कसोशीनें काढलीं; पण वादाचा कांहीं निकाल लागेना. दोन्ही पारडीं समसमान दिसूं लागलीं. शेवटीं आपल्या बाजूचें वजन वाढावें म्हणून दुसऱ्या गृहस्थांनीं सांगितलें, 'स्वतःच्या अडतीस नातवंडांच्या अभ्यासाची खडान् खडा माहिती आहे माझ्या आईला!'

'किती नातवंडं म्हटलींत?' पहिल्या गृहस्थानें प्रश्न केला.

'अडतीस.'

पहिल्या गृहस्थानें शांतपणें उत्तर दिलें, 'माझ्या आईला बावन्न नातवंडें आहेत.'

प्रत्येक आईसाठीं औषधांचा खर्च यापुढें किती होणार आहे, या गोष्टीखेरीज हा वाद पुढें चालवायला जागाच नव्हती. या दोन्ही गृहस्थांनीं आपल्या आयांची कुस्ती लावून या वादाचा निकाल करून घ्यायला हवा होता, असें कदाचित् कित्येकांचें मत पडेल! पण एकीला काठीवांचून चालतां येत नसल्यामुळें व दुसरीला कमी दिसत असल्यामुळें, या कुस्तीला कोणतें स्वरूप आलें असतें हें सांगणें कठिण आहे.

ल्यूकासनें वर्णन केलेली ही आयांची लढत वाचतांना मला हंसूं आल्यावांचून राहिलें नाहीं. एकच प्याल्यांत डॉक्टरवर मात करण्याकरतां वैद्यराज जेव्हां 'तीन दिवसांत रोग्याचा मुडदा पडतों' अशी गर्जना करतात, तेव्हां कुणाचा तरी चेहरा निर्विकार राहणें शक्य आहे काय? मात्र असल्या भूमिका केवळ हंसविण्याकरतां लेखक निर्माण करतात असें थोडेंच आहे! स्वतःविषयीं आंधळा अभिमान बाळगणारी मानवी मनोवृत्तिच पदोपदीं या विनोदी पडद्याआडून डोकावून पाहत नाहीं काय?

ल्यूकासच्या लेखांतील भांडकुदळ वृद्ध मातृभक्त आहेत. पण मातृभक्तीप्रमाणें अपत्यवात्सल्यही अशा प्रकारच्या भांडणांना स्फूर्ति देऊं शकतें, याचा परवांच मला अनुभव आला. शेजारधर्म पाळण्याकरतांच कीं काय, माझ्या माहितीच्या

दोन शेजारणी जवळ जवळ एकाच वेळीं बाळंत झाल्या. एकीचा मुलगा अगदीं हडकुळा होता. नुसतें पडवळ! दुसरीचा मुलगा अगदीं भोपळ्यासारखा गरगरीत होता चांगला! माझ्यासारख्या त्रयस्थाला एकाचा लुकडेपणा व दुसऱ्याचा लठ्ठपणा पाहून हंसू येई. पण त्या दोन्ही आया आपआपल्या मुलांच्या शरीरसौष्ठवाची वकिली करतांना आधीं रडकुंडीला व मग वर्दळीवर येत; हडकुळ्या मुलाची आई गांधींसारख्या लोकांचे दाखले देऊन हडकुळीं माणसेंच मोठीं होतात असें सिद्ध करण्याचा प्रयत्न करी. दुसऱ्या मातुःश्रींना भीम, हनुमंतादि देवतांचा आधार मिळण्यासारखा होता. पण त्या कुठल्या तरी पुस्तकांत वाचलेलें मुलांच्या वजनाचें कोष्टक पाठ म्हणूनच संतुष्ट होत. या वादानें त्या दोन आयांना व्यायाम आणि शेजाऱ्यापाजाऱ्यांची करमणूक भरपूर होई. मात्र, या सामन्याचा शेवट कसा होणार, हें कल्पक लेखकालासुद्धां सांगतां आलें नसतें! पण म्हणतात ना? देवाची करणी आणि नारळांत पाणी! दीड वर्ष झालें असेल नसेल तोंच दोन्ही माता पुन्हा प्रसूत झाल्या. लठ्ठपणाची तरफदारी करणाऱ्या बाईला या वेळीं हडकुळें मूल झालें. अर्थात्, तिचें मत क्षणार्धात बदललें हें सांगायलाच नको.

रुक्मिणी, सत्यभामा यांचें घरगुती भांडण असो अगर वसिष्ठ-विश्वामित्रांचा दरबारी कलह असो, त्याचीं मुळें मनुष्याच्या अंध आत्मनिष्ठेंत असतात असेंच दिसून येईल. पारिजाताचें झाड सत्यभामेच्या अंगणांत लावून त्याचीं फुलें रुक्मिणीच्या दारांत पडतील अशी युक्ति कृष्णानें केली असेल! पण ती त्याच्यावर उलटविण्याकरतां भल्या पहांटे उठून सत्यभामेनें रुक्मिणीच्या अंगणांतलीं सर्व फुलें वेंचून आणलीं असतीं म्हणजे काम झालें नसतें का? हो, पण त्यामुळें तिच्या भांडखोर अहंकाराचें समाधान कसें झालें असतें? वसिष्ठ-विश्वामित्रांचें भांडण तर केवळ एका शब्दाकरितां झालें. वसिष्ठ विश्वामित्राला ब्रह्मर्षि म्हणायला तयार होईना. बिचाऱ्याला विसाव्या शतकांत सर्व प्रकारचे ऋषी किती स्वस्त होणार आहेत याची कल्पना नसावी! नाहीं तर एका शब्दासाठीं कुटुंब व कामधेनु यांच्यावर पाणी सोडायला तो तयार झाला नसता! बाकी, तसें घडलें असतें तरी, हें भांडण दुसऱ्या एखाद्या शब्दाच्या पायीं रंगलें असतें यांत संशय नाहीं.

भांडणाचें भविष्य कुणालाच वर्तवितां येत नाहीं. परवांचा मोटरींतला माझाच अनुभव पाहा ना. माझ्या उजव्या बाजूचे गृहस्थ कोंकणांतले होते.

डावीकडल्यांचा उभा जन्म घाटावर गेला होता. नाइलाजानें कांहीं कामाकरतां ते कोंकणांत येत होते. बेळगांव सुटतांच त्यांनीं कोंकणनिंदेला प्रारंभ केला. ‘ छे बुवा ! काय भयंकर झाडी असते म्हणे कोंकणांत ! अन् साप तर पावलोपावलीं पायाखालीं येतात ! त्यांत भुतांची भर ! माणसं म्हणजे काय माणसंच ! पंचे नेसून नाकांत बोलत राहतात एकसारखीं ! ’ डाव्या बाजूचा मारुति असा जागृत झाल्यावर उजवीकडला वेताळ थोडाच स्वस्थ बसतो ! तो पडला कोंकणाचा कट्टा अभिमानी ! तो ओरडला, ‘ ठाऊक आहे तुमचा देश ! जिकडे तिकडे बोलके डोंगर बघावेत नुसते ! आणि धूळ ? पाव्हण्याला दुसरं काय खायला घालणार तुम्ही चिक्कू लोक ? प्रेताची कळा आलेलीं तीं तुमचीं खेड्यांतलीं घरे ! कधीं आंघोळ करतात का तिथलीं माणसं ! ’

दोन्ही तोफखाने एकदम सुरू झाले. मधें बसलेला मी मात्र मनांतल्या मनांत हंसूं लागलों. कोंकण व देश यांच्यांतलीं सामान्य मनुष्याला दिसणारीं विविध सौंदर्यें आलटून पालटून माझ्या डोळ्यांपुढें नाचूं लागलीं. नारळी-पोफळींच्या रानांत रमतांना जी गंमत वाटते, तीच पुरुषभर उंचीच्या जोंधळ्यांतून सळसळत जातांना अगर ऊसाच्या मळ्यांतून पाठशिवणीचा खेळ खेळतांना आपल्या अनुभवाला येत नाहीं का ? रातांब्याचें पन्हें पितांना काय अगर गुऱ्हाळावर जाऊन काकवी चाखतांना काय जिभेला सारखेंच पाणी सुटतें. पिवळ्या जर्द बोंडूंनीं भरलेलें काजूचें झाड पिकलेल्या पेरूंनीं शोभणाऱ्या झाडापेक्षां कमी सुंदर दिसतें असें कोण म्हणेल ? वादळी समुद्र आणि महापूर आलेली नदी हीं दोन्हीं निसर्गाच्या भव्य पण सुंदर स्वरूपाची सारखीच जाणीव करून देतात. डोंगरावरल्या जाळ्यांतून करवंदें शोधून आणणें आणि भुईमुगाच्या शेतांत जाऊन ओल्या शेंगा काढणें यांत अधिक मौज कशांत आहे, हें सांगतां येणेंच शक्य नाहीं. किर्र रानांतून अपरात्रीं गाडी हांकीत असतांना घाटावरला गाडीवान जें गाणें गात असतो, त्याची मोहिनी रांपण घालण्याकरितां होडींत बसून गेलेल्या कोळ्यांच्या तोंडचें गाणें ज्यानें ऐकलें असेल, त्यालाच बरोबर कळूं शकेल. घाटावरचा शेतकरी वाटसरूला मोठ्या प्रेमानें ओला हरभरा देतो, तर कोंकणांतला त्याचा भाऊ माडावरचें अडसर काढून त्याचें आदरातिथ्य करतो.

माझ्या मनांत चाललेल्या या सुंदर तुलनेचा त्या वादविवादपटूंना पत्ताही नव्हता. ते सारखे भांडतच राहिले ! एका दृष्टीनें तें बरोबरच होतें म्हणा !

मनुष्यस्वभावाला औषध कुठें मिळणार? राष्ट्रसंघाच्या सभासदांपासून नळावर भांडणाऱ्या बायकांपर्यंत सारीं माणसें म्हणजे एका माळेचे मणी !

परवां इंग्लंडमधें गेलेला हिंदी क्रिकेटसंघ तिथें खेळण्याकरतां गेला होता, कीं भांडण्याकरितां गेला होता, हें कोडें माझ्याप्रमाणेंच अनेकांना अद्यापि उलगडलें नसेल. शाकाहारी माणसाचा मांसाहारी मनुष्याशीं वाद जुंपला म्हणजे मला नेहमींच भीति वाटूं लागते. वादाच्या भरांत दांतओंठ खाऊन तो आपल्या तत्त्वाचा सूक्ष्म दृष्टीनें भंग करतो ही गोष्ट सोडून द्या. पण पुढें पुढें तो इतका बेफाम होतो कीं, मांसाहाराचा तिटकारा असूनही भीमाप्रमाणें तो आपल्या प्रतिस्पर्ध्याच्या नरडीचा घोट घेईल कीं काय असें वाटूं लागतें !

यामुळें कुठलाही वाद सुरू झाला म्हणजे तो केवळ तत्त्वबोधाकरतां लढवूं पाहणाऱ्या माणसांचें मला मनांतल्या मनांत हंसूं येतें. त्यांना हंसण्याचा मला काय अधिकार आहे, हें मात्र कुणी विचारूं नये. लहानपणीं शाळेला जाणाऱ्या दोन रस्त्यांपैकीं जवळचा कोणता याविषयीं एका बालमित्राशीं वाद करून मीं त्याच्याशीं तीन वर्षें अबोला धरला होता. रस्त्यांची लांबी कशी मोजायची हा प्रश्न त्या वेळीं पुढें आला नाहीं म्हणून ठीक झालें. नाहीं तर कोष्टकाचें पुस्तक उघडून पाहण्याचा भयंकर प्रसंग ओढवला असता माझ्यावर ! कॉलेजांत असतांना तर मध्यरात्रीपर्यंत आम्हीं तेल जाळलें नाहीं असा दिवस एखादाच असेल. आज काय, टिळक श्रेष्ठ कीं गोखले श्रेष्ठ ? उद्यां काय, कोल्हटकर–खाडिलकरांपैकीं अधिक चांगला लेखक कोण ? परवां, प्रोफेसरांपैकीं सर्वांत वाईट कोण शिकवितो ? तर तेरवां, विद्यार्थिनींपैकीं कोण बरी आहे ? ( मराठी भाषा विविध अर्थ चांगल्या तऱ्हेनें प्रगट करूं शकत नाहीं, असें म्हणणारांना काय म्हणावयाचें ? ) एक ना दोन. वादाला विषय नाहीं असा दिवसच गेला नाहीं. त्या वादविवादांच्या वेळीं अगदीं शिरा ताणताणून भांडत असें मी ! आतां वीस वर्षांपूर्वी मी आपल्या बाजूनें मांडलेलीं प्रमाणें आठवलीं कीं मला लाजेनें मान खालीं घालावीशी वाटते. टिळक आणि गोखले–दोघेही अफाट समुद्र. आमच्या कागदी होड्यांनीं त्यांचा विस्तार मोजायला आम्हीं निघालों होतों ! कोल्हटकर आणि खाडिलकर ! महाराष्ट्र-शारदेच्या उद्यानांतले कल्पवृक्ष ! त्यांच्या साली काढून त्यावरून आम्हीं त्यांच्या फळांची गोडी अजमावीत होतों. खरेंच, गतायुष्यांतल्या साऱ्या वादविवादांकडे आणि भांडणांकडे पाहिलें म्हणजे डार्विनचा मनुष्याविषयींचा सिद्धांत खोटा वाटूं

लागतो. वानरापेक्षां मांजरच मनुष्यजातीचें पूर्वज अधिक शोभेल यांत शंका नाहीं.

मनुष्य जोंपर्यंत जगाच्या रंगापेक्षां स्वतःच्या रंगानें रंगत आहे तोंपर्यंत जगांत भांडणेंही रंगत राहणार ! मी काल बायकोशीं कां भांडलों हें आतां मला सांगतां येत नाहीं. पण भांडलों.—अगदीं खूप भांडलों–हें मात्र खरें. शिवाय माणसानें उगीच भांडूं नये म्हणून ल्यूकासच्या लेखांतील त्या दोन वृद्ध सुपुत्रांना हंसण्यांत काय अर्थ आहे ? ‘ कलेकरतां कला ’ या तत्त्वाचा जर कांहीं कलावंत पुरस्कार करतात, तर ‘ भांडणाकरतां भांडण ’ या तत्त्वानें तरी खालीं मान कां घालावी ? त्याला तर बहुजनसमाजाकडून नेहमींच जोराचा पाठिंबा मिळतो !

१९३६

## पुनर्जन्म

२

वर्तमानपत्र म्हटलें म्हणजे जगांतल्या साऱ्या अद्भुत वातम्यांचें प्रसूतिगृह! दररोज थोडी थोडी अफू खाणाराला जसें कुठलेंही विष बाधत नाहीं, त्याप्रमाणें दैनिकाच्या भक्ताला कुठलीही वातमी भिववूं शकत नाहीं. एका बाईला बोकड झाल्याची वातमी आज वाचल्यावर उद्यां दुसऱ्या बाईला माकड झाल्याची वातमी वाचून आश्चर्य वाटणार तरी कसें? मनुष्यजन्माच्या बाबतींत वृत्तपत्रांनीं आतांपर्यंत इतकी विविधता दाखविली आहे कीं, उद्यां आभाळांतून हजार पांचशें मुलें पृथ्वीवर पडल्याची (त्यांच्या नखालाही धक्का न लागतां!) वातमी छापून आली तर ह्या चमत्काराचें श्रेय मुद्राराक्षसाऐवजीं मी देवालाच देईन. आतां संततिनियमनाचे पुरस्कर्ते या वातमीचा कसून इनकार करतील ही गोष्ट निराळी!

पण वाटेल ती वातमी पचविण्याची माझी ही शक्ति परवां मात्र दुबळी ठरली. वर्तमानपत्रांनीं आपला मोर्चा मनुष्याच्या जन्मावरून पुनर्जन्माकडे वळविल्या-बरोबर माझे धाबेंच दणाणलें म्हणा ना! दिल्लींतल्या एका लहान मुलीला आपल्या मागल्या जन्माची आठवण होऊन ती मथुरेंतल्या पूर्वजन्मींच्या नवऱ्याविषयीं अचूक गोष्ट सांगत आहे, हें वाचतांच मीं साशंक मुद्रेनें घरांत पाहूं लागलों. काय नेम सांगायचा? आमच्या राणीसाहेब मागील जन्मीं युरोपांतील एकाद्या देशाच्या खऱ्याखुऱ्या राणीसाहेब असतील अगर आफ्रिकेंतल्या एखाद्या जंगलांतील शिद्दीणीही असतील! आमची पांढरी स्वच्छ सुली मांजरी पूर्वजन्मीं बर्फमय प्रदेशांत वावरणाऱ्या एखाद्या एस्किमोची बायको असेल, कीं डोळे मिटून दूध पिणाऱ्या एकाद्या महाराष्ट्रीय बुवाची शिष्यीण असेल? घरांत सारख्या त्रास देणाऱ्या या माशा! त्या माराव्यात कीं मारूं नयेत? चारुदत्ता-प्रमाणें मलाही वाटलें—माशा मारणारा म्हणून लोक हिणवितील या गोष्टीपेक्षां माझ्या पूर्वजन्मींच्या आप्तेष्टांना मीं मारलें असा माझा दुर्लौकिक जगांत होऊं नये. पूर्वजन्माच्या स्मृतीची ही लाट आमच्या गांवापर्यंत आली आणि एकाद्या

दुकानदारानें भर बाजारांत माझा हात धरून मागच्या जन्मीं मीं देणें असलेले पांचशें रुपये मागितले तर ? एकादी बाई पूर्वजन्मीं मी तुमची बायको होतें असें म्हणूं लागली तर ? ही बाई सुंदर असली तर मला काय वाटेल हा प्रश्न मानसशास्त्रज्ञांवर सोंपवणेंच बरें नाहीं का ? दिल्लींतल्या एका मुलीला पूर्वजन्माची आठवण झाल्याची ही बातमी प्रसिद्ध झाल्याबरोबर सनातन्यांच्या वादळांत सांपडलेल्या नौकेला अगदीं ध्रुवतारा दिसल्यासारखें झालें ! पण कोट्यवधि हिंदूंना जर आपले मागील जन्म असेच पटापट आठवूं लागले, तर या विशाल देशाला वेड्यांच्या इस्पितळाचें स्वरूप यायला कांहीं फारसा वेळ लागणार नाहीं.

वृत्तपत्रांचे रकाने व खिसे भरण्याचें काम संपल्यावर, दिल्लीचें पूर्वजन्माचें प्रकरण ही एक मानसिक विकृति आहे अशा अर्थाच्या बातम्या प्रसिद्ध होऊं लागल्या. पुनर्जन्माची मूळची कल्पनाच एका विकृत भावनेवर उभारलेली असल्यामुळें असें व्हावें यांत नवल तरी कसलें ? पुनर्जन्म म्हणजे जगांतल्या विषमतेच्या कारणांचा उलगडा करतांना भांबावून गेलेल्या मानवी मनानें उभारलेलें कल्पनामंदिर ! या मंदिराच्या शिल्पाचें कितीही कौतुक केलें तरी त्यांत कुणाचा आत्मा समाधानानें राहूं शकेल काय ? लहानपणींसुद्धां या पुनर्जन्माच्या कल्पनेची मोठी चीड येई मला ! तींच युगें, तींच माणसें, त्याच गोष्टी, या सर्वांची पुनरावृत्ति होणार आहे, असें कळल्यावर नावीन्याला आसुसलेल्या माझ्या बालमनाचा सारा आनंद कसा कोमेजून जाई अगदीं ! सध्यांचें जग बुडाल्यानंतर पुन्हां जें जग सुरू होईल त्यांत आपण असेच जन्माला येणार, दुसऱ्या यत्तेंत पुन्हां तीच फाटकी विजार आपल्याला पुष्कळ दिवस वापरावी लागणार, हीच आई आणि हिचा हाच राग पुन्हां आपल्या वांट्याला येणार, इंग्रजी शाळेंत जातांना आपल्या नाकावर क्रिकेटचा चेंडू बसून आपण बेशुद्ध पडणार, आपले तालीममास्तर युनिव्हर्सिटींतून तंगडी धरून बाहेर काढण्याची आपल्याला धमकी देणार, इत्यादि गोष्टी डोळ्यांपुढें उभ्या राहिल्यावर आठदहा वर्षांच्या जीवाला त्यांत कसलें सुख होणार ?

निसर्गाच्या लहरीपणाची अगर समाजांतल्या विषमतेची मीमांसा करण्यापेक्षां पुनर्जन्माच्या तत्त्वज्ञानानें समाधान मानून घेणें मानवजातीला एके काळीं शक्य झालें असेल ! पण पैन् पैचा हिशेब ठेवणाऱ्या सावकाराप्रमाणें परमेश्वर प्रत्येक जीवाच्या पापपुण्याचा जमाखर्च करीत बसला आहे, बरोबर बेलिफ घेऊन जसा

करायला जाणाऱ्या धनकोसारखा तो निर्दयपणानें निरनिराळ्या घरांत शिरत आहे आणि मानवतेच्या डोळ्यांतून वाहणाऱ्या अश्रुधारांनीं आपला विश्ववृक्ष वाढत असल्याचें दृश्य त्याला समाधान देत आहे, ही कल्पनाच मला कशीशी वाटते ! बरें, पुनर्जन्मांतील सुखदुःखें ठरविण्याकरितां परमेश्वर जे खोटेनाटे हिशेब करितो त्याला कांहीं तरी सीमा असायला पाहिजे होती ! फुलराणीनें विश्रांतीकरतां ज्याच्या हृदयाचें सिंहासन निवडलें आणि संध्यातारकानें ज्याच्या डोळ्यांतील प्रेमळपणाचें अनुकरण केलें, त्या बालकवीला आगगाडीखालीं बळी देणाऱ्या परमेश्वराच्या मानवी आयुष्याच्या हिशेबाच्या चोपड्या स्वर्गांत एखादी आग लागून तिच्यांत जळून गेल्या असत्या तर बरें झालें नसतें का ? शेलेसारखें कविरत्न असल्या हिशेबानें समुद्रांत बुडविणारा परमेश्वर पाषाणहृदयाचा असला पाहिजे यांत शंका कसली ?

पुनर्जन्माच्या तत्त्वानें परमेश्वराला आपण नकळत राक्षसाचें स्वरूप देत आहों, ही गोष्ट आंधळ्या समाधानाच्या भरांत पूर्वी मानवजातीच्या फारशी लक्षांत आली नाहीं. कुणाची कोणतीही तक्रार असो, तिचें मूळ पुनर्जन्माच्या गुहेंत आहे असें सांगितलें, म्हणजे ती दुरुस्त करण्याचें कारण नाहीं ! पुनर्जन्माचें तत्त्वज्ञान ही अशा दृष्टीनें मनुष्याच्या सामाजिक विकासाच्या पायांत घातलेली दीड मणाची बेडीच आहे !

परंतु पुनर्जन्माची काव्यमय कल्पना अनुभवायला विकल मनोवृत्तीचा अगर आंधळ्या तत्त्वज्ञानाचा आश्रय केलाच पाहिजे असें कुठें आहे ? तीन महिन्यांपूर्वी एका भयंकर तापांतून माझा पुनर्जन्म झाला. ताप गेल्यावर दुसऱ्या दिवशीं सकाळीं खिडकींतून सूर्याचे हांसरे किरण मीं पाहिले आणि खरोखरच एखाद्या अर्भकाप्रमाणें मी त्यांच्याकडे टक लावून पाहूं लागलों. पृथ्वीवरल्या किमयेचा हा प्रयोग किती तरी वर्षांत मीं इतक्या एकाग्रतेनें पाहिला नव्हता. त्या दिवशीं मी जिन्याच्या पायऱ्या चढलों व उतरलों त्यासुद्धां एखाद्या बालकाप्रमाणेंच ! आंघोळीच्या वेळीं ऊन पाणी अंगावर पडतांच मला जो आनंद झाला, त्याचें वर्णन पहिला पाऊस अंगावर घेतांना समाधानाची सुवास सोडणारी पृथ्वीच फक्त करूं शकेल. आणि त्या दिवशीं खाल्लेले भाताचे ते घांस–त्या मेतकुटाची लज्जत मी कधींच विसरणार नाहीं. मेतकूट शब्द अगदीं अंतरंगांतल्या प्रेमाबद्दलच कां वापरतात हें मला तेव्हां कळलें. ज्या अमृताकरितां देवदानवांनीं समुद्रमंथन केलें

तें बहुधा दह्यांत कालवलेलें मेतकूटच असलें पाहिजे अशी एक संशोधनाची कल्पनाही त्या वेळीं माझ्या मनांत चमकून गेली !

मानवी दृष्टीप्रमाणें सृष्टिही ह्या पुनर्जन्माच्या आनंदांत वारंवार दंग होत असते. चोवीस तास सूर्य आकाशांत राहूं लागला तर सध्यांच्या हलाखीच्या काळांत अनेकांना ती इष्टापत्तिच वाटेल. तेवढाच तेलाचा अगर विजेचा खर्च वांचला ! पण मग सूर्योदय पाहण्याची गोष्ट दूरच राहूं द्या, त्याच्यावर कविता करण्याची इच्छाही कोणाला होणार नाहीं ! दरवर्षी होणारा पावसाचा पुनर्जन्मही असाच मनोहर वाटत नाहीं का ? पांढऱ्या शुभ्र मोत्यांच्या राशींनीं भरलेल्या मेघांच्या नौका आंतील मौल्यवान् माल कुणालाही दिसूं नये म्हणून काळ्या पडद्यानें आच्छादिलेल्या आकाशांतून जात आहेत, आपल्या हक्काचें हें ऐश्वर्य आपल्याला मिळणार नाहीं या भीतीनें पृथ्वीच्या तोंडचें पाणी पळालें आहे, इतक्यांत मूर्तिमंत न्यायदेवताच वाटणारी वीज एकदम प्रगट होते आणि त्या नौकांना भराभर भोकें पाडून पृथ्वीवर मोत्यांचा वर्षाव करते. थंडीच्या पुनर्जन्मांत पर्जन्यवृष्टीचें भव्य व रमणीय रूप दिसत नाहीं हें खरें. पण कडकडून मारलेल्या मिठीचें सुख ओझरत्या चुंबनापेक्षां जास्त असतें असें थोडेंच आहे ! ऐन मध्यरात्रीं झोंपमोड होऊं नये म्हणून थंडीनें हळूच आपल्या खोलींत प्रवेश केला कीं आपण नकळत पायालगतचा ऊबदार रग जेव्हां अंगावर ओढून घेतों, तेव्हां लहानपणीं आईच्या कुशींत शिरणाऱ्या बालकासारखेंच आपण वागत नाहीं काय ?

पुनर्जन्माची कल्पना तत्त्वज्ञानाच्या दृष्टीनें कृत्रिम पण काव्यदृष्टीनें अत्यंत रमणीय वाटते, ही गोष्ट कुणीही नाकबूल करणार नाहीं. आणि काव्याचीं शिखरें आकाशांतील नक्षत्रांना भिडत असलीं तरी त्यांचें स्थैर्य या दगडाधोंड्यांनीं भरलेल्या पृथ्वीवरच अवलंबून असतें. मुलाचा जन्म म्हणजे आईचा पुनर्जन्म हें शारीरिक दृष्टीनें तर खरेंच आहे. पण मानसिक दृष्टीनेंही तो आईबापांचा पुनर्जन्मच नसतो काय ? मूल होण्यापूर्वी चंद्राकडे ज्योतिःशास्त्राच्या दृष्टीनें पाहणारा रुक्ष मनुष्यही आपल्या अपत्याबरोबर चांदूमामाची आपलेपणानें चौकशी करूं लागतो, शुक्लपक्षांतल्या वाढत्या चंद्रालाही 'भागलास का ?' असा हास्यास्पद प्रश्न विचारतो आणि माडांच्या रायांत उभें राहूनही लिंबोणीच्या झाडामागें चंद्र लपला आहे असा त्याला भास उत्पन्न होतो. माझाच अनुभव पाहा ना ! पांच महिन्यांपूर्वी घरावरून जाणाऱ्या मनुष्यांना माझा शब्दसुद्धां ऐकूं येत नसे. पण

हल्लीं जो तो दारापुढें क्षणभर थांबून पुढें जातो. ‘ अविराजा निजा निजा ’ या सयमक काव्यापासून तो नुसता ‘हा हा हा’ सारख्या केवलप्रयोगी अव्ययापर्यंत कांहीं ना कांहीं उद्गार तारस्वरांत मी काढीतच असतों. घटका न् घटका असें बडबडणाऱ्या मनुष्याला यापूर्वी तरी मीं वेड्यांतच काढलें असतें. पण सध्यां ही वेड्याची भूमिका मीच उत्तम रीतीनें वठवीत आहें. अविनाशाबरोबर एका क्षणीं ओरडावें आणि दुसऱ्या क्षणीं हंसावें, मांजरापासून गाईपर्यंत साऱ्या प्राणिसृष्टीचा सहानुभूतीनें समाचार घ्यावा, ऊन असो अगर चांदणें असो, त्याच्याकडे टक लावून आनंदानें नाचावें—या साऱ्या गोष्टी परक्या माणसांचें किंबहुना साऱ्या जगाचें विस्मरण होऊन अगदीं स्वच्छंदानें मी करूं लागलों आहें, याचें कारण माझ्या पुनर्जन्माखेरीज दुसरें कुठलें असणार ? अपत्यहीन मनुष्य नरकांत पडतो अशी समजूत जुन्या काळीं प्रचलित होण्याचें कारण मला तरी एकच दिसतें. अपत्याबरोबर आपला पुनर्जन्म होऊन बुद्धिपुरस्सर बाळपणाचें स्वर्गसुख अनुभवण्याचें भाग्य अपत्य नसलेल्यांना कुठून लाभणार ?

१९३६

# तिसऱ्या वर्गाचा प्रवास

३

बेळगांवला आगगाडीच्या डब्यांत बसलें कीं कांहीं क्षण मी गोंधळून जातों! एकोणीस लष्करी लोक व अडतीस इतर लोक यांच्याकरितां तो डबा आहे, असें बजावणाऱ्या अक्षरांना मी भिऊन जातों असें मात्र नाहीं हं! एक लष्करी मनुष्य साध्या दोन माणसांबरोबर तरी असलाच पाहिजे; नाहीं तर लढाईत त्याचा उपयोग काय? अर्थात्, हें लष्करी कोष्टक पाहून माझें मन अस्थिर होतें, अशांतला मुळींच भाग नाहीं; उलट या डब्यांत किती लठ्ठ लोकांनीं बसावयाचें, पहिलवान आल्यास त्यांच्या संख्येची मर्यादा काय असावी, इत्यादि गोष्टींचाही कंपनीनें खुलासा केला असता तर बरें झालें असतें, असा विचार माझ्या मनांत डोकावून जातो. कारण धर्मांतलें तत्त्वज्ञान जसें प्रवचनापुरतेंच, त्याप्रमाणें असले नियमही फक्त लिहून ठेवण्याच्या कामींच उपयोगी! त्यांचा फायदा ते रंगविण्यामुळें ज्याला मजुरी मिळते त्या मनुष्यालाच काय तो व्हायचा!

त्या दिवशींचाच अनुभव पाहा ना! डब्यांतील सर्व उतारूंना शंभरापर्यंत अंक मोजतां येतात कीं काय याची परीक्षाच घेण्याचें जणूं काय रेल्वे कंपनीनें ठरविलें होतें. पावसाची एक सर कोसळून थोडीशी उघाडी मिळते न मिळते तोंच तिच्या पाठोपाठ दुसरी मुसळधार सर यावी असें होत होतें अगदीं. हातांत नुसतें बोचकें घेऊन येणारा प्रवासभाऊ आंत येऊन दाखल झाल्यानंतर दरवाजा बंद करण्याचा प्रयत्न करावा, तोंच टुंकेला कोंकणी झाडण्या व बिछान्याला फणस बांधून घेऊन दुसरा बडा भाई आंत घुसे. आभाळच फाटल्यावर तें सुईदोऱ्यानें शिवत बसण्याची यातायात इंद्रादि तेहतीस कोटी देवांचे कपडे बेतणारा शिंपीही करणार नाहीं. तटाला खिंडार पाडल्यावर शत्रूपासून किल्ल्याचें संरक्षण करावयाचें तरी कसें? मी व डब्यांतील माझे सहचारी हताश मुद्रेनें प्रत्येक नवीन उतारूकडे व 'थांबवाया आगगाडी! बाबा, सांखळी रे ओढी' या रेल्वे-उपनिषदांतील महामंत्राकडे आळीपाळीनें पाहत होतों. सांखळी ओढण्याकरितां अशा चिकार

गर्दीतून सांखळीपर्यंत जायचें कसें याचा खुलासा तिथें मुळींच नव्हता. आणि एका अर्थानें तें बरोबरच होतें. धर्मांतील उदात्त तत्त्वज्ञान व्यवहारांत कसें उतरावयाचें, हें धर्मग्रंथांत थोडेंच लिहिलेलें असतें! आमच्या डब्याच्या बाजूला गार्ड फिरकला असता तर मीं त्याला एकच विनंति केली असती—' हाउस फुल्ल ' ही पाटी तरी आमच्या डब्यावर लाव. '

शेवटीं रेल्वेचें घड्याळ दर मिनिटाला एक मिनिट पुढें जात असल्यामुळें गाडी एकदांची सुटली! कोंडलेल्या डब्यांत बाहेरच्या शुद्ध वाऱ्याची झुळुक आली. आणि काय चमत्कार सांगावा? तिनें सर्व प्रवाशांची चित्तशुद्धि केली. आपण सर्व एकाच डब्यांत आहों (We are in the same boat या इंग्रजी म्हणीचा अर्थ या शब्दांत किती उतरला आहे, हें सांगावयाला नकोच!) ही जाणीवच या क्रांतीच्या मुळाशीं असावी! " कदाचित् धांवत्या डब्यांत आतां कुणालाही शिरतां येणार नाहीं या समाधानाच्या भावनेनें घटकेपूर्वीचे सर्व शत्रु मित्र झाले असतील. संकटांत उपयोगी पडतो तोच खरा मित्र हा अनुभव कुणाला नाहीं? आणि अशा गर्दीत आगगाडीच्या डब्यांत वेळ कसा घालवावा, हें प्रत्येकाला मोठें संकटच पडलेलें असतें! वाग्देवतेची सर्व कवींनीं इतकी स्तुति कां केली आहे, चांभारचौकशीच्या मुळाशीं संशोधनाचा केवढा उच्च हेतु असतो, ' मूकं करोति वाचालम् ' हें वर्णन परमेश्वरापेक्षां तुडुंब भरलेल्या एकाद्या आगगाडीच्या डब्याचेंच असणें अधिक संभवनीय कां वाटतें, इत्यादि गोष्टी अशा वेळीं क्षणार्धांत पटतात. बेळगांव स्टेशनवर एकमेकाकडे मारक्या म्हशीप्रमाणें पाहणारे उतारू सुळेभावी स्टेशन यायच्या आंतच वासराला चाटणाऱ्या गाईप्रमाणें एकमेकाकडे बघूं लागले. प्रवासाच्या फायद्यांत विश्वबंधुत्वाची गणना अवश्य केली पाहिजे, अशी माझी त्या दहापंधरा मिनिटांत खात्री झाली.

आगगाडींतील चर्पटपंजरीचा प्रारंभ शंकराचार्यांच्या 'कस्य त्वं वा कुत आयातः' या श्लोकानें व्हावा यांत अस्वाभाविक असें काय आहे? वंशवृक्षांवरून हां हां म्हणतां सर्वांनीं हवापाण्यांत उड्या मारल्या. संध्याकाळ होत चालल्यामुळें असो अगर ' जातस्य हि ध्रुवो मृत्युः ' हें गीतावाक्य आठवल्यामुळें असो, हळूहळू प्रत्येकजण कुठें उतरणार याचीही पृच्छा होऊं लागली. सर्वांचें उत्तर एक— ' मुंबई! ' आम्हा महाराष्ट्रीयांत अशी एकवाक्यता क्वचित्‌च आढळते! अरण्यांत सीतारामाची रात्र संपे, पण गोष्टी संपत नसत. मला वाटलें आमचा

हवा चुकून उत्तर ध्रुवावर गेला तरी तिथल्या सहा महिन्यांच्या रात्रीलाही पुरून उरतील इतक्या गप्पांचें भांडवल आमच्यापाशीं आहे.

पण आपण मुंबईला कशाला जात आहों हें प्रत्येकानें सांगायला सुरवात केली मात्र ! त्या एका डब्यांत हजारों भिन्न जगें सांठविलीं आहेत असा मला भास झाला. एक वृद्ध गृहस्थ आपल्या पुतण्याच्या लग्नाला जात होते, त्यांच्याच शेजारीं बसलेला दुसरा मनुष्य विषमानें आजारी असलेल्या आपल्या मुलाला पाहण्याकरितां धांवत चालला होता. एक तरुण होता ' मुलगी ' पाहणारा, तर दुसरा 'मुंबई' पाहणारा ! एक गृहस्थ नोकरी शोधणारा होता, पण त्याच्याजवळ बसलेली प्रौढ स्त्री बेपत्ता झालेल्या नवऱ्याच्या शोधाकरितां चालली होती. कुणी मुंबईला गिरणींत पोट भरणारा, तर कुणी भिक्षुकी करून चरितार्थ चालविणारा. हें विलक्षण वैचित्र्य पाहून सर्वांच्या एकवाक्यतेचें माझें मलाच हंसूं आलें.

मला एकदम दोन दिवसांपूर्वीची आठवण झाली. एका डाकेनें एकाच गांवाहून मला सातआठ पत्रें आलीं होतीं. तीं ज्यांच्याकडून आलीं होतीं तीं सारींच माणसें मला प्रिय होतीं. पण प्रत्येकाच्या पत्रांतील मजकूर किती भिन्न होता ! माझ्या तेरा वर्षांच्या पुतणीनें आपल्याला कोणकोणतीं पदें आतां चांगलीं म्हणतां येतात याचें वर्णन केलें होतें, तर तिच्याहून दोन वर्षांनीं वडील असणाऱ्या भावानें एका क्रिकेटच्या सामन्यांत आपण चार सहांचे टोले कसे लगावले याची सुरस हकीगत लिहिली होती. दोन्ही पत्रांत विजयाचा आनंद नुसता नाचत होता. पण या दोन्ही नृत्यांचें स्वरूप किती भिन्न होतें ! एक सुरंगीचें फूल तर दुसरें डेझीचें !

तिसरें पत्र नवीन नाटक कंपनी काढलेल्या माझ्या एका स्नेह्याचें होतें. आपल्या नाटकांना कशी तोबा गर्दी उडते, कोण कोण बडीं माणसें येतात, कुठल्या कुठल्या प्रसंगांना टाळ्यांचा कडकडाट होतो—अगदीं साग्रसंगीत पत्र होतें त्याचें. त्याच्या पाठोपाठ मीं जें पत्र वाचलें तें माझ्या एका मैत्रिणीचें होतें. तिच्या मुलाचें बारसें किती थाटानें साजरें झालें, जेवायला कोण कोण मंडळी आली होती, बेत काय होता, मुलाच्या चेहऱ्याकडे पाहून तो कुणासारखा दिसतो याविषयीं प्रत्येकाचें मत काय पडलें, तिची मैत्रीण असलेल्या कुठल्याशा संस्थानच्या राणीनें मुलाकरितां काय काय अहेर पाठविला आहे, प्रत्येक गोष्ट न् गोष्ट तिनें खुलवून लिहिली होती. पुन्हा माझ्या मनांत आलें, य दोन्ही

पत्रांत आनंद नुसता ओसंडून वाहत आहे. पण या आनंदाचीं क्षेत्रें किती भिन्न! जणूं कांहीं निरनिराळ्या ग्रहांवरच हीं दोन माणसें राहत असावींत.

जी गोष्ट आनंदाची तीच दुःखाची! माझ्या परकऱ्या भाचीच्या मोठ्या अक्षरांनीं लिहिलेल्या अशुद्ध पत्रांत आपल्या बाहुलीचें लग्न रामा गड्याच्या मुलीच्या बाईट बाहुल्याशीं लागल्याबद्दल तक्रार होती, तर माझ्या वहिणीच्या बारीक अक्षरांच्या शुद्ध पत्रांत आपण ठरविलेलें स्थळ थोरल्या मुलीला पसंत नसल्याबद्दलचें गाऱ्हाणें मांडलें होतें!

हीं पत्रें वाचतांना माझ्या मनांत विचार आला होता—प्रत्येक मनुष्याचें जग अगदीं स्वतंत्र आहे हेंच खरें! मुसळधार पावसाकडे शेतकरी पिकें बुडतील या भीतीनें पाहतो, तर सुखवस्तु क्रीडाप्रेमी गृहस्थ संध्याकाळचें टेनिस बुडेल या विचारानें अशा वेळीं कपाळाला आंठ्या घालतो. माहेरपणाकरितां आलेल्या दोन वहिणींपैकीं एक घरांत पाळणा नसल्यामुळें उदास असावी आणि दुसरी वर्षाच्या पाळण्यामुळें कंटाळलेली असावी, अशीं उदाहरणें हरघडी दिसत नाहींत काय? 'एखाद्याचें नशीब' ही कविता लिहिण्याकरितां ज्वालामुखी पर्वतापासून प्रेतावर वाहिल्या जाणाऱ्या फुलापर्यंत गडकऱ्यांच्या कल्पकतेला फिरावें लागलें. इतकी पायपीट करण्यापेक्षां ती आगगाडीच्या एखाद्या तिसऱ्या वर्गाच्या डब्यांत शिरली असती, तर चार श्लोकांच्या कवितेऐवजीं तिनें सहज चार हजार ओळींचें खंडकाव्य—कारण महाकाव्याला हा काळ अनुकूल नाहीं असें तज्ज्ञ म्हणतात—लिहिलें असतें.

मनुष्य हा समाजप्रिय प्राणी आहे! पण समाजप्रियतेपेक्षांही आत्मप्रीति त्याच्यांत अधिक आहे यांत संशय नाहीं. पृथ्वी वर्तुळाकार आहे हें प्रत्येकजण कबूल करतो. पण जगांत जेवढीं माणसें तेवढे या वर्तुळाचे मध्यबिंदु असतात. सिंक्लेअर लुईसच्या 'Main Street' मधील नायिकेला आपण आपल्या गांवच्या सुधारणेकरितां कांहीं तरी अपूर्व असें करीत आहों असें वाटत असतें, पण गांवांतील इतर लोकांना या विलक्षण कार्याचा कधींच पत्ता लागत नाहीं, यांतील रहस्य हेंच नाहीं काय? प्रख्यात कवि रॉबर्ट ब्राउनिंग यानें वसंताच्या आगमनावर एक छोटी कविता लिहिली आहे. दंवमौक्तिकांनीं अलंकृत झालेली टेकडी, समुद्रांत गात गात होडी हांकारणाऱ्या कोळ्याप्रमाणें आकाशांत भरारी

मारणारा चंडोल, इत्यादिकांच्या दर्शनानें प्रसन्न झालेलें त्याचें कविमन एकदम उद्गारतें—

*God's in His Heaven,*
*All's right with the world.*

ईश्वराच्या अस्तित्वाची आणि जगाच्या राज्याचा बंदोबस्त ठाकठीक असल्याची कल्पना सौंदर्यानें भारलेल्या कविमनाला पटावी यांत आश्चर्य नाहीं. याच चंडोलाऐवजीं ढोलींत लपून बसणाऱ्या घुबडाकडे त्याचें लक्ष गेलें असतें तर? दंवबिंदूंनीं शोभणाऱ्या गिरिप्रदेशाऐवजीं रुक्ष वाळवंट त्याच्यापुढें पसरलें असतें तर त्याच्या तोंडांतून हेच उद्गार निघाले असते का? खास नाहीं! स्वर्गाच्या राज्यपदावरून कवीनें ईश्वराला लगेच बडतर्फ केलें असतें!

जगांतला प्रत्येक मनुष्य कविता लिहीत नसला (त्यामुळेंच जग सुरळीत चाललें आहे असें अनेक विनोदी लेखकांचें मत आहे!) तरी त्याचें मन कवीचेंच असतें. जशी त्याची दृष्टि तशी त्याची सृष्टि! नैसर्गिक गरजा अगर सामाजिक बंधनें यांच्यामुळें मनुष्याच्या आचारविचारांत कितीही एकरूपता आली, तरी अगदीं अंतर्यामीं तो साऱ्या जगापेक्षां भिन्नच असतो. कंटाळवाण्या व्याख्यानाच्या वेळीं प्रत्येक श्रोत्याच्या मनांत येणाऱ्या विचारांची नोंद करणारें यंत्र उद्यां निघालें तर वक्त्याच्या तोंडाला कुलुप घालण्याच्या एका विचाराखेरीज त्यांच्या मनांत कुठेंही साम्य आढळणार नाहीं. एकाचें मन संध्याकाळीं तरी खानावळींत दोन घांस चांगले मिळतील कीं काय या विवंचेंनत असेल, तर दुसरा कुठल्या तरी मुखचंद्रम्याच्या चिंतनांत गुंगून गेला असेल.

या आत्मप्रीतीविरुद्ध कुणी कितीही नाक मुरडलें तरी जीवनरथाचीं चक्रें तिच्यामुळेंच कुरकुर न करतां चालू शकतात. समुद्रकिनाऱ्यावर फिरायला जाणारांना लहान खेकड्यासारख्या दिसणाऱ्या कुरल्या नेहमीं आढळतात. त्या आपलें भक्ष्य शोधीत इतस्ततः नाचत असतात. पण कुठें पाऊल वाजलें अगर चाहूल लागली कीं हां हां म्हणतां वाळवंटांतील चिमण्या बिळांत त्या गुप्त होतात. प्रत्येक मनुष्य या कुरलीसारखा आहे, असें मला वाटतें. सुखाच्या शोधाकरितां तो एकसारखा समाजांत वावरतो पण त्याचें खरें आश्रयस्थान म्हणजे त्याचें वैयक्तिक जग! जगांतील इतर दुःखें त्याच्या या खास जगांत कांहीं केल्या येऊं शकत नाहींत. 'अहं ब्रह्मास्मि' या वेदांतवचनाचा तरी दुसरा अर्थ काय

आहे? जगांतील विषमतेचा बराच भाग कृत्रिम असला, तरी वैचित्र्य म्हटलें कीं तेथें प्रत्येकाच्या विकासाला संधि मिळालीच पाहिजे.

समाजाशीं समरस होऊनही प्रत्येक मनुष्याचें जग निराळें असतें असें कुणी म्हटलें, कीं कित्येक आश्चर्यानें तर कित्येक भीतीनें ग्रस्त होतात! त्यांना वाटतें, या कोट्यवधि जगांची कुठें ना कुठें तरी टक्कर झाल्याशिवाय राहणार नाहीं. बिचाऱ्यांना अनंत अंतराळांत ग्रहांना नियमानें फिरविणारा सूर्य आहे, किंबहुना असल्या अगणित सूर्यांना आपल्या कक्षेंत ठेवणारा महासूर्यहि आहे ही गोष्ट खरीच वाटत नसावी! त्या महासूर्याचें तेज किती विलक्षण असेल, त्याची आकर्षणशक्ति—

गोकाक स्टेशन आलें होतें. आमच्या भरलेल्या डब्यांत चढण्याकरितां एक उतारू आला. मीं हंसतमुखानें दार उघडून त्याला आंत घेतलें!

१९३६

## एक तप ! ४

तें पत्र वाचून मला असा कांहीं विलक्षण आनंद झाला म्हणतां ! विलक्षणच म्हणायचा नाहीं तर काय ? आनंदांतही फुलांप्रमाणें अगदीं विस्मयजनक वैचित्र्य असतें. सोडतीच्या निकालांत आपला नंबर असलेला पाहून ज्याला आनंद होणार नाहीं तो–पण ज्याला अशा वेळीं आनंद होणार नाहीं असा मनुष्य जगांत असणें तरी शक्य आहे काय ? असलाच तर स्कॉटनें Breathes there the man with soul so dead वगैरे ओळींत त्याची पूर्वींच संभावना करुन ठेविली आहे ! तथापि, सोडतींतल्या बक्षिसाचा आनंद आणि आपलें आवडतें माणूस जीवावरच्या दुखण्यांतून उठल्यामुळें होणारा आनंद यांची तुलना कशी करायची ? कुणाही वृद्धाला विचारा, अंतरपाट दूर झाल्यावर झालेला आनंद नातवंड पाहतांना होणाऱ्या आनंदापेक्षां अगदींच निराळा होता असें तो सांगेल. आयुष्यांतल्या इतक्या उत्कट प्रसंगांची तरी गोष्ट कशाला हवी ? सकाळीं कामाला लागण्यापूर्वी घेतलेल्या चहाची गोडी आणि संध्याकाळीं दमून भागून आल्यावर प्यालेल्या चहाची लज्जत यांच्यांतील अंतर कुणीही सहज सांगूं शकेल.

सौभद्र नाटक पाहतांना मला नेहमींच आनंद होत आला आहे. पण लहानपणीं घटोत्कच व विदूषक माझे जानीदोस्त होते. ऐन विशींत ' बघुनि उपवना विरहाग्नीची ज्वाला भडके उरीं ' या पदावर मी बेहोष खूष असें आणि आतां सुभद्रेचें दुर्योधनाशीं लग्न ठरल्याचें खोटेंच सांगून रुक्मिणी संन्याशी अर्जुनाची जी फजिती करते तो प्रसंग मला सर्वांत अधिक आवडतो. वसंतऋतूंत बाजारांत गेल्यावर मोठी त्रेधा होते माझी ! इकडे सुरंगीचीं फुलें तर तिकडे सोनचांफ्यांचीं ! कुणाचा सुवास अधिक मुग्धमधुर आहे, हें ठरवितांच येत नाहीं. गुलाबें मोजूं लागावीं तोंच पलीकडे अबोलीचीं फुलें हांसऱ्या मुद्रेनें हांका मारूं लागतात. त्यांचा तो आकर्षक रंग पाहून क्षणभर हातांतल्या गुलाबांचें भानही राहत नाहीं मला. आयुष्यांतले अगणित आनंदक्षण असेच विविध रंगांनीं व गंधांनीं

नटलेले नसतात काय ? आनंदाचीं हीं अनंत रूपें भक्तीला ब्रह्मानंद म्हणून संबोधणाऱ्या साधुसंतांच्यासुद्धा लक्षांत आलीं नसतील.

म्हणूनच त्या पत्रानें झालेल्या आनंदाला विलक्षण म्हटलें मीं ! अपूर्वच होता तो अगदीं. एका विद्वान गृहस्थाचें मला आलेलें पत्र होतें तें ! मी दुसऱ्यांदा वाचीत असतांना शिंप्यानें जर माझ्या कोटाचें मोजमाप घेतलें असतें, तर तो कोट पुढें खात्रीनें सैल झाला असता मला ! आतांपर्यंत मला वाटे, जगांत ज्यांचीं पारायणें होतात अशीं पत्रें दोनच प्रकारचीं असतात–प्रणयपत्रें आणि मृत्युपत्रें. पण या पत्रानें माझी ही समजूत साफ खोटी ठरविली. त्या विद्वान गृहस्थांचें माझ्यावर प्रेम होतें असें कुणीच म्हणणार नाहीं. ते बायकोवर सुद्धां प्रेम करीत नसत म्हणे ! त्यांचें खरें लग्न पुस्तकांशींच लागलेलें होतें. आणि विद्वान मनुष्याला मृत्युपत्र करण्याचा प्रसंग कधींच येत नाहीं. तेव्हां मृत्युपत्रांतलें आकर्षण त्यांच्या पत्रांत नव्हतें हें उघडच आहे. तथापि तें पत्र दोनदां वाचूनही माझें समाधान झालें नाहीं. त्याची तिसरी आवृत्ति सुरू झाली. मीं बारा वर्षांपूर्वीं लिहिलेला एक लेख कांहीं कामासाठीं त्या विद्वान गृहस्थांनीं मागितला होता.

त्या लेखांत काय होतें, हें माझें मलाच आठवेना. स्मरणशक्ति इतकी तीव्र असती तर प्रत्येक परीक्षेंत माझा पहिला नंबर आला नसता का ? डोकें खाजविण्याची अगदीं शिकस्त केली मीं. शेवटीं एवढेंच आठवलें कीं, तो लेख छापून आला होता तेव्हां तो पुनः पुन्हां वाचून आपण आपली पाठ भरपूर थोपटून घेतली होती. आपलें अक्षर नि अक्षर वाङ्मयांत जमा होणार अशी नवशिक्या लेखकाची खात्री असतेच. त्यामुळें तो मीं कापूनहि ठेवला आहे, इथपर्यंत माझ्या स्मरणशक्तीनें लांब उडी मारली. मशारनिल्हे विद्वानांना लेख लवकरच पाठवून देतों असें उलट टपालानें उत्तर पाठवून मी त्याचीं कात्रणें शोधूं लागलों.

स्वतःचे जुने कागदपत्र शोधायच्या वेळीं राजवाडे, खरे वगैरे संशोधकां-विषयींचा माझा आदर द्विगुणित होतो. किंबहुना, अशा वेळीं इतिहाससंशोधक-मंडळाचा प्रचारक माझ्याकडे आला तर मी त्या मंडळाचा तहाहयात सभासद सुद्धां होऊन जाईन कदाचित्. जुन्या पुस्तकांच्या दुकानांत एखादें पुस्तक हटकून मिळेल. पण माझ्या जुन्या कागदांतून ( माझी बायको या ढिगांना रद्दीच म्हणते. आतां आलेलें पत्र दाखविलें पाहिजे तिला ! ) हवी असलेली गोष्ट चटकन्

सांपडायला ग्रहांचीच कृपा हवी! तो लेख शोधण्यापूर्वी आजचें वर्तमानपत्र घेऊन त्यांतील आपल्या राशीचें भविष्य पाहण्याचा बलवत्तर मोह झाला मला. पण ज्योतिषाची थट्टा करणारा एक लेख कालच मीं शिकविला असल्यामुळें या मोहावर मीं विजय मिळविला.

लागला तर टोला नाहीं तर भोपळा असे क्रिकेटमध्यें कांहीं खेळाडू असतातच कीं! त्यांचेंच अनुकरण मीं केलें. माझ्या शुभ ग्रहांच्या मदतीला सदरहू विद्वानांचे हर्शलसकट सर्व ग्रह धांवून आल्यामुळेंच कीं काय त्या लेखाचे छापील कागद लवकरच मला सांपडले. शिवाजीमहाराजांचें अस्सल पत्र सुद्धां संशोधक जेवढ्या उत्कंठेनें वाचणार नाहीं तेवढ्या उत्साहानें मीं तो लेख वाचूं लागलों.

पण हा उत्साहाचा पारा लगेच भराभर खालीं उतरूं लागला. लेख संपविल्यावर तर गारच झालों मी! दुसऱ्या कुणाचा तरी लेख मीं चुकून वाचला नाहीं ना अशी शंकाही आली. मुद्दाम लेखाच्या मथळ्याखालीं पाहिलें. तिथें माझेंच नांव छापलें होतें कीं! वाटलें—मुद्रकाला सैतान म्हणतात तें कांहीं खोटें नाहीं. दिलें असेल त्यानें कुठें तरी माझें नांव दडपून. पण—जागी झालेली स्मरणशक्ति झोंपीं कशी जाणार? गडकऱ्यांच्या गोकुळाच्या भाग्याचा क्षणभर हेवा वाटला मला. भाषा, विचार, कल्पना विशेष असें कांहींच दिसेना त्या लेखांत मला. आणि हाच लेख लिहिल्याच्या अभिमानानें बारा वर्षांपूर्वी मी धुंद झालों होतों. बारा वर्षांपूर्वीची गोष्ट कशाला? घटकेपूर्वी त्या विद्वानांचें पत्र आल्यामुळें किती फुगून गेलों होतों मी!

बारा वर्षें! एक तप! बारा वर्षांना तप कां म्हणतात, हें आतां कळलें मला. जीवित अधिक अधिक शुद्ध व्हावें म्हणून गिरिकंदरांत पूर्वींचे ऋषी तपश्चर्या करीत. सामान्य मनुष्याच्या आयुष्यांत काळही तेंच कार्य करीत नाहीं का? गिरिगव्हरांत एकांतवासांत राहणाऱ्या माणसांच्या मनांतला अहंकार खरोखरच गळून जात असला पाहिजे. गगनचुंबी शिखरें आणि पर्वतांच्या अंगाखांद्यावर बागडणाऱ्या वृक्षलता यांच्यापुढें त्याला आपली पर्णकुटिका तृणवत् वाटली तर त्यांत नवल कसलें? प्रातःकाळीं पृथ्वीच्या अंगाला पुष्पसुगंधांचीं उटणीं लावून उषेच्या सुवर्णरसानें सृष्टिमाता तिला न्हाऊं घालीत आहे, हें दृश्य पाहिल्यावर जगांतल्या उत्कृष्ट स्नानगृहांची कुणाला कितीशी किंमत वाटेल? वनदेवतांच्या मधुर स्पर्शांतून ज्यांना अमृत मिळालें अशा पिकलेल्या फळांची बरोबरी बासुंदी अगर

वियाणी करूं शकेल हें खरेंच वाटत नाहीं मला आणि दुःखानें दग्ध होणाऱ्या मनुष्याच्या जीवनाला संजीवन देणारें तें सृष्टिसौंदर्य ! ऋषिमुनींनीं तपश्चर्येकरतां निवडलेलीं स्थळें म्हणजे सौंदर्यदेवतांचीं माहेरघरेंच नव्हत काय ? सकाळ-सायंकाळ विहंगमांच्या पार्श्वसंगीतानें युक्त असे आकाशांत दाखविले जाणारे विविधरंगी चित्रपट—त्यांच्या तोडीचें एक तरी चित्र मनुष्य निर्माण करूं शकेल काय ? मलबारहिलवरील बंगल्यांत राहून पॅरिसहून आपले कपडे धुवून आणणाऱ्या आणि संध्यारंग ही मद्यपानाला अनुकूल पार्श्वभूमि आहे, हें तत्त्व अंमलांत आणून अर्धनग्न पऱ्यांच्या नृत्यचित्रपटाला जाणारा एखादा आधुनिक ययाति माझ्या वरील गोष्टी मान्य करणार नाहीं हें खरें. पण त्यालाही हें कबूल केलेंच पाहिजे कीं, मनुष्याचा अहंकार समाजांतच वाढतो. अरण्यांत एखादा सम्राट मरून पडला तरी फुलें हंसतच राहतील आणि पांखरांच्या मधुर संगीतांत क्षणभरही खंड पडणार नाहीं.

पण वनवास हा कांहीं सामान्य मनुष्याच्या मनःशुद्धीचा मार्ग नव्हे. सिंह गुहेंत राहूं शकतो; परंतु हरिणांना कळप केल्यावांचून गत्यंतर नसतें. मनुष्याच्या या समाजप्रियतेनें मानव जातीची जशी प्रगति झाली तसे व्यक्तींचे मनोविकारही गुंतागुंतीचे होत गेले. माझेंच पाहा ना ! बारा वर्षांपूर्वी लिहिलेल्या त्या लेखाचा अकारण केवढा अभिमान वाटला मला ! उलट वेद रचणाऱ्या ऋषींनीं आपलें नांवगांवसुद्धां त्यांत धड नमूद केलेलें नाहीं.

असल्या अहंकाराला अनेकदां अगदीं हास्यास्पद स्वरूप येतें त्यांत आश्चर्य तें कसलें ? चेकॉव्हची एक गोष्ट आहे. तिच्यांतील नायकाला अपघात होतो. त्याचे आईबाप काळजींत पडतात मोठ्या. पण दुसरे दिवशीं ती लंगडी स्वारी स्वतःच वर्तमानपत्राचा एक अंक हातांत घेऊन आनंदानें नाचूं लागते. अमक्या अमक्याला अपघात झाला म्हणून त्याचें नांव त्यांत छापून आलेलें असतें ! वर्तमानपत्रांत ठळक अक्षरांनीं नांव यावें म्हणून आत्महत्यासुद्धां करायला चुकायचे नाहींत असले लोक ! ‘ तेवढंच ज्ञानप्रकाशांत ’ म्हणून दिवाकरांची एक नाटय-छटा आहे ना ? तिच्यांतील पंडितमहाशय एका प्रसिद्ध बाईच्या स्मशानयात्रेला गेलेंच पाहिजे असें म्हणतात. कां ? तर दुसरे दिवशींच्या ज्ञानप्रकाशांत आपलें नांव छापून यावें म्हणून. बिचाऱ्याला हेंही कळत नाहीं कीं तिसरे दिवशीं वाण्याच्या दुकानांतून त्याच्या घरीं येणारा खजूर त्याच अंकांतून बांधून येणार आहे

आयुष्यांतल्या एका तपाचें महत्त्व या दृष्टीनें फार मोठें आहे. बारा वर्षांनीं आपण आपल्याकडेच इतक्या दुरून पाहत असतों कीं प्रसंगीं आपली आपल्याला ओळखही पटत नाहीं. वाहतें पाणी आपोआप शुद्ध होतें ना ? अहंकारानें गढूळ-लेलें मनही कालप्रवाहांत तसेंच शुद्ध होतें. माझ्या एका लेखकमित्राला आपण लिहिलेल्या ओळीन् ओळीचा अभिमान असे. आपलें लेखन म्हणजे अगदीं अजरामर वाङ्मय आहे अशी त्याची कल्पना. मुंबईला गेल्यावर तो नि मी सहज एका जुन्या पुस्तकाच्या दुकानांत गेलों. रद्दीच्या भावानें देण्याकरितां दुकानदारानें काढलेलीं पुस्तकें त्यानें पाहिलीं मात्र—त्याची हृदयक्रिया एकदम बंद पडते कीं काय असें वाटलें मला ! त्याच्या अजरामर वाङ्मयानें ती रद्दी वाढविण्याला बरीच मदत केली होती. 'अशि कशी धुंद मस्तींत चालशी मुली ?' हा प्रश्न जिला विचारावासा वाटतो अशी एक तरी तरुणी प्रत्येकाच्या परिचयाची असेल. पुरुषाचें हृदय म्हणजे कचकड्याचें खेळणें वाटतें तिला. पुन्हां बारा वर्षांनीं तिला पाहा, धुंदीबरोबर तिची मुद्राही उतरलेली दिसेल. किंबहुना, अनेक पुरुषांचीं हृदयें पायीं तुडविणारी ती तरुणी एका पतीचें मन मुठींत कसें ठेवावें या विवंचनेंत पडली आहे, असें आढळून येईल.

खरेंच ! एका तपानें आपली आयुष्याकडे पाहण्याची दृष्टि किती बदलते. जन्मल्या दिवशीं आईचें दूध भरपूर मिळावें यापलीकडे माझी बहुधा अधिक कांहीं अपेक्षा नसावी. पण बाराव्या वर्षी ? वर्गांत पहिला नंबर यावा म्हणून मी सकाळीं थोडा अभ्यास तर करीत असेंच ! पण संध्याकाळीं दत्ताला जाण्याचा माझा नेमही मी सहसा चुकवीत नसें. चोवीसावें वर्ष उगवलें तेव्हां—या गोष्टीचें माझें मलाच हंसूं येऊं लागलें होतें. परीक्षा ? अंः ! नुसती पोपटपंची ! देव ? जगांत देव असता तर हजारों निरपराधी लोकांना ( या यादींत माझें नांव नेहमींच पाहिलें असे हें सांगायला नको ! ) इतकीं विलक्षण दुःखें भोगावीं लागलीं असतीं का ? बस्स ! धर्म ही अफू आहे, असें परवांच कुठेंसें वाचलें मीं ! मग ईश्वर हा गांजा असलाच पाहिजे. लेखक होऊन समाजसुधारणा करणें हेंच आतां आपलें ध्येय ! पण हें ध्येय साध्य करण्यासाठीं दोन गृहस्थांचें साहाय्य जरूर हवें ! एक माझें लेखन छापणारा संपादक आणि दुसरा आपली शकुंतला मला देणारा एखादा कण्वमुनि. समाजसुधारणेसाठीं लेखन करायचें म्हणजे तें ललितच हवें ! आणि लालित्याची कळी सुंदर तरुणीच्या सहवासाखेरीज

उमलणें शक्य आहे काय? भीष्माला ललित लेखक व्हायचें नव्हतें म्हणूनच तो आजन्म ब्रह्मचारी राहूं शकला, असें त्या वेळीं माझें अगदीं ठाम मत झालें होतें.

आणखी एक तप गेलें. त्या वर्षाची दिवाळी म्हणजे भयंकर संकटच वाटलें मला. चिल्ल्यांपिल्ल्यांसाठीं खूप फटाकड्या आणाव्या लागणार होत्या म्हणून नाहीं हं! तेवढ्या बाबतींत देवानें माझ्यावर कृपा केली होती. आमच्या घरच्या पाळ-ण्यांत अनावृष्टि नव्हती, तशी अतिवृष्टिही नव्हती. पण तुम्हीच सांगा, किती किती संपादकांच्या लेखांच्या मागण्या मीं पुरवायच्या? दिवाळींत माझ्या लिहिण्यापासून वाचकांना किती आनंद होत असेल तो कुणाला ठाऊक! पण हल्लीं दिवाळीपूर्वी एक महिनाभर मला मात्र अगदीं सक्तमजुरीची शिक्षा होते. समाजाला तुमच्या लेखांचा फार उपयोग आहे अशा थापा मारतात हे संपादक! अशी वाङ्मयानें समाजसुधारणा होत असती तर मृच्छकटिक नाटकानंतर वेश्यांचा वर्गच अस्तित्वांत राहिला नसता या भरतखंडांत.

आतां लिहायचें खरें! पण तें अमर होण्यासाठीं!

अमर? बारा वर्षांपूर्वींचा हा लेख मीं किती ईर्ष्येनें लिहिला होता. पण माझा मलाच तो आतां वाचवत नाहीं. मग आजचें माझें लेखन आणखी बारा वर्षांनीं मला तरी आवडेल याचा काय नेम आहे? आणखी एक तप—अठ्ठेचाळिसावें वर्ष! हव्यासानें फुलें गोळा करायचीं आणि तीं कोमेजलीं कीं फेंकून द्यायचीं हाच का मानवी जीवनाचा अर्थ? क्षुद्र अहंकाराचें निर्मूलन करण्याच्या दृष्टीनें आयुष्यां-तलें एक एक तप अत्यंत उपयुक्त असेल. पण हृदयाच्या बागेंतलीं उग्र फुलांचीं हीं रोपटीं उपटून टाकल्यावर पुढें काय? नुसती माती पाहत बसायचें? त्यापेक्षां चिमणीं गंधहीन फुलें घेऊन नाचणारीं गवताचीं पातींसुद्धां तिच्यांत डुलत असलेलीं पुरवलीं! भूमीला काय आणि हृदयाला काय, हिरवळीवांचून शोभा नाहीं. अशी हिरवळ—

मी अंतर्मुख होऊन माझ्या आयुष्यांतल्या तीन तपांकडे पाहिलें. दुरून येणारा विविध फुलांचा संमिश्र सुगंध किती सुखकारक वाटला मला. हा रामभाऊ—माझ्या आयुष्यांतलें बकुळीचें झाड. लहानपणीं पीटचा दर एक काळ्या पेन्सिलीचा तुकडा आणि खुर्चीचा दर सबंध दुधी पेन्सिल अशीं तिकिटें लावून त्यानें आणि मीं बालप्रेक्षकांकरितां नाटकें केलीं होतीं, नाहीं? नाटकांच्या त्या गोड आठवणीं-

प्रमाणेंच माझ्या आयुष्यांतल्या अत्यंत कठिण वेळीं माझा पत्ता काढून त्यानें पाठवून दिलेले ते पैसे ! तिकी दिवस झाले त्या गोष्टीला. पण वकुळीच्या फुलांचा सुगंध काळालाही नाहींसा करतां येत नाहीं.

बागेच्या दुसऱ्या बाजूला मी पाहूं लागलों. जाईजुई ? छे ! ही माझी बहीण ! त्या वेळीं भयंकर भासणाऱ्या भविष्यांत माझ्याबरोबर किती हौसेनें उडी घेतली तिनें ! तिच्या पलीकडेच माझी पत्नी उभी आहे. जणूं कांहीं संसाराच्या आट्या-पाट्यांत माझ्या बहिणीनें पोंचविलेलें लोण घेऊनच ती पुढें चालली आहे. डाव जिंकण्याची तिची महत्त्वाकांक्षा पाहून कोंडींत अडकून पडलेल्या माझ्या मनाला केवढा धीर येतो आतांशी.

हें पारिजातकाचें झाड ! उन्हाळा असो, पावसाळा असो, त्याचा बहर खळत नाहीं कधीं. फुलांचा नुसता सडा पडतो खालीं. कुणी वेंचून देवाला वहा, नाहीं तर पायाखालीं तुडवा ! पांढरें फूल, तांबडा देंठ ! हंसरी मुद्रा, तिच्यामागें निर्मल प्रेम ! माझ्या आयुष्यांत दादांचें हें उत्कट प्रेम जर मला आधीं अनुभवायला मिळालें असतें तर–जाऊं द्या ! हीं फुलें आपल्या वांट्याला आलीं हा कांहीं लहानसहान लाभ आहे का ? काळपुरुष आपल्या बारा दांत्यांच्या हत्यारानें माझ्या बागेंतलीं अहंकारासारखीं शेंकडों रोपटीं खुशाल कापून टाकूं दे. या फुलझाडांपुढें त्यांची आठवण सुद्धां होणार नाहीं मला !

हो, पण हा लेख त्या विद्वानांकडे पाठवून द्यायचें विसरतच होतों कीं मी ! पाठविला नाहीं तर रागवायाचे ते ! त्यांच्यासारख्या बड्या धेंडाचा राग—

त्यांच्या रागामुळें असो अगर माझ्या अहंकारामुळें असो, तो लेख मीं पाठविला. मात्र 'सोबत पाठविलेला लेख सामान्य आहे. आपल्याला त्याचा उपयोग होईलसं वाटत नाहीं' असें पत्र लिहिलें तेव्हांच माझें समाधान झालें.

स्वतःविषयीं इतकें प्रामाणिक मत व्यक्त करणारे जगांत कितीसे लोक असतील ? काय मौज आहे पाहा ! मला या प्रामाणिक पत्राचाच अभिमान वाटायला लागला कीं ! बाकी वाटेना म्हणा ? आणखी एका तपानें या पत्राबद्दल मला काय वाटेल हें तुम्हीं आजच सांगूं शकाल.

१९३६

हल्लीं सकाळीं उठल्यावरोबर समोरच्या डोंगरावरून एक चक्कर मारून आल्यावांचून चैनच पडत नाहीं मला. विरही तरुणांना जशी टपालाची वेळ, तशी पेन्शनर वृद्धांना सकाळ विलक्षण हुरहुर लावते. या वेळीं घराबाहेर पडल्यावांचून बरेंच वाटत नाहीं त्यांना. घरांतली सकाळची हवा इतकी दूषित वाटण्यासारखें माझें वय झालें नसल्यामुळें, प्रभातफेरीचें व्रत घेण्याची पाळी माझ्यावर अजून आलेली नाहीं. अर्थात् केवळ फिरण्याची तलफ भागविण्याकरितां मी डोंगरीवर फेरी टाकतों असें सांगितलें तर तें कुणाला खरें वाटेल ?

तिथून दिसणारा सागराचा नील विस्तार पाहून सृष्टिचक्र चालविणाऱ्या महा-शक्तींचें विशाल अंतःकरणच आपण पाहत नाहीं ना असा क्षणभर भास होतो खरा ! पण सायंदेवता सूर्याच्या सुवर्णकलशानें अभिषेक करून त्याच्यावर चित्रविचित्र मेघमालांच्या पुष्पराशी वाहत असतांना जें अद्‌भुतरम्य दृश्य दिसतें, त्याची सर सकाळच्या देखाव्याला कशी येणार ?

या दिवसांत मी डोंगरीवर आदरून जातों तें काजूंच्या झाडांकरितां. वसंत-ऋतूच्या अधिदेवतेला आम्रफुलें अधिक आवडत असतील कदाचित्. पण तिच्या आगमनाची द्वाही फिरवीत काजूंच्या झाडांवर दीपोत्सव करणारे तांबडे पिवळे बोंडूच मला अधिक आवडतात. ही अधिदेवता सिंहासनावर विराजमान होते तेव्हां कुठें आम्रवृक्षांचे नजराणे पुढें येतात. काजूंना ही व्यावहारिक दूरदृष्टि नाहीं. वसंतदेवतेची नुसती चाहूल लागली कीं त्यांचीं अंगें पुलकित होतात. फळांच्या रूपानें तीं आपलें हृद्गतच प्रकट करतात असें मला वाटतें. नाहीं तर बोंडूंवर इतका विलक्षण मोहक रक्तिमा दिसलाच नसता. थोडेसे बोथट असले तरी ते मदनाचेच बाण आहेत. नाहीं का ?

म्हणूनच काजूंनीं भरलेल्या डोंगरीवरून जातांना माझें मन आनंदानें अगदीं भरून जातें. हिरव्या गार झुंबरांत चमकणाऱ्या दीपज्योतीप्रमाणें हिरव्या पानांतून लटकलेले पिवळेधमक बोंडू पाहतांना कोळपलेल्या मोहराची आठवण

सद्धां होत नाहीं. या झाडांचीं कोंवळीं पानें किती नाजुक असतात. जणूं कांहीं जगांत प्रवेश करणाऱ्या बालजीवाच्या हाताचे स्निग्ध तळवेच. एकाद्या सुखी कुटुंबांत राहायला आलेल्या पाहुण्याला विशेष न बोलतांही मुग्ध आनंदाचा लाभ होत नाहीं का? काजूंच्या झाडांतून फिरतांना मलाही तोच अनुभव येतो. किती सूक्ष्ममधुर सुवास साऱ्या वातावरणांत दरवळत असतो या वेळीं. जणूं कांहीं प्रणयिनीच्या 'इश्श' या अस्पष्ट उद्गारांमधली माधुरीच! काजूच्या झाडाचें एकादें पान मर्येच तोडून तें चुरगळण्याचा चाळा हातानें केला तरी किंचित् उग्र पण मोहक अशा सुवासाचाच लाभ होतो. सारीं अत्तरें रद्द वाटतात मला त्या सुगंधापुढें.

पण आज मात्र डोंगरीवरील फेरफटक्यानें कांहीं आनंद झाला नाहीं मला. रात्रीं एक रहस्यमय कथा वाचतां वाचतां झोंपायला उशीर झाला होता. अर्थात् मी लवकर उठलों नाहीं हें कळायला त्या दिवसाचें माझ्या राशीचें भविष्य तुम्ही वाचण्याची जरूरच नाहीं. उजाडतांना टेंकडीवर फेरी टाकून येणाऱ्या क्रमांत खंड पडला. पण एकसारखें चुकल्याचुकल्यासारखें वाटूं लागल्यामुळें शेवटीं ऊन फार झालें होतें तरी माझीं पावलें तिकडे वळलींच. टेंकडी चढायला मीं सुरुवात केली मात्र! मोठमोठे आवाज ऐकूं येऊं लागले. पुढें जाऊन पाहतों तों दोन कुळवाडी बायका काजीखालीं उभ्या राहून जोरजोरानें भांडत आहेत. बहुधा धर्मयुद्ध असावें तें. कारण तोंडाच्या तोफखान्याखेरीज इतर कोणत्याही शस्त्रास्त्राचा त्यांच्याकडून उपयोग केला जात नव्हता! आपल्या काजी चोरल्याच्या त्या एकमेकांवर आरोप करीत होत्या. एखादा कट्टर मार्क्सवादी माझ्याबरोबर असता, तर या भांडणाच्या मुळाशीं असलेल्या आर्थिक प्रश्नावर त्यानें एकदम विदारक प्रकाश टाकला असता यांत शंका नाहीं. पण माझें लक्ष मात्र त्यांच्या शिव्यांकडेच गेलें. अगदीं अस्सल गाळींची लाखोली वाहत होत्या त्या. जे शब्द एरवीं तोंडांतून बाहेर काढायला त्यांना लाज वाटली असती, तेच गलिच्छ शब्द देवाच्या नांवाप्रमाणें अगर एकाद्या रणगर्जनेप्रमाणें त्या वीरश्रीनें पुनः पुन्हां उच्चारीत होत्या!

माझ्यांतला इतिहाससंशोधक एकदम जागृत झाला. खांडगळ्या शिव्यांचें जें अफाट मराठी वाङ्मय आहे त्यांत आईच नायिका होण्याचें कारण 'न मातुः परदैवतम्' हेंच असेल काय? मनुष्याच्या भावनांवरील निकाराचा हल्ला त्याच्या

देवाधर्मावर व पूज्य व्यक्तींवरच चढविला जातो. ‘ जळ्ळा ’ ‘ मेला ’ वगैरे सामान्य शब्दांची उपपत्ति लावणें सोपें होतें ! पण ‘ शिरां पडलां त्येंच्या घरावर ’ या कोंकणी वाक्याच्या उगमाशीं जायला एखादा राजवाडेच पाहिजे असें माझ्या मनानें ठरविलें. शिव्यांच्या बाबतींत कोशकार, लेखक वगैरे लोक वाचकांना फार अन्याय करतात. लहानपणीं वारंवार ऐकलेल्या एका इरसाल शिवीचें पूर्ण ज्ञान करून घेण्याकरितां मी माझ्या एक आण्याच्या क्षणभंगुर इंग्रजी कोशापासून अमरकोशापर्यंत सर्व भाषांतले कोश चाळले. पण सारे बेटे पक्षपाती ! व्यवहारांत उभ्या जन्मांतसुद्धां कुणी जे उच्चारीत नाहीं अशा शब्दांचा आदरसत्कार त्यांनीं केवढ्या तत्परतेनें केला होता. पण ज्या शब्दांची दररोज शेंकडों लोकांना गरज लागते त्यांना मात्र यांच्या घरीं पूर्ण मज्जाव ! जगाच्या उलट्या न्यायाचा बाळपणींच असा विलक्षण कटु अनुभव आला होता मला.

कुठल्याशा राजघराण्यांत एक एवढा मोठा हिरा आहे कीं त्याचा विमा उतरायला जगांतील एकही कंपनी तयार नाहीं म्हणे. साऱ्या कोशांची आपआपल्या भाषेंतील निवडक मुक्ताफळांविषयीं कदाचित् हीच भावना असेल. एखाद्या सभ्य कोशकाराला या शब्दांच्या सहवासानें कोशांतील इतर सोंवळे शब्द बिघडतील अशी भीतिही वाटली असेल ! संशोधकाचें वारें ओसरतांच माझीसुद्धा अशीच स्थिति झाली ना थोडीशी ! ज्या रम्य काव्याचा आस्वाद घेण्याकरितां मी टेंकडीवर येत असें, त्याच्याशीं त्या बीभत्स शिव्या किती विसंगत होत्या ! अहो, शिव्यांना सुद्धां कांहीं काळ वेळ आहेच कीं नाहीं ? हिंवाळ्यांत दाट धुकें पडलें असतांना कावकाव सुरू असलेल्या निष्पर्ण वृक्षांच्या खालीं उभें राहून हवें तर या बायकांनीं भांडायचें होतें. परंतु ‘ वसतऋतु आई आई ’ ही ओळ गद्य माणसाच्याही तोंडून बाहेर पडण्याच्या या रमणीय कालीं अभद्र शिव्या देत बसायचें ? आणि त्याही साध्यासुध्या नव्हेत ! अगदीं अस्सल ! वर्ड्स्वर्थ म्हणतो तें खोटें नाहीं. मनुष्यानेंच जगांतली माणुसकी मारून टाकली आहे. एखाद्या माकडानें हातांतलें रत्न निरुपयोगी म्हणून दूर भिरकावून द्यावें त्याप्रमाणें आपल्या भोंवतालीं पसरलेल्या मधुर काव्याकडे मनुष्यप्राणी जागून बुजून डोळेझांक करतो आणि दुःखी होतो.

‘ शिव्या हें कांहीं काव्य नव्हे कीं काय ? ’ इतका विचित्र प्रश्न माझें मन उत्पन्न करील असें मला कधींच वाटलें नव्हतें. पण मनुष्याच्या दोन मनांपैकीं

जें अवखळ आहे, त्याला मधून मधून असें कांहीं तरी विचारण्याची लहर येतेच येते. या स्वैर, असभ्य मनालाच नीतिशास्त्रज्ञ सदसद्विवेकबुद्धि म्हणतात कीं काय कुणाला ठाऊक ! मात्र माझ्या स्वच्छंदी मनाचा हा प्रश्न विलक्षण असला तरी वेडेपणाचा खास नव्हता. काव्य म्हणजे उत्कट भावनांचा आविष्कार! शिव्यांचा तरी दुसरा काय अर्थ आहे? रागाचा पारा मनाचा जाकोबाबाद झाल्याचें दाखवितो तेव्हांच अस्सल शिव्या तोंडांतून बाहेर पडत नाहींत काय? चहा पितांना, टेनिस खेळतांना, मोटरींतून जातांना मनाविरुद्ध कांहीं घडलें कीं एखादी सौम्यशी शिवी सभ्य माणसाच्या तोंडूनसुद्धां क्वचित् बाहेर पडते. पण एखादे वेळीं चांगला गवईसुद्धां थोडासा बेसूर होतो त्यांतलाच तो प्रकार! शिव्यांची मुसळधार कोसळायला मनुष्याच्या मनाचा उन्हाळा आधीं झालाच पाहिजे हा निसर्गाचा नियम आहे. आणि तसेंच पाहिलें तर शिव्यांतच वीररसाचा उगम नाहीं काय? आपल्यावर झालेल्या अन्यायाचा उघड उघड प्रतिकार करण्याचा पहिला मार्ग दुसऱ्याला शिव्या देणें हा होय.

असें असूनही लहानपणापासून ‘ शिव्या कोणा देऊं नये ’ असें मुलाला पढविण्यांत येतें. डोंगरीवर माझ्या सौंदर्यसमाधीचा भंग करणाऱ्या त्या तोंडाळ बायकांचा मला राग आला याचें कारण लहानपणीं माझ्या मनावर झालेला हा संस्कारच! पण शिव्या न देतां मनांतल्या मनांत राग गिळणें तरी बरें का? अमुक मनुष्य फार शांत आहे असें लोक म्हणतात तेव्हां त्याची भीतिच वाटते मला. या बाहेरून दिसणाऱ्या सुंदर हिरवळीखालीं केवढा ज्वालामुखी रसरसत असेल आणि त्याचा केव्हां स्फोट होईल हें कुणी सांगावें? माझे एक सुशिक्षित मित्र बायकोला एका शब्दानेंही बोलत नाहींत हें पाहून मला फार आश्चर्य वाटे. असा देवमाणूस–देवमाणूस म्हणणें म्हणजे सुद्धां त्याचा अपमान करण्यासारखेंच होतें म्हणा! कारण आपल्या पत्नीला या नाहीं त्या रूपांत ज्यानें छळलें नाहीं अगर तिच्यावर आपला मालकी हक्क गाजविला नाहीं असा देवांत तरी कोण आहे? एके दिवशीं त्यांची पत्नी माझ्या बायकोकडे आयोडिन मागायला आली तेव्हां माझ्या त्या शांतिसागर मित्राचें कोडें मला उलगडलें. या सागराला खळखळाट आवडत नसे हें खरें! पण याचा वचपा होडी अचूक खडकावर आपटून तो भरून काढी. माझे हे मशारनिल्हे मित्र रामदासांच्या वाङ्मयाचे भक्त आहेत. अर्थात्, ‘ क्रियेवीण वाचाळता व्यर्थ आहे ’ ही उक्ति त्यांनीं घरापासूनच

आचारणांत आणावी यांत नवल कसलें? दानाप्रमाणें तत्त्वज्ञानाचीही अंमलबजावणी आपल्या घरांत प्रथम होणें हेंच प्रामाणिकपणाचें लक्षण आहे.

आधुनिक मनुष्य म्हणून या गृहस्थांची गोष्ट सोडून दिली तरी शांतिब्रह्म म्हणून गाजलेले पूर्वीचे ऋषी तरी काय करीत असत? अलीकडच्या कित्येक वर्तमानपत्रांना दुसऱ्याची बदनामी करून विनशर्त माफी मागण्याची जशी संवय लागलेली आहे, तसें जुन्या काळीं अनेक ऋषींना शाप आणि उःशाप देण्यापुढें परमेश्वराचें स्मरणही होत नसे. शाकुंतलांतील दुर्वासाचीच गोष्ट घ्या. स्वारी भिक्षा मागायला आली ती कण्वाच्या आश्रमांत. एकादशीच्या घरीं शिवरात्र म्हणतात ना? बरें, शकुंतलेचें लक्ष आपल्याकडे गेले नाहीं तर मुलगी किंवडी असेल या कल्पनेनें थोडें जोरानें ओरडायचें, फार तर तिच्या जवळ जाऊन तिला दोन संस्कृत शिव्या हांसडायच्या! पण अरण्यांत तपश्चर्या करतांना आंतल्या आंत गिळलेल्या ऋषीच्या रागाला एवढें भान राहावें कुठून? दिलान् बेट्यानें एक शाप आणि निघाला कमंडलु घेऊन.

मराठी भाषेच्या सूक्ष्मतेचें उदाहरण म्हणून 'शिव्याशाप' हा शब्द खरोखरच पुढें करण्याजोगा आहे. शाप म्हणजे देवभाषेंत दिलेल्या भयंकर शिव्याच नव्हेत तर काय? आणि शाप देणाऱ्या ऋषींविषयींचा आपला आदर जर कमी होत नाहीं, तर शिव्या देणाऱ्या माणसांकडे आपण तुच्छतेनें पाहणें रास्त होईल काय? 'बोलेल तो करील काय' ही म्हण लक्षांत घेतल्यास शिव्या देण्यालाच उत्तेजन मिळणें जरूर आहे हें सहज दिसून येईल. शिव्यांच्या रूपानें मनांतील उष्णता बाहेर पडली म्हणजे तापानंतर जशी प्रकृति सुधारते त्याप्रमाणें माणसाचें मनही शांत किंबहुना प्रसन्न होतें. कांहीं लोकांच्या बाबतींत तर ही प्रतिक्रिया इतकी विलक्षण होते कीं दुसऱ्यांना शिव्या दिल्याबद्दल लगेच हीं माणसें स्वतःलाच शिव्या घालूं लागतात. न्यूमोनियाचा ताप उतरतांना नॉर्मलखालीं जातो ना? तसें आहे हें!

'कुणालाही शिव्या देऊं नये' हें तत्त्वज्ञान जर जगानें खरोखरच अंमलांत आणलें असतें तर प्रत्येक देशांतल्या खुनांची संख्या शतपटीनें वाढली असती. एवढेंच नव्हे, तर एक महायुद्ध संपण्यापूर्वीच दुसरें महायुद्ध सुरू होत राहिलें असतें. गुण्यागोविंदानें नांदणारीं कुटुंबें व प्रेमानें रंगून जाणारीं जोडपीं यांना आपल्या सुखाचें बरेंचसें श्रेय उच्चारित-अनुच्चारित शिव्यांनाच द्यावें लागेल.

मनाला लागणारा लाउडस्पीकर जर उद्यां निघाला आणि अबोल्याच्या वेळीं तो पतीनें पत्नीच्या अगर पित्यानें पुत्राच्या मनाला लावला तर आपल्या कानांवर पडणारे उद्गार एकून ही मंडळी स्तंभितच होतील. अर्थात्, तोच लाउडस्पीकर बायकोच्या अगर मुलाच्या हातांत मिळाल्यावर त्यांनाही हुबेहुब तोच अनुभव येईल म्हणा! या अनुभवाचा पहिला घोट कडु वाटला तरी शेवटचा घुटका मधुरच असेल असें मला वाटतें. मनुष्यदेहाच्या दृष्टीनें जग आज एकशेंऐशीं कोटींचा समावेश करण्याइतकें विशाल झालें असलें तरी मनुष्यस्वभावाच्या दृष्टीनें एकापेक्षां अधिक माणसांना पृथ्वी अपुरीच पडते. नऊ महिने एकजीव असलेल्या माय-लेंकरांत अगर मधुरमीलनानें एकजीव झालेल्या प्रणयी दंपतींत सुद्धां कालांतरानें विसंवाद ऊत्पन्न होतोच कीं! भांड्याला भांडें लागलें कीं, आवाज व्हायचा अगर गार-गोटीवर गारगोटी घांसली कीं ठिणग्या उडायच्याच! मग अगणित भिन्न स्वभावांच्या जगांत माणसाच्या तोंडून एखादे वेळीं शिव्या बाहेर पडल्या तर तें स्वाभाविकच नाहीं का?

मनुष्याला सुसंस्कृत करण्याच्या हेतूनें जन्माला आलेल्या अनेक निषेधांपैकीं 'शिव्या कुणा देऊं नये' हा एक आहे हें मलाही मान्य आहे. पण ही निषेधाची मर्यादा लक्ष्मणानें सीतेला घालून दिलेल्या रेषेइतकी संकुचित असणें इष्ट आहे काय? गुलाबाच्या झाडाचे कांटे काढून टाकून बिनकांटयांचीं गुलाबें मिळवूं पाहणाराच्या पदरांत काय पडेल हें लहान मूलही सांगेल. कामक्रोधादि विकारांच्या बाबतींतले आपले सामाजिक व वैयक्तिक निषेध असेच नाहींत का? म्हणे काम-क्रोध आणि मंडळी आपले षड्रिपु आहेत. मला वाटतें ते आपले मित्रच आहेत. या सहा मित्रांत एवढाच दोष आहे कीं, त्यांपैकीं प्रत्येकजण विलक्षण स्वच्छंदी आहे. पण गवई, कवि, चित्रकार वगैरे कलावंत अगर वायुलहरी, पांखरें, बालकें इत्यादि निसर्गदेवतेचीं लाडकीं अपत्यें स्वच्छंदी नि लहरी असतात म्हणून त्यांना कुणी दूर लोटतात कीं काय? उलट त्यांच्या सहवास-सुखासाठीं आपण अगदीं हपापलेलेच असतों! नाहीं का?

कामक्रोधादि मंडळींची मीं मनुष्याच्या मित्रवर्गांत गणना केल्यामुळें अनेक नीतिभक्त माझ्याकडे साशंक दृष्टीनें पाहूं लागतील. 'मन आवरा,' 'संयम करा' इत्यादि मंत्रांच्या शिळाछापाच्या भल्यामोठ्या जाहिराती आयुष्याच्या वळणावळणावर लावल्या नाहींत तर माणसाच्या पशुवृत्तीला उत्तेजन मिळून

प्रत्येक देशाला दंडकारण्याचें स्वरूप येईल असेंच या लोकांना वाटत असावें. आकाशांत फिरणाऱ्या ग्रहांच्या टक्करी होतील म्हणून त्यांना सांखळदंडानें बांधून ठेवण्याची कल्पनासुद्धां त्यांना केव्हां तरी सुचून गेली असेल. बिचाऱ्यांना हेंही कळत नाहीं, कीं स्वच्छंदीपणाखेरीज संयमाला कांहीं अर्थच नाहीं. मोटर सुरू होते न होते तोंच ब्रेक लावणारानें प्रवासाच्या नादालाच लागूं नये. 'कुणाला शिव्या देऊं नये' या हितोपदेशापासून तों 'परस्त्रीकडे पाहूं नये' या उपनिषदापर्यंत इतके नकार नेहमीं मनुष्याच्या कानांवर आदळत असतात कीं, आयुष्याच्या ग्रंथांत नत्राच्या बाराखडीखेरीज दुसरें कांहीं नाहींच अशी त्याची समजूत होऊं लागते. इतके नकारांचे घाव घालून तयार केलेल्या कृत्रिम देवापेक्षां नैसर्गिक मनुष्यच अधिक आनंददायक नाहीं काय ?

मी आतां देवावरच घसरलों असें वाटून सारे नकारवाले नीतिभक्त एकजात मला शिव्या देऊं लागतील हें मला ठाऊक आहे. त्यांच्या शिव्यांचें मी सप्रेम स्वागत करतों. त्या शिव्यांमुळेंच त्यांची माझी समोरासमोर गांठ पडेल तेव्हां मला चोप बसणार नाहीं अशी माझी खात्री आहे.

१९३७

कितीतरी दिवस उत्तर हिंदुस्थानच्या प्रवासाला जायचा बेत चालला होता माझ्या स्नेह्यांचा! उद्यांपासून सकाळीं लवकर उठायचें, नेहमीं खरें बोलायचें, चहा सोडून द्यायचा, इत्यादि अनेक सुंदर संकल्प लहानपणीं मी निजतांना दररोज मनाशीं करीत असें. पण तो उद्यां अजून कांहीं उगवलेला नाहीं. माझ्या स्नेह्यांच्या प्रवासाच्या संकल्पाचीही तीच दशा होते कीं काय अशी मला भीति वाटूं लागली होती. पण माझ्यापेक्षां त्यांचा संकल्प अधिक सत्य असल्यामुळें म्हणा अथवा मोहावर विजय मिळविण्यापेक्षां आगगाडीचें तिकट मिळविणें ही अधिक सोपी गोष्ट असल्यामुळें म्हणा, ते एकदांचे प्रवासाला निघाले.

प्रवासांतलीं विविध रमणीय स्थळें पाहतांना माझे स्नेही किती रंगून जातील याचें चित्र नकळत माझी कल्पना काढूं लागली. प्रीतिलतेवरील अमरपुष्प असलेला ताजमहाल, व्यवहाराला भक्तीच्या जगाशीं जोडणारा लक्ष्मणझूला आणि पुष्पाच्छादित काश्मीर व हिमाच्छादित गिरिशिखरें यांचें सौंदर्य चार घटकांत आत्मसात् करणें कुणाला शक्य तरी आहे का? सुंदर ज्योतीच्या दर्शनानें पतंग वेडा होऊन तिच्या भोंवतीं घिरट्या घालतो ना? मग ज्यांचीं मोहक वर्णनें लहानपणापासून आम्ही तन्मयतेनें वाचीत आलों होतों, ज्यांच्या दर्शनाकरितां निद्रादेवतेनें स्वप्नाच्या पुष्पक विमानांतून आम्हांला अनेकवार दूरवर नेलेंही होतें, ज्यांच्या नुसत्या निर्जीव छायाचित्रांनीं आमचें हृदय फुलून जात असे, तीं सौंदर्याचीं निधानें पाहिल्यावर माझ्या मित्रांचें पाऊल तिथून पुढें पडेल हें शक्यच नव्हतें. या दिव्य सौंदर्याचें दर्शन आपल्याला पुन्हा घडेल याची शाश्वती कुठें असते? साध्या चांदण्या रात्रीचा आनंद लुटतांनाही दत्त कवीनें 'वारंवार! कोठुनी असें दिसणार' हे उद्गार कांहीं उगीच काढले नाहींत.

सौंदर्याच्या सागरांत माझे स्नेही एखाद्या पाणबुडीप्रमाणें विहार करीत असतील, त्यांना पृष्ठभागाचें आतां भानही राहिलें नसेल, अशा कल्पनेंत मी

दंग होतों. इतक्यांत एके दिवशीं मला त्यांचें पत्र आलें. वर छाप काशीचा होता. माझ्या डोळ्यांपुढें एकदम गंगेच्या विशाल प्रवाहांतली पोहण्याची मौज आणि हिंदु विश्वविद्यालयाचा आश्चर्यकारक विस्तार उभा राहिला. लहान मूल नवें खेळणें मिळालें म्हणजे त्याच्याविषयीं जसें एकसारखें आपल्या बोबड्या बोलांनीं बोलत असतें, त्याप्रमाणें माझ्या मित्रांनीं काशींतल्या या सर्व रम्य गोष्टींचें रसाळपणानें पत्रांत वर्णन केलें असेल अशा खात्रीनेंच मीं तें पत्र फोडलें. पण त्यांच्या आरंभींच्याच ओळी अशा होत्या–' काल येथें आलों. लगेच तुम्हांला दिलेल्या पत्त्यावर जाऊन पत्राची चौकशी केली. पत्र नसल्या-मुळें फार निराशा झाली. '

पत्रांत येऊन जाऊन मी काय लिहिणार होतों त्यांना ? ' इकडील सर्व क्षेम ! ' माणकूर आंब्यांच्या राशी ज्याच्यापुढें पडल्या आहेत त्याला शेंदाडाची फोड देण्यांत स्वारस्य कसलें ? दररोज नवनव्या सुंदर स्थळांचें दर्शन घेणाऱ्या माझ्या मित्राला आवडेल असें कांहीं लिहिणें माझ्या आवाक्याबाहेरचें होतें ! म्हणून तर मीं पत्र पाठविलें नव्हतें. पण माझें पत्र नसल्यामुळें त्याला चुटपुट लागली. प्रवासाच्या आनंदांतही–थोडें का होईना–असमाधान उत्पन्न झालें. गॉर्कीच्या Her Lover या गोष्टींतील नायिकेला पूर्वी मी हंसलों होतों ! पण या वेळीं त्या गोष्टीचें मर्म मला पूर्णपणें पटलें. त्या कथेंतील नायिका प्रियकराचीं पत्रें आपल्याला आलीं आहेत अशा कल्पनासुखांत दंग होते आणि दुसऱ्याकडून त्या काल्पनिक पत्रांचीं उत्तरें लिहवून घेते. बाळपणीं मुली बाहुल्यांना थोपटून आपल्या सुप्त मातृभावनेचें समाधान करतातच कीं नाहीं ? गॉर्कीच्या गोष्टींतली कुरूप तरुणी तरी दुसरें काय करीत होती ? काल्पनिक प्रेमपत्रांनीं ती आपल्या तरुण मनाची तृषा शांत करीत होती.

तसें पाहिलें तर त्या बिचारीला हंसण्याचा माझ्यासारख्या सुखवस्तु मनुष्याला काय अधिकार आहे ? एखाद्या दिवशीं माझ्या नांवाचें एकही पत्र नसलें, तर मी सुद्धां क्षणभर उदासच होत नाहीं का ? जणूं कांहीं माझ्या नांवानें पत्र आलें नाहीं तर मला दुपारीं जेवायला मिळणारच नाहीं ! आलेल्या पत्रांना उत्तरें घालतांना कसे नाकीं नऊ येतात ! पण हा अनुभव असूनही अमक्याचें पत्र अजून कां आलें नाहीं ही विवंचना मन नेहमीं करीत असतें. या दृष्टीनें पत्रें अपत्यासारखीं असतात. आयुष्यांत तीं नसलीं तर

मनुष्याला अगदीं चुकल्याचुकल्यासारखें होतें. असलीं कीं त्यांचा व्याप जीवाला पुरे पुरे करून सोडतो !

पत्रांत लिहिण्यासारखें माझ्या किंवा माझ्यासारख्या मंडळींच्या आयुष्यांत कांहींच घडत नसतें, पण माझ्या दत्तक आईला आणि वहिणीला लिहितां येत असतें व त्यांच्या हातचीं पत्रें मला नियमानें येत असतीं, तर माझ्या आठवड्याच्या आनंदांत किती तरी भर पडली असती असेंच मला नेहमीं वाटतें ! सुनेनें अमक्या महिन्यांत सासऱ्याच्या दृष्टीला पडूं नये, तमक्या महिन्यांत सासूचें तोंड पाहूं नये, ( हा नियम बाराही महिने असता तर अनेक सुनांना अधिक बरें वाटलें असतें ! ) इत्यादि जुन्या कल्पना आजच्या घटकेला तरी मला काव्यमय वाटतात ! त्यामुळें बायको माहेरीं जाऊन पतिपत्नींच्या पत्रव्यवहाराला केवढें प्रोत्साहन मिळत असेल ? हो, पण एक गोष्ट विसरत होतों मी ! पन्नास वर्षांपूर्वी लिहितां येणारी पत्नीच दुर्मिळ होती असें नाहीं; पोस्टाचें तिकिट तिच्या हाताला लागणें त्याहूनही दुर्मिळ होतें !

पत्रें या आपल्या आयुष्यांतील तारकाच होत यांत शंका नाहीं. तारकांच्या तेजानें पृथ्वी कांहीं प्रकाशित होत नाहीं. पण भयंकर अंधारानें व्यापून गेलेल्या मनुष्याच्या मनाला त्यांचा केवढा धीर असतो आणि आधार वाटतो. मनुष्याच्या गुप्त मनांत या जगांत आपण अगदीं एकटे आहों ही कल्पना नेहमीं जागृत असते असें मला वाटतें. त्या कल्पनेनें उत्पन्न होणारा विचित्र अस्वस्थपणा आपल्या आवडत्या माणसांचीं पत्रेंच नाहींसा करूं शकतात.

गडकऱ्यांच्या काव्यनाटकांतून इतक्या सुन्दर कल्पना विखुरल्या आहेत कीं उत्कृष्ट म्हणून त्यांतील एकाच कल्पनेचा उल्लेख करणें कठिण आहे असेंच कुणीही रसिक म्हणेल. मला मात्र तसें वाटत नाहीं. नभोमंडळांत अगणित तारका चमकत असल्या तरी शुक्राची चांदणी ओळखायला ज्योतिःशास्त्राचें ज्ञान कशाला हवें ? प्रेमसंन्यासांत जयंत लीलेचें एकही शब्द नसलेलें अगदीं कोरें पत्र वाचीत आहे असा जो प्रसंग आहे, त्याची आठवण इतकीं वर्षें झालीं तरी मी अजून विसरलों नाहीं !

जगांत माणुसकी नाहीं असें अनेक उदाहरणें देऊन जेव्हां कांहीं लोक सांगतात, तेव्हां त्यांना कुणी पत्रेंच लिहीत नसावें अगर पत्रांचा संग्रह न करण्याची अक्षम्य चूक त्यांनीं केली असावी अशी शंका मला येते. मी जेव्हां जेव्हां स्वतःवर

किंवा जगावर कातावतों, तेव्हां तेव्हां माझ्या जुन्या पत्रांचे संग्रह काढून चाळूं लागतों. आपलेपणा, आर्द्रता, सहानुभूति, स्नेह—पृथ्वीच्या पोटांत कितीही खोल पाणी असलें तरी तें बोरिंगच्या यंत्रानें वर आणतां येतें. पत्रेंही मनुष्याच्या हृदयभूमींत लपलेले सर्व कोमल भाव असेच प्रगट करतात. परवां मी आजारी असतांना माझ्या मैत्रिणीनें मला पाठविलेलें हें पत्रच पहाना ! डॉक्टरांच्या इंजेक्शनपेक्षांही अधिक बरें वाटलें मला त्यानें !

माझ्या मैत्रिणीचें पत्र पाहा असें मी म्हणून गेलों. पण त्या अशुद्ध पत्राला हंसाला तुम्हीं कदाचित्. तुम्हीं कांहीं मित्र नाहीं तिचे ! शिवाय तें पत्र जर जसेंच्या तसें मीं छापलें तर गनिमी काव्यानें मी माझी स्तुति लोकांना ऐकवीत आहें असेंही मनांत यायचें एकाद्याच्या ! पण त्यांतल्या त्या दोनच ओळी 'तुम्ही इथं या. खूपखूप हंसूं या आपण. हंसण्यानं निराशेचं सारं वातावरणच आपण बदलून टाकूं. तुमच्या येण्यानं आमच्यापैकीं प्रत्येकाला किती आनंद होतो म्हणून सांगूं ?' या ओळी वाचतांना प्रकृतीच्या अस्वास्थ्याला कंटाळलेल्या माझ्या मनाचें सांत्वन एक प्रौढ मैत्रीण करीत आहे असें मला मुळींच वाटलें नाहीं. अगदीं निराळेंच चित्र उभें राहिलें माझ्या डोळ्यांपुढें. धांवतां धांवतां एक लहान मुलगा जमिनीवर पडतो आणि त्याचा गुडघा फुटतो. आपलें रडें बाहेर फुटूं नये म्हणून तो अगदीं शिकस्त करतो; पण शेवटीं शरीराचा मनावर विजय होतो. मुलगा ओक्साबोक्शीं रडूं लागतांच त्याची बालमैत्रीण त्याच्या-जवळ जाऊन हळूच म्हणते, 'अरे, तें बघ विमान' तो वर पाहतो. विमान नाहीं तरी मैत्रिणीचें प्रेमळ हृदय त्याला दिसतें ! तिला वाईट वाटूं नये म्हणून तो हंसतो आणि त्या आनंदांत गुडघ्याच्या वेदना विसरूनही जातो. पत्रांत प्रगट होणाऱ्या भावापेक्षांही त्यांत लपलेले भावच असेच अधिक मोहक आणि काव्यमय असतात ! अत्तराच्या एका थेंबांत अनेक फुलांचें सुगंधसर्वस्व सांठलेलें असतें. पत्रांतलें एकेक वाक्यही असेंच असतें. नाहीं का ?

माझ्या खोलींत व्यवस्थित ठेवलेलीं कांहीं पुडकीं पाहून परवांच एका पाहु-ण्यांनीं मला प्रश्न केला, 'हीं तुमच्या लेखांचीं हस्तलिखितं वाटतं ?' मी नुसता हंसलों. मला माझ्या लेखनाचा फार फार अभिमान वाटत असावा, असा त्यांनीं त्या हंसण्याचा अर्थ केला. ते जरा मिस्किलपणानेंच म्हणाले, 'हीं पुडकीं सोडून तरी बघतां का कधीं ?' मीं उत्तर दिलें 'हो ! नेहमीं !' त्यांच्या चेहऱ्यावर

अर्थातच आश्चर्य दिसू लागलें. 'यांच्याइतकीं सुंदर हस्तलिखितं साऱ्या जगांत नसतील कुठंही !' या माझ्या उद्गारांनीं तर त्यांच्या आश्चर्याचें रूपांतर प्रच्छन्न तिरस्कारांतच झालें. ते मनांत म्हणाले असतील, 'आत्मस्तुतीलाही कांहीं मर्यादा आहे कीं नाहीं ?'

त्यांना अधिक वेळ संशयांत ठेवणें इष्ट नव्हतें. मीं एक पुडकें सोडून त्यांच्यापुढें ठेवलें. ते जवळ जवळ ओरडलेच 'जुनीं पत्रं !'

माझ्या संग्रहांतल्या या पत्रांना कुणी खुशाल जुनीं म्हणो, मला तीं नित्य नवीनच वाटतात. कालाच्या कठोर स्पर्शाची भीति फुलांना असते, हिरेमाणकांना नाहीं. माझ्या आयुष्यांतील किती तरी अमर क्षणांचे सुंदर पुतळे या पत्रसंग्रहांत आहेत. हें माझ्या बाळपणच्या जिवलग मित्राचें पत्र ! आपल्या कर्तबगारीनें लक्षाधीश झाला आहे तो. माझा पत्ता अगत्यानें मिळवून त्यानें लिहिलेल्या या चार वेड्यावांकड्या ओळींत मूर्तिमंत स्वर्ग अवतरला आहे ! हीं माझ्या पत्नीचीं पत्रें ! असल्या नसल्या चुका काढकाढून मी थट्टा करीन म्हणून माहेरीं गेल्यावर विचारी दहापांच ओळीच लिहायला बसायची ! पण शेवटीं सुनीताचें रूपांतर खंडकाव्यांत व्हायचें कांहीं केल्या चुकत नसे ! आणि हीं माझ्या अनोळखी मित्रांचीं पत्रें— यांची माझी तोंडओळख सुद्धां नाहीं. आगगाडींत एकमेकाशेजारीं बसून कदाचित् एक शब्दही न बोलतां यांपैकीं कित्येकांबरोबर मीं प्रवास केला असेल अगर पुढें करीनही. पण या पत्रांत मानवी हृदयांची केवढी तरी श्रीमंती सहजासहजीं प्रगट झाली आहे. हें माझ्या आजोबांचें पत्र ! दुसऱ्याकडून लिहवलें होतें त्यांनीं पण किती जिव्हाळा भरला आहे त्यांत ! लहानपणीं मीं अवखळपणानें वागलों म्हणजे ज्या प्रेमळ स्वरानें ते मला जवळ बोलावीत आणि ज्या वत्सल स्पर्शानें ते माझ्या पाठीवरून हात फिरवीत तो स्वर या टीचभर पत्रांत मला ऐकूं येत आहे, तो स्पर्शही अंगाला अगदीं गुदगुल्या करीत आहे. आतां आजोबांचा कुटलेला विडा खायला मिळणार असा भासही हें पत्र पाहतां पाहतां मला होतो.

पत्रें हीं जीवनांतलीं भावगीतें आहेत हेंच खरें ! श्यामकांताचें अखेरचें पत्र वाचून अत्यंत करुणोदात्त मधुर गीत ऐकल्याप्रमाणें आपल्या भावना उचंबळून येत नाहींत का ! ज्याला आप्तेष्टांना आणि मित्रमैत्रिणींना पत्रें लिहिण्याचा कंटाळा आला, तो म्हातारा झाला असें खुशाल समजावें. लेनिनला मी महापुरुष मानतों याचें कारण त्यानें दलित वर्गाचा कैवार घेतला, वरिष्ठ वर्गानें आपल्या माणशी

मंत्रांनीं दगड बनविलेल्या जनतेंतून त्यानें तेजस्वी माणसें निर्माण केलीं, हें एकच नाहीं ! दुसरें तितकेंच मोठें कारण आहे. कामाच्या चरकांत रगडून जात असतांनाही मित्रांना पत्रें लिहायला तो कधीं चुकत नसे. अशाच एका पत्राच्या वेळीं तो गॉर्कीला म्हणाला, ' खेडेगांवांतल्या माझ्या मित्राला हें पत्र लिहितोंय मी. त्याला तिथं फार एकटं एकटं वाटतंय्–अगदीं कंटाळून गेला आहे बिचारा ! त्याला बरं कसं वाटेल हें आपण पाहायला नको का ? '

लेनिननें लिहिलेलें हें पत्र जर मला मिळालें, तर कालिदास, शेक्स्पिअर, गॉल्सवर्दी, इब्सेन, कोल्हटकर इत्यादिकांच्या माझ्या आवडत्या पुस्तकांशेजारीं मी तें माझ्या कपाटांत ठेवीन. मग तें अवघ्या चार ओळींचें का असेना ! आणि हें जर खरें, तर प्रवासांतही माझ्या मित्रानें माझ्या पत्राची आतुरतेनें वाट पाहावी हें स्वाभाविकच नव्हतें काय ? सृष्टि आणि कला या अमर पुष्पांनीं नटलेल्या वेली खऱ्या ! पण त्यांनाही जीवन-वृक्षाचा आधार हवाच कीं !

१९३७

# दोन चित्रें

७

शेक्सपिअरनें आयुष्याला रंगभूमीची उपमा दिली आहे. माझे एक गंभीर स्नेही नेहमीं ' संसार ही एक शाळा आहे ' असें म्हणत असतात. या दोघांचींही मतें मला पटत नाहींत. मला वाटतें, जीवन हा एक खेळ आहे. मात्र तो कॅरमचा नसून क्रिकेटचा आहे. आयुष्याच्या मार्गावरील चढउतार, वळणेंवांकें आणि खडेकांटे लक्षांत घेऊनही ही उपमा बरोबर आहे असेंच मी म्हणेन. क्रिकेट हा योगायोगाचा खेळ आहे हें खरें ना ? जीवनही तसेंच नाहीं का ? प्रवास कंटाळवाणा होईल असें वाटत असतांना आगगाडींत अचानक एखादा बालमित्र भेटावा अथवा विशिष्ट व्यक्तीला चुकविण्याकरितां आडरस्त्यानें जायला लागावें तों तीच स्वारी दत्त म्हणून पुढें उभी राहावी असे अनुभव कुणाला आलेले नाहींत ? आतांपर्यंत मला दोनदां सर्पदंश झाला. पहिल्या वेळीं अंधारांत चालणाऱ्या आठ लोकांत मी अगदीं शेवटीं होतों आणि दुसऱ्या खेपेला चौघांत पहिला होतों. योगायोगाशिवाय दुसऱ्या कोणत्या रीतीनें असल्या आपत्तींची उपपत्ति लागणार ? आणि म्हणूनच ज्योतिषावर विश्वास नसतांना सुद्धां मला मधून मधून असें वाटतें कीं, दैवाला मनुष्याच्या दैनंदिन आयुष्याशीं खेळण्यांतही विलक्षण मौज वाटत असावी ! एखादे वेळीं मांजर उंदराला खेळवितें तसें तें क्रूरपणानें वागतें; तर दुसऱ्या वेळीं लहान मूल लपंडाव खेळतें त्याप्रमाणें तें गंमतीनें रंगून जातें.

परवांचीच गोष्ट पाहा ना. कोल्हापुरांत आल्यावर कोणते चित्रपट पाहायला मिळतील याची कांहींच कल्पना मला नव्हती. पण योगायोगानें May-Time हें चित्र त्या वेळीं लागलें आणि मीं तें पाहिलें. चित्रपटसृष्टींतील टेंपो, मिक्सेस, फेड आउट वगैरे अनेक शब्द माझ्या परिचयाचे झाले असले व त्यांचे मराठी प्रतिशब्द बनवून आपली विद्वत्ता सिद्ध करण्याचा मार्ग मला मोह पाडीत असला तरी तें चित्र पाहून मला काय वाटलें याचें वर्णन ' वासंतिक धुंदी घोटाळे अजुनी डोळ्यांत ' या एका ओळीनें करणेंच मला बरें वाटतें. तें चित्र मीं पाहिलें त्या

दिवशीं मला वाटलें कीं इतकीं आकर्षक दृश्यें कितीतरी दिवस आपल्याला पुन्हां पाहायला मिळणार नाहींत. पण खेळकर दैव थोडेंच स्वस्थ बसतें. दुसऱ्याच दिवशीं Mutiny on the Bounty हें चित्र पाहण्याचा योग आला. ' मे टाइमशीं ' या चित्राचें कार्डाचेंही साम्य नव्हतें. कुठें मे पोल भोंवतीचें आबालवृद्धांचें आनदनृत्य आणि कुठें वादळाच्या राक्षसी जबड्यांत भीतीनें थरथर कांपणाऱ्या नौकेंतील माणसांची धांवपळ ! ' मे टाइम ' मध्यें गाण्याच्या मोहिनीनें एकत्रित आणलेल्या कलावंतांची करुण प्रेमकथा होती तर ' म्युटिनी ऑन दी बाउंटी ' मध्यें घराला दुरावलेले खलाशी आणि एका बेटांतील वन्य तरुणी यांच्या योगायोगानें पडलेल्या गांठींतच काय तें प्रणयाचें पुसट दर्शन होतें. मृतालाही फटक्यांची शिक्षा फर्मावण्यापर्यंत मजल गेलेला बाउंटीचा कॅप्टन आणि मत्सराच्या ज्वालेचा भडका कुणालाहीं दिसूं नये म्हणून पाठमोरा उभा राहून पिस्तुलाचा विचार करणारा मे टाइममधील नायिकेचा पति यांतही काय थोडें अंतर आहे ? एक चित्र अणुरेणूंना फुलविणाऱ्या फुलांचें होतें तर दुसरें अंतराळाला ग्रासूं पाहणाऱ्या पर्वतमय लाटांचें होतें.

पण हें दुसरें चित्र पाहून घरीं परत येतांना आधल्या दिवशीं इतकेंच माझें मन प्रफुल्लित झालें. डोळ्यांतील वासंतिक धुंदी उतरायच्या आधींच वर्षाकाळचा उन्माद तेथें नाचूं लागला. माझ्या मनांत आलें, फेस हीं लाटांचीं फुलेंच नाहींत का ? मे पोल आणि जहाजाचें शीड यांत किती तरी साम्य आहे ! लाटांवर हेलकावे खाणारी नौका हा आकाशाला न टांगलेला असा झोलाच नाहीं तर काय ? दोन्ही चित्रांतल्या अनेक गोष्टींत बाह्यतः विरोध असला तरी अंतरंगांत साम्य आहे असें मला भासूं लागलें. आणि मला वाटलें, ' हें चित्र पाहा आणि हें चित्र पाहा,' असे उद्गार काढणारा शेक्स्पिअर खरोखरच चुकला ! बाप व चुलता यांच्या चित्रांकडे बोट दाखवून आईची निर्भत्सना करतांना हॅम्लेट वरील उद्गार काढतो. हॅम्लेटच्या आईनें नवऱ्याला विष घालण्याच्या कामीं दीराला साहाय्य करून नंतर त्याच्याशीं लग्न केलें ही गोष्ट मानवी भावनांच्या दृष्टीनें किळसवाणी तर खरीच ! पण शेक्स्पिअरनें हॅम्लेटच्या तोंडून आपल्या चुलत्याच्या रूपाची जी निंदा करविली आहे ती कांहीं त्यामुळें बरोबर ठरत नाहीं. तो एक कुरूप कावळा असता तर ही हंसी त्याच्या प्रेमापायीं इतकी पागल झालीच नसती ! हॅम्लेटच्या बापाचें शूरसुंदर व धीरगंभीर म्हणून वर्णन करायचें ठरतांच, शेक्स्पिअरनें त्याच्या चुलत्याला

जगांतला सगळा कुरूपपणा बहाल केला ! जणूं कांहीं अंतरंगाचा विलक्षण विरोध असूनही दोन चित्रें सुंदर असूंच शकत नाहींत !

बाकी शेक्स्पिअरला दोष देण्यांत फारसा अर्थ नाहीं म्हणा. मनुष्यस्वभावच तसा आहे. आपल्या आवडीची गोष्ट आपल्याला सुंदर भासते ! एवढेंच नव्हे तर तिच्यापेक्षां निराळ्या असलेल्या गोष्टी आपल्याला वाईट दिसूं लागतात. 'आपला तो बाब्या आणि लोकांचा तो कारटा' ही म्हण कांहीं केवळ आईच्या अंधप्रेमामुळेंच जन्माला आली नाहीं. तिचें मूळ सारें जग आपल्या मनाइतकें संकुचित करून घेणाऱ्या मानवी मनोवृत्तींत आहे. माझ्या लहानपणीं विद्यार्थिवृंदांत टिळक-गोखले वाद जोरजोरानें चालत असे. त्या वेळीं टिळकभक्त गोखल्यांवर जो चिखल उडवीत असत आणि गोखल्यांचे अनुयायी टिळकांवर जे निखारे फेकीत त्यांची आठवण झाली म्हणजे मनुष्य इतका मूर्ख कसा होतो याचें आतां मला आश्चर्य वाटूं लागतें !

पण हें आश्चर्य लवकरच ओसरतें. मनुष्याचें मन हें इसापनीतींतल्या बेडकासारखें आहे कीं काय कुणाला ठाऊक ! तो बेडूक बैलाइतका मोठा व्हायला निघाला आणि पोट फुटून मेला. मानवी मन जगाइतकें व्यापक व्हायला निघालें तरी त्याची शक्ति मधेंच कुठें तरी संपते. नुक्तेंच माझ्या एका चित्रकार मित्रानें सुरंगीच्या माळा रस्त्यावरून विकत जाणाऱ्या एका मुलीचें चित्र काढलें. फार फार आवडलें तें मला. त्या चित्राची स्तुति करतां करतां मी म्हणालों, 'या नाजुक फुलांमुळं या चित्राला किती सौंदर्य आलं आहे !'

'फुलांचा काय संबंध आहे इथं ?' त्यानें प्रश्न केला.

'म्हणजे ?' मीं म्हटलें.

'फुलांऐवजीं दुसरी वस्तु रंगवूनही चित्र इतकंच सुंदर वठलं असतं !'

मी पडलों फुलांचा शोकी ! मला तें खरेंच वाटेना ! शेवटीं प्रकरण पैजेवर आलें ! आणि चार दिवसांनीं मी पैज हरलों. माझ्या मित्रानें दुसऱ्या चित्रांतही हुबेहुब तशीच मुलगी काढली होती. फक्त तिच्या हातांत फुलांच्या माळांऐवजीं माशांच्या गाथणी दिल्या होत्या. त्या दोन्ही चित्रांत अधिक सुंदर कोणतें याचा निर्णय अजूनही मला करतां येत नाहीं.

जग हेंही एक आदि आणि अंत नसलेलें चित्रमंदिर आहे. या मंदिरांतला संपूर्ण आनंद एका चित्रांत रंगून दुसऱ्या चित्राकडे ढुंकूनही न पाहणाराला

कधींच मिळत नाहीं. गांधीजींचे सत्याचे प्रयोग वाचण्यांत आल्हाद आहे. आणि ठगाची जबानी वाचण्यांत काय मौज नाहीं ? लहान मुलांचे पापे घेतांना ओंठामध्यें जो लुसलुशीत गोडवा उत्पन्न होतो त्याच्याशीं आजारी आईचे पाय चेपतांना होणाऱ्या सुखाची तुलना करणें काय सर्वस्वीं चुकीचें ठरेल ? माझे दोन स्नेही आहेत. त्यांपैकीं एक इतके बोलके आहेत कीं त्यांच्या तोंडाला घालायला कुलुप कुठून आणावें हेंच मला कळत नाहीं. दुसरे इतके अबोलके आहेत कीं त्यांच्या तोंडाला स्वभावानें घातलेल्या कुलुपावर कोणती किल्ली चालेल याचा कधींच उलगडा होत नाहीं. पण दोघेही माझे जिवलग स्नेही आहेत यांत शंका नाहीं.

जेव्हां जेव्हां त्यांच्या या स्नेहभावाचा मी विचार करतों तेव्हां तेव्हां मला असें वाटतें कीं, जगांतलीं अनेक दुःखें मनुष्याच्या एकांगीपणानेंच निर्माण झालीं आहेत. कित्येकांना वसंत ऋतु फार आवडतो; पण पावसाळ्याचा त्यांना इतका तिटकारा असतो कीं, बोलून सोय नाहीं. बिचाऱ्यांच्या हें लक्षांतही येत नाहीं कीं वसंतांत फक्त झाडांनाच पालवी फुटत असेल ! पण वर्षाकाळांत डोंगरावरले दगडसुद्धां पाझरतात. सूर्योदयाइतकाच सूर्यास्तही सुंदर असत नाहीं का ? गालावरली खळी आणि चेहऱ्यावरील सुरकुती यांचें महत्त्व चित्रकाराच्या दृष्टीनें सारखेंच आहे. आणि म्हणूनच शेक्स्पिअरच्या प्रतिभेविषयीं अतिशय आदर असूनही ‘ हें चित्र पहा आणि हें चित्र पहा ’ या त्याच्या सुप्रसिद्ध उक्तींत मी एका अक्षराचा बदल अवश्य सुचवीन. मी म्हणेन ‘ हें चित्र पहा आणि हेंही चित्र पहा ! ’

१९३७

# शास्त्रीय सत्य

८

‘संध्याकाळींच माणसं फिरायला कां जातात ? ’ मीं मुलांना प्रश्न केला. विशिष्ट उत्तरांऐवजीं मुलांची विचार करण्याची पद्धति पाहायची होती मला. वाटेल तें व्यावहारिक उत्तर स्वीकारण्याची मीं मनाची तयारी करून ठेविली होती. दुपारीं बाहेर पडलें तर छत्री डोक्यावर धरण्याचा उपद्व्याप करावा लागतो, रात्रीं फेरफटका करायाचा म्हटलें तर दिव्याची दगदग चुकत नाहीं, अशीं उत्तरें कुणी दिलीं असतीं तर तीं सुद्धां मीं आनंदानें मान्य केलीं असतीं. असलीं उत्तरें म्हणजे नाचऱ्या पावसाच्या सरीच ! पावसानें ओलेचिंब करून टाकले तरी तो अंगावर घेण्यांत एक प्रकारचा उन्मादक आनंद असतोच कीं नाहीं ?

पण पावसाऐवजीं वीज अंगावर पडली तर तिचें कौतुक कोण करील ? त्या मुलांच्या म्होरक्यानें वाईट भविष्य सांगणाऱ्या ज्योतिषाप्रमाणें चिंताक्रांत चेहरा करून जें उत्तर दिलें, तें ऐकून मी थक्कच झालों ! ‘ संध्याकाळचे सूर्याचे किरण लंब नसून वक्र असल्यामुळें—किरणांच्या रंगांचा परिणाम—त्या हवेमुळें फुप्फुसें शुद्ध होतात म्हणून माणसें संध्याकाळीं फिरायला जातात ! ’ हे अगर असलेच कांहीं तरी शब्द त्याच्या तोंडांतून बाहेर पडले. निद्रित बालकाच्या स्मिताप्रमाणें भासणाऱ्या मंदशीतल वायुलहरी अगर फार दिवसांनीं भेटणाऱ्या पतीच्या स्वागताकरितां हें गुलाबी पातळ नेसूं कीं तो अस्मानी शालू नेसूं अशा कोड्यांत पडलेल्या रमणीप्रमाणें दिसणारी संध्याराणी यांचें काव्यमय वर्णन त्यानें करायला हवें होतें असें मी म्हणत नाहीं. पण वृद्धाच्या दृष्टीप्रमाणें क्षणोक्षणीं निस्तेज होत जाणारें व त्यामुळेंच आपल्या कारुण्यानें मन आकर्षून घेणारें ऊन, घरट्यांच्या ओढीनें उडणारे पांखरांचे थवेच्या थवे, अशा कांहीं दृश्यांचा उल्लेख तो करील असें मला वाटलें होतें. पण–पण काय ? त्या अभ्यासी मुलाचें आरोग्यशास्त्र नुक्तेंच पुरें झालें होतें असें दिसलें. आकाशांत चमकणाऱ्या चांदणीपासून पृथ्वीवर लवलवणाऱ्या गवतापर्यंत त्याच्या शास्त्रीय दृष्टीला रम्य असें कांहींच दिसलें नाहीं.

त्याला फक्त फिरायला जाणाऱ्या माणसांचीं फुप्फुसें दिसत होतीं ! त्या वेळेला त्याला मीं जर ओरडण्याची परवानगी दिली असती तर त्यानें खास गर्जना केली असती, ' शुद्ध हवा की जय ! फुप्फुसें झिंदाबाद ! '

अज्ञानासारखें सुख नाहीं, हें अशा वेळीं खरें वाटूं लागतें. यक्षगंधर्वांच्या अद्भुत सृष्टींत वावरण्याचें ज्या मुलाचें वय, त्यानें रमणीय सायंकालाची स्तुति आरोग्यशास्त्राच्या आधारें करावी ! शास्त्रदृष्टि जर काव्यदृष्टीला इतकी मारक होत असेल तर मानवजातीच्या आनंदांत ती भर घालूं शकेल का ? अधु डोळ्यांच्या बापाचा आनुवंशिक सिद्धांतावर विश्वास असूं नये असें मी म्हणत नाहीं ! पण पहिल्या अपत्याच्या वेळीं तें आंधळें होईल कीं काय या चिंतेनेंच जर तो ग्रस्त झाला, तर हा विश्वास दुःखदायकच नाहीं का ठरणार ? वैद्यकी शिकल्यामुळें जन्माचे रोगी झालेले कित्येक लोक मीं पाहिले आहेत. त्यांच्या प्रकृतींत थोडीशी चलबिचल झाली कीं त्यांच्याभोंवतीं थर्मामिटर, स्टेथॅस्कोप आणि मंडळींची धांवपळ सुरू झालीच म्हणून समजावें. अशा वेळीं शास्त्राची किंमत शून्य वाटूं लागते. आणि शून्यानें केवढ्याही मोठ्या रकमेला गुणिलें तरी हातीं शून्यच यायचें हा नियम बीजगणिताप्रमाणें जीवनांतही सत्य आहे.

शास्त्र, नीति, ज्ञान, सत्य, वगैरे वगैरेंचें मानवी जीवनांत केवढें प्रस्थ आहे ! पण देवता म्हणून ज्यांची आपण पूजा करितों तीं तत्त्वें जर उरावर बसणाऱ्या भुतांसारखीं वागूं लागलीं तर या साऱ्या देवतांचें विसर्जन करण्यांतच आपलें कल्याण नाहीं काय ? इब्सेनच्या ' वाइल्ड डक् ' नाटकांतील नायिकेचा लग्नापूर्वी चोरटा प्रेमसंबंध असतो. नायकाला हें ठाऊक नसतें. लग्नदिवसापासून त्याची पत्नी त्याच्यावर इतकें उत्कट प्रेम करीत असते कीं त्या शीतल विंझणवाऱ्यामुळेंच गरिबीच्या उन्हाळ्यांतही त्याच्या मनाची काहिली होत नाहीं. पुढें फार वर्षांनीं त्याच्या भेटीला आलेल्या त्याच्या दोस्ताला आपल्या मित्राच्या या कौटुंबिक अज्ञानाची कींव येते ! तो त्याचा संसार सत्याच्या पायावर उभारण्याकरितां पत्नीचें रहस्य त्याला सांगतो. सत्य कसलें ? सत्यानाश करणारा सुरुंगच तो ! त्याच्यामुळें त्या सुखी संसारमंदिराच्या क्षणांत ठिकऱ्या ठिकऱ्या उडून जातात !

असलें नग्न सत्य घेऊन काय करायचें आहे ? किंबहुना, माणसाप्रमाणें सत्यही वेषभूषेनेंच अधिक आकर्षक होतें असें मला वाटतें. डॉक्टरांपुढें लाज उपयोगी

नाहीं, त्याप्रमाणें शास्त्रचर्चा करितांना अगदीं शंभर नंबरी सत्य खुशाल वापरा! पण सुखदुःखांच्या लाटांवर नाचणाऱ्या मानवी जीवनाच्या नौकेला असल्या शास्त्रशुद्ध भरताडीची जरूर आहे हें पटतच नाहीं मुळीं मला. मनुष्य माकडापासून झाला, असें डार्विन म्हणतो. कबूल! बिनशर्त मान्य! पण या शास्त्रीय सत्याची आठवण भावी वधू निवडण्याच्या वेळीं जर एखाद्या तरुणाला होऊं लागली तर आमरण ब्रह्मचारी राहण्याशिवाय दुसरा मार्गच उरणार नाहीं त्याला!

याचा अर्थ शास्त्र आणि त्याच्यामुळें प्रकाशित होणारें सत्य जगाच्या संसारांतील अडगळीच्या खोलींत फेकून द्यावें, असा मात्र मुळींच नाहीं. शास्त्रीय सत्यें हीं मानवी जीवनाच्या सागरांतील मोत्यें आहेत, हें मलाही पटतें. मोत्यांची कुडीं मिळेनाशीं झालीं तर, कानांचीं अग्रें झांकणाऱ्या केशरचनेचें कान सपशेल झांकून टाकण्याच्या फॅशनमध्यें रूपांतर करण्याचा भयंकर प्रसंग रमणीगणावर येईल, हेंही मी मान्य करतों. पण समुद्रांत मोत्यें असलीं तरी तीं पाणबुड्यांनीं ठराविक वेळींच काढायचीं असतात. सागरलहरींचा गरबा नाच पाहायला गेलेल्या प्रेक्षकानें तीं मोत्यें काढण्याचा अट्टाहास धरणें वेडेपणाचें नाहीं का होणार? 'कुणि गोविंद घ्या, कुणि गोपाळ घ्या' म्हणून लाटा टिपऱ्यांनीं खेळत असतांना त्यांच्या तालावर गुंगत राहायचें सोडून एखादा पोहणारा जर मोत्यांचा शोध करायला लागला तर त्याच्या हाताला वाळूखेरीज दुसरें काय लागणार?

तुकाराम व्यापारांत कां बुडाला, याचें कारण 'सुख पाहतां जवापाडें! दुःख पर्वताएवढें' या त्याच्या एका ओळीवरून सुद्धां स्पष्ट दिसून येईल. साध्या सुखदुःखाचें मोजमापसुद्धां विचाऱ्याला बरोबर करतां येत नव्हतें! दुःख पर्वताएवढें असतें तर त्याच्याखालीं चिरडून गेलेल्या मानवजातीनें प्रलयकाल जवळ आणण्याकरितां हरएक प्रयत्न केले असते. काय म्हणे, सुख जवाएवढें! ईश्वरसाक्ष खोटें बोलणारा साक्षीदार तरी याच्यापेक्षां अधिक खोटें असें काय सांगूं शकेल? गळून गेलेल्या शरीराला मातेच्या प्रेमळ स्पर्शाप्रमाणें भासणाऱ्या निद्रेचें सुख ज्यानें अनुभविलें नाहीं असा एक तरी मनुष्य जगांत आहे काय? पहिल्या झोपेनंतर थोडीशी जाग आली असतांना गंधर्वनगरीप्रमाणें दिसणारी चांदणी रात्र, प्रातःकालीं आपल्याबरोबर डोळे उघडून आनंदानें हंसणारें आकाश, दुपारच्या वेळीं रुसून बसणाऱ्या पोटाची समजूत घालणारी गोड भाकरी, यांपैकीं एक एक गोष्ट म्हणजे सुखाचें कारंजेंच नाहीं का? जनसमूहानें जयघोषानें चालविलेलें

भजन ऐकतांना अगर एखाद्या लहान मुलाचा मुका घेतांना होणारा आनंद दुःखाच्याच खातीं जमा करायचा कीं काय? जगांतल्या सुखदुःखाचें उदाहरण सोडवितांना तुकोबांचें उत्तर सपशेल चुकलें याचें कारण त्यांची परमार्थाकडे लागलेली दृष्टि हेंच होय. आणि परमार्थ हें तर त्या काळांतलें एकमेव शास्त्रीय सत्य होतें.

शास्त्रीय दृष्टि हवी, पण तिनें काव्यदृष्टीची हकालपट्टी मात्र करूं नये, हा माझा हट्टाहास अनेकांना वेडेपणाचा वाटतो. ते म्हणतात, 'एका म्यानांत दोन तरवारी कधीं राहिल्या आहेत का?' मी त्यांना उत्तर देतों, 'कधीं कधीं सवती-सवती गुण्यागोविंदानं नांदतांना दिसतातच कीं नाहीं?' पण या वकिली उत्तरानें ज्यांचें समाधान होणार नाहीं त्यांची समजूत खालील युक्तिवादानें खास पटेल. 'शास्त्रीय दृष्टि म्हणजे शंकराचा तृतीय नेत्रच नाहीं का? पुराणांतरीं असं वर्णन आहे कीं शंकराचा हा तिसरा डोळा नेहमीं मिटलेलाच असे. मदनानं अगदीं छळ आरंभिला तेव्हां कैलासनाथानं तो उघडला हें खरं! पण तो किती वेळ? क्षण-भरच! त्रिभुवनसुंदर गौरीची मूर्ति पुढं उभी राहिल्यावर तिसरा डोळा उघडा ठेवण्याइतका भोळा म्हणून गाजलेला शंकरसुद्धां खुळा नव्हता!'

१९३५

म.ग्रं.सं.ठाणे.

## संकेत

१

अगदीं चवताळूनच उठलों मी अंथरुणावरून ! डोळ्याला डोळा लागला नाहीं तों कुठल्याशा भुंग्यानें माझ्या खोलींत प्रवेश करून आपली घरघर सुरू केली होती ! भुंग्याच्या आवाजाला ' गुंजारव ' म्हणून पहिल्यांदा संबोधणारा कवि बराचसा बहिरा असला पाहिजे अशी माझी खात्री होऊन गेली. माझ्या मच्छरदाणीवर येऊन जेव्हां त्यानें आपलें गायन सुरू केलें, तेव्हां मला तर विमानच खालीं उतरू लागल्याचा भास झाला.

माझे डोळे अगदीं पेंगळून गेले होते–आणि हा गांवठी ग्रामोफोन बंद होण्याचें तर कांहींच लक्षण दिसेना ! ताडकन् उठलों, केरसुणी पैदा केली आणि भृंग-राजांचा पाठलाग करून त्यांना यमसदनाला पाठवून दिलें ! आतां शांत झोंप येईल या आशेनें अंथरुणावर मीं अंग टाकलें. पण निद्रा ही प्रीति आणि कीर्ति यांची सख्खी बहीण आहे. अगदीं मुलखाची लहरी ! मी पाठशिवणीचा खेळ खेळूं लागतांच तिनें लपंडावाचा आश्रय केला.

या कुशीवरून त्या कुशीवर होतांना एकदम त्या मघाच्या भुंग्याची मला आठवण झाली. वाटलें, त्या बिचाऱ्याला उगीच मारलें मीं ! त्यापेक्षां मीच कानांत कापसाचे बोळे घालून निजलों असतों तर निदान अहिंसाव्रताचें पालन केल्याचें श्रेय तरी मला मिळालें असतें. मीं भुंग्याला मारलें ही एकच गोष्ट काव्याला ओहटी लागली आहे हें सिद्ध करायला उद्यां पुरे होईल. एवढा शूर दुष्यंत राजा ! पण शकुंतलेला त्रास देणाऱ्या भुंग्याला मारायला कांहीं त्याचा हात धजला नाहीं ! उलट दुष्यंताचें शिफारसपत्र घेऊन तो भुंगा कुठेंही गेला असता तरी त्याला सहज नोकरी मिळाली असती. कारण प्रसंगीं इंद्राच्याही साहाय्याला जाणारा पराक्रमी दुष्यंत त्याला अशी शरणचिठ्ठी लिहून देतो—

' वीरा भ्रमरा, जन्मुनि सार्थक केलं तूं या जगीं ।
वसलों विचारांत आम्हि उगी ॥ '

कदाचित् माझ्या खोलींत आलेला भुंगा दुष्यंताच्या कृपेनें कण्वाच्या आश्रमांत जिवंत राहिलेल्या भुंग्याचाच औरस अगर दत्तक वंशज नसेल कशावरून? दुष्यंताचीच गोष्ट कशाला हवी? सारें संस्कृत काव्यवाङ्मय पाहावें. भुंग्यांच्या विपुल उल्लेखावरून त्याला उद्यानाची उपमा देण्याचा मोह कुणालाही होईल. बरें, शपथेला एका श्लोकांत तरी भुंगा त्रासदायक असतो असें एखाद्या कवीनें म्हणायचें होतें! छे! झाडून साऱ्या संस्कृत कवींचें या भुंग्यावर अगदीं अंधप्रेमच असावें!

रात्रिर्गमिष्यति भविष्यति सुप्रभातम्
भास्वान् उदेष्यति हसिष्यति चक्रवाकम्
कोशंगते मनसि चिन्तयति द्विरेफे
हा हन्त हन्त नलिनीं गजमुज्जहार ॥

हा श्लोकच पाहाना! कमळ संध्याकाळीं मिटतें हें काय कमलिनींत अडकलेल्या या श्लोकांतल्या भुंग्याला ठाऊक नव्हतें? दिवस मावळला तरी हा मूर्ख राहिला कशाला तिथें? 'मोहाचा परिणाम असाच सर्वनाशांत व्हायचा' असें कांहींतरी सनातन तात्पर्य या भुंग्याच्या उदाहरणावरून निघत असतांना, या श्लोककारानें त्याला अगदीं हुतात्मा करून टाकलें आहे! तुरुंगांतून बाहेर सुटणाऱ्या चोराचें देशभक्त म्हणून स्वागत व्हावें अशांतलाच हा प्रकार नाहीं का?

विक्रमोर्वशीयांत ऊर्वशीच्या विरहानें वेडा झालेला राजा भुंग्याला तिची माहिती विचारतो तीसुद्धां किती अदबीनें! हंसाला तो म्हणतो, 'हंस प्रयच्छ मे कान्ता.' पण भुंगा दिसतांच स्वारी नरमते. 'मधुकर मदिराक्ष्याः शंस तस्याः प्रवृत्तिम्.' आणि म्हणे, 'तूं तिला पाहिली असतीस तर या कमळावर तूं आसक्तच झाला नसतास.' तिसरा एक कवि भुंग्याला म्हणतो—

अपसर मधुकर दूरं परिमलबहलेऽपि केतकी गन्धे।
इह नहि मधुकवलाभोऽस्ति—।

पाहा, आधीं सुगंधी केवड्याची निंदा आणि ती एका काळ्या, कर्णकटु आवाज करणाऱ्या विचित्र प्राण्याकरितां! फौजदारी वकील सुद्धां अशी गोष्ट करायला तयार व्हायचा नाहीं! आणि या कवींनी—भावनेचा टेंभा मिरविणाऱ्या

या प्रतिभावंतांनीं-भिकारड्या भुंग्यावर पदोपदीं स्तुतिसुमनें वाहावींत! बिचाऱ्यांच्या ध्यानींमनींही आलें नसेल कीं या सुमनांतला मधु संपतांच हे भुंगे पुन्हां त्यांच्याकडे ढुंकूनही पाहणार नाहींत!

संस्कृत कवींच्या या भृंगभक्तीचें मला तरी एकच कारण दिसतें–संकेतप्रियता, अगदीं अंध अनुकरण! कुणा तरी एका कवीला कुठल्या तरी एका वेळेला भुंग्याचा गुंजारव आवडला आणि त्याच्या कमळावरील आसक्तीचें कौतुक वाटलें! झालें, भुंगा काळा असतो कीं गोरा असतो, त्याचें गायन ठुमरीसारखें लागतें कीं तराण्यासारखें भासतें, सुंदर चतुर प्राणी म्हणून प्राणिसृष्टींत तरी त्याला कांहीं विशेष किंमत आहे कीं काय, याची चौकशी कोण करतो? साऱ्या कवींनीं भुंग्यांचीं स्तुतिस्तोत्रें गायला सुरुवात केली. जों जों भुंग्याचा काव्यांत अधिक उल्लेख होऊं लागला, तों तों वृत्त, कल्पना, भावना याप्रमाणें तोही काव्याचा एक आवश्यक घटक होऊन बसला. कवींचें बहुमत भृंग पक्षाकडे वळलें. मग बहुमत हा अनेकदां मूर्खांचा बाजार होऊं शकतो. याची दखल कोण घेणार?

भुंग्यांविषयींच्या पक्षपातामुळें कवींनीं ज्या अनेक प्राण्यांचा अन्याय केला आहे त्यांतील पांचच माझे साक्षीदार म्हणून मी पुढें करतों. दिव्याभोंवतीं रात्रीं प्रदक्षिणा घालणारीं चिमणीं फुलपांखरें कुणी पाहिलीं नाहींत? दिवसा बिचारीं पोटाच्या पाठीमागें लागून गवताच्या फुलांच्या भोंवतींसुद्धां पिंगा घालीत असतील! पण दीपज्योतीबरोबर त्यांची आत्मज्योतिही प्रज्वलित होते. त्यांना पाहिलें कीं रजनी ही ध्येयाची माता आहे हें तत्काळ पटूं लागतें. त्यांच्या त्या दिव्याभोंवतालच्या प्रदक्षिणा–शिळेवर उभी राहिलेली सतीच काय ती त्यांच्याशीं त्यागाच्या बाबतींत स्पर्धा करूं शकेल. आणि त्यांच्या त्या चिमण्या पंखांचे चित्रविचित्र मोहक रंग-मागें बडोद्याला आम्ही जवाहिरखाना पाहण्याकरितां गेलों होतों आणि परवां मुंबईच्या एका दुकानदारानें तर विविध रंगांच्या आणि किनारींच्या जरीच्या पातळांच्या चक्रव्यूहांतच मला एकदां कोंडलें होतें. पण या दोन्ही वेळीं माझ्या नेत्रांनीं अनुभवलेलें रंगसौंदर्य माझ्या दिव्याभोंवतीं वागडणाऱ्या फुलपांखरांकडे पाहिलें कीं मला अगदीं फिकें वाटूं लागतें.

मीं मुद्दामच सुंदर प्राण्याचें उदाहरण घेतलें असें तुम्हांला वाटत असेल. मासा कांहीं पतंगाइतका मोहक असत नाहीं. पण विरहाचें वर्णन करतांना 'जळाविण जैशी मासोळी' असें म्हटलें कीं कवींचा माशांशीं संबंध संपला!

तरुणांच्या मनांतील प्रेमभावनांच्या नाजुक हालचालींप्रमाणें पाण्यांत चाललेली त्यांची खळवळ सोडून द्या ! पण जाळ्यांतून बाहेर काढल्यावरही तडफडतांना, अगदीं प्राण सोडतांनाही, त्यांच्यांतले खापीसारखे मासे विद्युद्दीपाप्रमाणें—अगदीं हिऱ्यासारखे चमकतात, हें कितीशा कवींना ठाऊक असेल ? त्यांची ती चमक देशाकरितां फांसावर चढणाऱ्या वीरांच्या नेत्रांतील उज्ज्वल दीप्तीइतकीच आकर्षक असते.

सौंदर्याचा वरदहस्त तर राहूं द्याच, पण साधा स्पर्शही ज्यांना झालेला नाहीं अशा प्राण्यांचा परामर्शसुद्धा कांहीं कमी काव्यमय होणार नाहीं ! हा पाहा कोळी ! ' मॉडर्न रिव्ह्यू ' मधील बंगाली चित्रांवरूनच त्यानें आपलें शरीर बनविलें आहे असा एखाद्याला भास व्हायचा ! तें कांहीं का असेना ! याचा स्पर्श मला नको असला तरी माझ्या खोलीच्या कोपऱ्यांत त्यानें आपला जो नवा बंगला बांधला आहे तो जमीनदोस्त करण्याला मी कांहीं आमच्या मोलकरणीला परवानगी देणार नाहीं ! माझ्या मच्छरदाणीला मानवी भावना असत्या तर या कोपऱ्यांतील कलाकौशल्याला लाजून ती केव्हांच उशींत तोंड खुपसून बसली असती ! त्या दिवशीं टेंकडीवरच्या रस्त्यावर कोळ्याचें केवढें घर पाहिलें मीं ! घर कसलें ? राजवाडाच होता तो. सूर्यकिरणांनीं चमचमणारे त्या राजवाड्याचे चिमणे स्तंभ किती आकर्षक दिसत होते ! सूत काढण्याच्या शर्यतींत जर कोळ्याला भाग घेतां आला असता तर जास्तींत जास्ती नंबराचें सूत काढून त्यानें पहिला नंबर खास पटकावला असता ! पण या कोळ्याला कवितेंत कुठें स्थान आहे ? तर ' एका कोळियानें एकदां आपुलें ' या मराठी यत्तेच्या माजी दुसऱ्या पुस्तकांत !

सुरवंट आणि वाळवी ही मंडळी उपद्रवी असतात. पण दुष्ट मनुष्यांत गुण नसतात असें थोडेंच आहे ! दारू पिऊन बायकोला बडविणारा मनुष्य काय सुरस कादंबरी लिहूं शकत नाहीं ? व्यभिचारी मनुष्य देशभक्त असल्याचा दाखलाही इतिहासाच्या दप्तरीं आहेच ! सुरवंट अंगावर पडला म्हणजे कुत्सित टीकाकारापेक्षांही अधिक त्रास देतो खरा ! पण हें चिमुकलें अस्वल वेलीच्या अग्राला लोंबकळून झोंके घेतें तेव्हां त्याच्याकडे पाहण्याचा मोह कुणाला होणार नाहीं ? गवताच्या चिमण्या पातीच्या टोंकाला जाऊन जणू कांहीं तिचाच एक भाग म्हणून ही स्वारी स्वस्थ बसली म्हणजे तर समाधिस्थ योग्याचीच मला आठवण होते ! वाळवीचेंही तसेंच आहे. थोड्या दिवसांत खुंटीवर ठेवलेल्या

धोतराची मच्छरदाणी आणि मच्छरदाणीच्या चिंध्या करण्यांत ती चतुर असते खरी! पण त्याबरोबरच तिचा गनिमी कावा किती कौतुकास्पद असतो! एके दिवशीं रात्रीं स्वच्छ केर काढून, शेंदरी घालून त्यावर मीं आपली गादी पसरली. दुसरे दिवशीं सकाळीं उठून अंथरुण गुंडाळतों तों शेंदरीला चांगलें छिद्र पडलेलें! 'छिद्रेष्वनर्था वहुलीभवन्ति!' भराभर त्या छिद्रांतून वाळवीची सेना वर येत होती. शाहिस्तेखानावर छापा घालून शिवाजीनें त्याचीं बोटें कशीं कापलीं असतील याची मला त्या वेळीं पूर्ण कल्पना आली!

केवळ संकेताला वळी पडल्यामुळें अशा प्राण्यांच्या सौंदर्याचा अगर चातुर्याचा आपल्या काव्याला उपयोग करण्याऐवजीं भारतीय युद्धापासून दांडीसत्याग्रहापर्यंतचे सारे कवि भुंग्याभोंवतीं पिंगा घालीत बसले आहेत. स्वर्गपाताळांतही संचार करण्याचा जिचा अधिकार ती कल्पकताच जिथें अशा बंधनांत पडते, तिथें पांगळ्या व्यवहाराच्या कपाळीं अंधारकोठडीच यायची! स्वतःच्या मुलांचीं नांवें ठेवायचीं असोत अगर लोकांना नांवें ठेवायचीं असोत, पूर्वसंकेतापलीकडे पाऊल टाकायला कुणीच तयार होत नाहीं. पक्वान्न करायचें असो अथवा प्रेम करायचें असो, तें पूर्वापार पद्धतीनें करायचें हा तर आमचा सामाजिक बाणा! 'साध्याही विषयांत आशय कधीं मोठा किती आढळे' या केशवसुतांच्या ओळींत जीवन उच्चतर करण्याचा महामंत्रच सांगितला आहे खरा! पण साधे विषय असले तरी आंधळ्यांनीं ते पाहायचे कसे? पूर्वज, पुराणें, परिस्थिति, हीं सारीं जणूं कांहीं जीवनाला कोंडून ठेवण्याकरितां एक अभेद्य तट रचीत असतात आणि मग त्या तुरुंगांत वावरणाऱ्या जीवनाला वाटतें—हा तुरुंग म्हणजेच सारें जग!

संकेत हे राजमार्गाप्रमाणें प्रशस्त असतात. त्यामुळें धोपट मार्गानें जाणारांना आणि सोबतीची अपेक्षा करणाऱ्यांना ते आवडावेत हें स्वाभाविकच आहे. राजमार्गाच्या बाजूला असलेलीं तींच तींच घरें आणि तींच तींच दुकानें पाहून कंटाळा आला, तरी नव्या पाऊलवाटेनें जाण्याचा धीरच होत नाहीं बहुतेक माणसांना! त्यांना वाटतें आपण कुठें तरी चुकूं! बिचाऱ्यांना हें कळत नाहीं कीं, जो चुकतो तोच शिकतो! पण पृथ्वीप्रदक्षिणेंत कितीही पुण्य आहे अशी खात्री असली तरी राजमार्ग तयार झाल्यावांचून हे लोक त्या बाबतींत एक पाऊलसुद्धां पुढें टाकणार नाहींत!

खरें जीवन पिंजऱ्यांत नसतें, पिंजऱ्याबाहेर तें नाचत असतें, हें पांखरा-प्रमाणें माणसालाही कळायला हवें, वळायला हवें. आणि म्हणूनच त्या भुंग्याला झोडपल्याबद्दल आतां मला इतकें वाईट वाटत नाहीं. संकेतनिष्ठता झुगारून देण्याचा माझ्या मनानें जो हल्लीं निश्चय केला आहे, त्याचें तें व्यक्त स्वरूप नसेल कशावरून ? कोयता-हातोडा हीं जर शेतकरी-कामकऱ्यांचीं स्फूर्तिदायक प्रतीकें, तर आजपर्यंत कवींनीं अवास्तव स्तोम माजविलेल्या भुंग्याला झोडपणें हेंही माझ्या मनांतील काव्यकल्पनांच्या क्रांतीचें प्रतीक कां होणार नाहीं ? बाकी प्लँचेटवरून बोलतां आल्यास तो दिवंगत भुंगा मला म्हणेल, 'संकेत केले आणि ते अंधपणानें पाळले कवींनीं. पण मेलों मात्र मी ! एकाचा खेळ होतो आणि दुसऱ्याचा जीव जातो !'

लवकरच छानसें स्मारक करण्याचें आश्वासन देऊन या भुंग्याची कशीबशी समजूत घालीन म्हणा मी !

पाहिलेंत ? हें असें होतें ! नाहीं नाहीं म्हटलें तरी संकेताचा केवढा पगडा मनुष्याच्या मनावर असतो. भुंग्याचें स्मारक करण्याचें मीं कबूल केलें खरें ! पण कवीप्रमाणें स्मारकेंही करून होत नाहींत, हें काय मला कळत नाहीं ?

१४.३.१९

म.ग्रं.सं.ठाणें.

## स्मृति-चित्रें

## १०

पंचवीस वर्षांपूर्वीची गोष्ट आहे ही ! पण शहाणपण हें अक्रोडाच्या झाडासारखें असतें. ( वास्तववादी रसिक हो, कृपा करून या झाडाचें वर्णन करायला मला सांगू नका ! ) त्याला फार उशीरां फळें येतात. म्हणजे, त्यावेळींही मी स्वतःला शहाणा समजत होतों आणि आतांही माझा तो समज कायमच आहे. पण माझ्या दृष्टिकोनांत कांहीं अंशांचें अंतर पडलें आहे हें मात्र खरें !

माझे आजोबा बावाकाका मोठ्या रसाळपणानें बोलत असत. त्यांचें संभाषण म्हणजे दिवाळींतला फराळच म्हणाना ! अमुक एक खमंग पदार्थ त्यांत नाहीं असें होत नसे ! सांगली संस्थानचे संस्थापक चिंतामणराव अप्पासाहेब यांच्या वीरश्रीच्या गोष्टी असोत अगर गणपतीच्या देवळांत पुख्खा झोडतांना पराक्रम गाजवणाऱ्या एखाद्या पांडोबाच्या लीला असोत, ते बोलूं लागले म्हणजे सारखें ऐकतच राहावेंसें वाटे. पहांटेच्या साखरझोंपेंत त्यांचें मधुर आणि गंभीर वेदपठण ऐकिलें कीं कुणी तरी प्राचीन ऋषि आपल्या अंथरुणापलीकडे येऊन बसला आहे असा भास होई. पण रात्रीच्या जेवणानंतर जेव्हां त्यांच्या गप्पागोष्टी रंगांत येत, तेव्हां त्यांच्या तोंडावरल्या सुरकुत्याच काय, पण दाढीमिशाही दिसेनाशा होत आणि आपण अगदीं बरोबरीच्या जिवलग दोस्ताच्या गोष्टी ऐकत आहों या भावनेनें मन तल्लीन होई. पहांटेच्या समुद्राचें रात्रीं कारंजें कसें होतें हें कोडें त्या वेळीं मला कधींच उलगडलें नाहीं.

असें असलें तरी बावाकाकांच्या बोलण्याची अधून मधून आम्हीं सर्वच मुलें थट्टा करीत असूं. त्यांच्या नाटकांच्याच गोष्टी पाहा ना ! अण्णा किर्लोस्करांचें सौभद्र बघण्याकरितां आपण थिएटरांत तीन तीन तास आधीं जाऊन बसत असूं, बाहेर उजाडलें तरी नाटकगृहांत अर्जुन-सुभद्रेचें अगर दुष्यंत-शकुंतलेचें लग्नही लागलेलें नसे, भावड्यानें ग्वालेरला स्त्रीवेषांत हळदीकुंकू कसें घेतलें होतें, सुभद्रेच्या कामाप्रमाणेंच भावड्याचें पुंडरीकाचेंही काम किती चांगलें होई आणि

मंजुघोषा नाटकांत गणपतराव जोशी अशी बहार उडवून देत कीं—या आणि असल्या गोष्टी सुरू झाल्या म्हणजे मला वाटे–जुन्या गोष्टींचें स्तोम माजविण्याची म्हाताऱ्या माणसांना खोडच जडते! भावड्या, भावड्या! प्रेमशोधनमधली इंदिरा आणि विद्याहरणांतली देवयानी बाबाकाकांनीं कधीं पाहिली नाहीं! नाहीं तर त्यांना सहज कळलें असतें कीं, बालगंधर्वांचा कोरा करकरीत रुपया बाजारांत आल्यामुळें भावड्याचा जुना बुचडेवाला रुपया आतां तिथें चालणें शक्य नाहीं. गणपतराव जोशांची स्तुति करायची तर ती काय हॅम्लेटवरून करतां येत नव्हती? त्याला जुनीपुराणी मंजुघोषाच कशाला हवी?

प्रीव्हियसला आम्हांला स्कॉटची Ivanoe ही कादंबरी होती. तिच्यांत हेस्टिंग्जच्या लढाईंत माझा पणजोबा फार मोठें धनुष्य घेऊन लढला होता अशी बढाई मारणारें एक पात्र आहे. तें पात्र म्हणजे जगांतल्या साऱ्या म्हाताऱ्यांचें सुंदर विडंबनच आहे असें मला तेव्हां वाटलें. भावबंधनांतल्या धुंडिराजाच्या गोष्टीवेल्हाळपणाला कोणता तरुण हंसला नसेल? जगाच्या बाजारांत नित्य नवीन माल येत असला तरी म्हातारीं माणसें जरीपुराणेवाल्यासारखींच वागत असतात. वार्धक्य म्हणजे जणू कांहीं रस्त्याच्या कडेला थाटलेलें जुन्या पुस्तकांचें दुकानच! त्यांत ‘लग्नाची बेडी’ मिळायची नाहीं! ‘तरुणी-शिक्षक’ नाटिका अगर ‘मोर एल्एल्. बी.’ प्रहसन मात्र हमखास सांपडेल.

पण जुन्या काळच्या गोष्टी उगाळीत बसण्याचा हा माणसांचा नाद त्या वेळीं वाटे तेवढा हास्यास्पद नाहीं असें अलीकडे माझें मत होत चाललें आहे. मुलाच्या बापाला मुलीच्या बापाच्या पिंजऱ्यांत उभें केलें म्हणजे काय चमत्कार घडतो याचें मार्मिक चित्र वरेरकरांनीं काढलें आहे ना? तसाच थोडासा प्रकार आहे हा! कुणीही मनुष्य कधींही स्वतःला म्हातारा मानायला तयार होत नसेल. आजोबा झाल्यानंतरही ‘म्हातारेबुवा’ या संबोधनानें कोल्हटकर किती दचकले होते! हें खरें असलें तरी बाबाकाकांच्या त्या गोष्टींच्या काळापेक्षां मी पंचवीस वर्षांनीं म्हातारा नसलों तरी प्रौढ झालों आहें हें मला कबूल केलेंच पाहिजे. आणि वयाची चाळिशी लागल्याबरोबर मला किती चमत्कार दिसूं लागले आहेत म्हणतां! परवां ‘बुद्धिबळ क्रीडारत्नें’ हें पुस्तक माझ्या हातीं आलें. पुस्तकावरचें चित्र मोठें सूचक आणि सुंदर आहे. पतिराजांची स्वारी बुद्धिबळांच्या खेळांत अगदीं गढून गेली आहे. टेबलावर पटाच्या डाव्या बाजूला चहाचा पेला आहे.

बहुधा रिकामा असावा तो ! टेबलाच्या उजव्या बाजूच्या टोंकाला पत्नीनें ट्रेमध्यें पुन्हां चहा आणून ठेवलेला आहे. पण स्वारीचें लक्ष जिथें बायकोकडेच नाहीं, तिथें चहाची दाद कोण घेणार ? नवऱ्याच्या या निर्विकल्प समाधीचें कौतुक वाटून पत्नी मधुर स्मित करीत आहे. चिमुकल्या मोटरीच्या नादांत गढून गेलेल्या बालकाकडे आई नाहीं का पाहत ? अगदीं तस्सें बघते आहे ती. हो, पतीच्या बुद्धिबळाचें कौतुक बायकोनें नाहीं तर कुणी करायचें ?

ओलेतीवर शिंतोडे उडविणारे अतिसभ्य लोकसुद्धां चारचौघांत बसून हें चित्र पाहायला कमी करणार नाहींत. पण अशा सुंदर चित्राकडे पाहत राहण्याऐवजीं माझें मन भलत्याच चित्रांत दंग झालें. किती जुनें स्मृतिचित्र होतें तें. उणींपुरीं तीस वर्षें होत आलीं असतील. मे महिन्याचे रखरखीत दिवस ! दुपारीं हातावर पाणी पडलें कीं पायांना भयंकर चटके बसत असतांनाही रामभाऊच्या घराकडे मी अनवाणी धांवत जात असें. तिथें बुद्धिबळाची जी बैठक बसे ती संध्याकाळीं सहापर्यंत कांहीं केल्या हलायची नाहीं. खेळांत रामभाऊनें माझ्यावर बुर्जी केली तरी आरडाओरड करण्यांत मीच त्याच्यावर मात करायचा ! आतां रामभाऊ प्रख्यात प्रोफेसर आहे आणि मी प्रसिद्ध लेखक आहें. आम्हीं दोघे एकमेकांना भेटलों कीं सुखदुःखाच्या गोष्टी बोलतों, प्रकृतीची व मुलाबाळांची चौकशी करतों, फार फार तर ' काय लिहितोय्स हल्लीं ' असें तो मला विचारतो आणि मीही त्याच्याकडून शास्त्रीय विषयाची सहज मिळणारी मनोरंजक माहिती ऐकत बसतों. पण दोन दोन तास आमची बैठक झाली तरी बुद्धिबळाविषयीं बिलकुल बोलत नाहीं. असें असूनही त्या वेळीं पायांना चटके देणारी ती गोष्ट आज हृदयाला चटका लावणारी होते, हें आश्चर्य नव्हे का ?

पण या आश्चर्याची परंपराच माझ्या आयुष्यांत आतां सुरू झाली आहे असें दिसतें. बोरकरांच्या काव्यसंग्रहाला काल प्रस्तावना लिहीत होतों मी. त्यांनीं आपल्या 'पिसाट प्रमाद' कवितेचा आरंभ 'अगडबं अगडबं' या शब्दांनीं केला आहे. ते शब्द मनांत घुमूं लागतांच माझ्या भोंवतालचें वातावरण क्षणार्धांत बदललें. काळाच्या प्रवाहाविरुद्ध मानवी कल्पना किती झपाट्यानें पोहत जाते ! एका क्षणांत अठरा वर्षें मागें पडलीं. सावंतवाडीच्या घरांतली ती रात्र ! मी, माझी बहीण आणि माझा धाकटा भाऊ जेवायला बसलों होतों. वाढतां वाढतां काकीनें त्याला कांहींतरी म्हणायला सांगितलें. पहिल्यांदा तो लाजला. पण नंतर

खड्या सुरांत ‘ अगडवं अगडवं वाजे डमरू ! नाचे सदाशिव जगद्गुरु ’ हा आरंभ असलेलें पद त्यानें म्हटलें. तें कुठल्या नाटकांत आहे हें मला माहित नव्हतें आणि आजही ठाऊक नाहीं. पण ‘अगडवं’ ‘अगडवं’ या शब्दांच्या उच्चारानें माझी ती स्मृति हटकून जागृत होते हें मात्र खरें ! यामुळें बोरकरांच्या कवितेंतला कल्पनाविलास पाहण्यापेक्षां माझ्या त्या स्मृतिचित्रांतल्या कारुण्यांतच मी किती तरी क्षण सुन्न होऊन बसलों होतों.

परवां कोल्हापुरलाही असेंच नाहीं का झालें ? चहाचा माझा सातवा कीं आठवा पेला असेल तो ! त्या आठव्या पेल्यावर ‘ Forget me not ’ हीं अक्षरें होतीं. वीस वर्षांपूर्वीं ह्या वाक्याचें भाषांतर स्वयंवरांतल्या ‘ खडा मारायचा नाहीं हं ’ या पद्धतीवर ‘ मला विसरायचं नाहीं हं ’ असें मी करीत असें. त्यावेळीं हे शब्द असलेला चहाचा पेला हातांत असला कीं डोळ्यांपुढें एक अंधुक मधुर स्वप्न तरंगूं लागे. त्या स्वप्नाची स्वामिनी मात्र सदैव अदृश्यच राही. पण त्या दिवशीं ‘ Forget me not’ या अक्षरांनीं अंकित झालेला तो पेला हातांत घेतांच चहा प्यायला माझें मनच घेईना. ‘ विसरूं नका एवढाच त्या शब्दांचा अर्थ ! पण बापूरावांपाशीं आणि उषेजवळ दिवसांतून तीन वेळांपेक्षां अधिक चहा पिणार नाहीं असें मीं कबूल केलें होतें ना ? त्याची आठवण त्या शब्दांनीं मला चटकन् दिली.

आतां आतांशीं लहानसहान गोष्टींनींही अशीं स्मृतिचित्रें माझ्या डोळ्यांपुढें नाचूं लागतात. इतकीं चित्रें मन ठेवतें कुठें आणि या अडगळींतून वेळेवर अगदीं हवें तें निवडून तरी करें आणतें, कुणाला ठाऊक ! पण या साऱ्या गोष्टी यंत्राप्रमाणें सुरळीत चालतात हें मात्र खरें ! आपल्या संग्रहीं जीं स्मृतिचित्रें असतील असें भासतही नाहीं, तीं एका क्षणांत तीन रंगांनीं नटून डोळ्यांपुढें नाचूं लागतात. उत्तररामचरित्राच्या पहिल्या अंकांत रामसीता आपल्या पूर्व आयुष्याचा चित्रपट पाहत असतात असा करुणमधुर प्रसंग आहे. ही कल्पना अत्यंत सुंदर असली, तरी ती चित्रमालिका अकारण लांबविली आहे असा तिच्याविषयीं विद्यार्थिदशेंत माझा भवभूतीवर आक्षेप होता, तो मी आतां आनंदानें मागें घेतों. त्यांतल्या प्रत्येक प्रसंगाकडे रामसीता केवढ्या पर्युत्सुक वृत्तीनें पाहत असतील याची त्या वेळीं मला अंधुकही कल्पना नव्हती. मीं तो अंक बुद्धीनें वाचला होता, भावनेनें नाहीं.

'जीवत्सु तातपादेषु नवे दारपरिग्रहे
मातृभिश्चिन्त्यमानानां ते हि नो दिवसा गताः'

दोन मिमिटांत अर्थ लावून या श्लोकाची तेव्हां रजा घेतली होती मीं ! 'दशरथ जिवंत होता, आमचीं लग्नें नुक्तींच झालीं होतीं आणि सर्व काळजी करायला आया खंबीर होत्या! ते दिवस आतां गेले!' एवढाच रामाच्या या श्लोकाचा तेव्हां अर्थ होता.

'शब्द बापुडे केवळ वारा' या कव्युक्तीचें मर्म तोच श्लोक नंतर आठवूं लागला तेव्हां मला पूर्णपणें कळलें. कॉलेजांत असतांना आपण शब्दांचे अर्थ लावीत असतों. पण त्यांच्या अंतरंगांतला अर्थ पुढें जीवन जगल्यानंतरच कळूं लागतो. शब्दांचे रंग तेव्हांच विटतात–पक्का रंग फक्त एकच! अनुभव–भावना. डोक्यावर वडिलांच्या ममतेचें छत्र नाहीं, आईच्या मायेची पांखर नाहीं, अशा स्थितींत संसाराच्या वैराण वाळवंटांत जेव्हां मी धांवूं लागलों तेव्हां 'ते हि नो दिवसा गताः' हा सबंध संस्कृत वाङ्मयांतला अत्यंत कारुण्यपूर्ण चरण आहे अशी माझी खात्री झाली!

आणि म्हणूनच गोष्टीवेल्हाळ म्हातारीं माणसें पाहून आतां मला हंसूं येत नाहीं. दारांत येऊन उभ्या राहिलेल्या मृत्यूकडे पाठ करून घरांतल्या सर्व वस्तूंकडे–त्या वस्तूंच्या भिंतींवर पडलेल्या काळसर सावल्यांकडे देखील आपुलकीनें पाहणारा वृद्ध हा सहानुभूतीचाच विषय नाहीं का? आज ना उद्यां, आपणालाही परतीराला घेऊन जाणाऱ्या याच नौकेंत बसायचें आहे.

तारुण्याच्या उंबरठ्यावर मनुष्य गोड स्वप्नांत दंग असतो. तीं स्वप्नें संपलीं कीं त्यांची जागा स्मृति भरून काढते, यांत अस्वाभाविक असें काय आहे? माणसाची सावली त्याच्यापुढें पडली अगर मागें पडली तरी ती त्याचीच प्रतिकृति असते ना? मनुष्याचे हातपाय थकले म्हणजे तो सांठविलेल्या पुंजीकडे अधिक आशाळभूतपणानें पाहूं लागतो, हा नुसता व्यावहारिक अनुभव नाहीं; तो मानसिकही आहे! थॉमस मूरनें आपल्या एका करुण–गीताचा प्रारंभ

*Oft in the stilly night*
*Ere slumber's chain has bound me*
*Fond memory brings the light*
*Of other days around me.*

या सुंदर ओळींनीं केला आहे. शाळेंत ही कविता मी प्रथम शिकलों तेव्हां अंथरुणाला पाठ लागतांच मी झोंपीं जात असें. किंबहुना पेंगळून झोकांडे जायला लागल्यावरच मी अंथरुणाला पाठ लावीत असें म्हणाना ! त्यामुळें मूरसारखे कवि असलीं वर्णनें केवळ कल्पनाशक्तीनें करतात असें मला त्या वेळीं वाटे. पण आतां अंथरुणाला पाठ लावतांच, किंबहुना जागृतींतल्या विविध उद्योगांत मग्न असतां-नाही, कैद्याच्या कोठडींत कुठून तरी चांदण्यानें चोरपावलांनीं यावें, त्याप्रमाणें गत आयुष्यांतील स्मृती माझ्या मनांत प्रवेश करतात. मूरनें त्या कवितेंत पुढें केलेलें वर्णन मात्र मला पटत नाहीं. तो म्हणतो—

*When I remember all*
*The friends, so linked together,*
*I' ve seen around me fall,*
*Like leaves in wintry weather*
*I feel like one*
*Who treads alone*
*Some banquet-hall deserted*
*Whose lights are fled,*
*Whose garlands dead*
*And all but he departed !*

एखाद्या मोठ्या समारंभांतल्या पुष्पमाला सुकून जाव्यात, दीपमाला विझून जाव्यात आणि भुताप्रमाणें एकट्या मनुष्यानें त्या जागेंत फिरत राहावें, तशी जुन्या स्मृतींनीं मूरच्या मनाची स्थिति होते. मला अशा वेळीं अगदीं निराळाच भास होतो. दीपमाला शांत झाल्या आहेत, पुष्पमालांचा मंद मंद सुगंध वायुलहरींवरून येत आहे आणि आपल्या जीवनमंदिरांतलीं सारीं स्मृतिचित्रें सजीव होऊन आपल्याभोंवतीं गोड हालचाल करीत आहेत, असें झोंप येण्यापूर्वीं मला वाटूं लागतें. एका चित्राचें हास्य, दुसऱ्याचे गोड शब्द, तिसऱ्याचा प्रेमळ स्पर्श, या सर्वांचें मिळून एक नवीनच अंगाईगीत निर्माण होतें आणि तें ऐकतां ऐकतां बालकाप्रमाणें मी केव्हां झोंपी जातों तें माझें मलाच कळत नाहीं.

१९३७

## रम्य आणि रम्यतम

## ११

मोटर खर्रकन् आवाज करून थांबली. माझ्या छातींत एकदम धस्स झालें. अपघाताच्या भीतीनें नव्हे! मोटर किती नादुरुस्त झाली असेल या विचारानें! एका संस्कृत सुभाषितकारानें भांडण नसलेलें गांव, लबाडी न करणारा दुकानदार, गुंजभरही सोनें न चोरणारा सोनार वगैरे असंभाव्य गोष्टींची एक यादी केली आहे. त्याच्या वेळीं मोटरी असत्या तर या यादींत वाटेंत न बिघडणाऱ्या मोटरीला अग्रपूजेचा मान त्यानें अगत्य दिला असता! केव्हांही पाहा, बहात्तर रोगांपैकीं मोटरीला एकदोन तरी झालेले असायचेच! टायर पंक्चर होणें हा संधिवात मानला, तर पेट्रोल संपणें हा क्षय म्हणतां येईल, एवढाच काय तो फरक. पण त्यामुळें प्रवासांत मधेंच लटकत राहण्याच्या कार्यक्रमांत कांहीं अंतर पडत नाहीं.

मोटरीला बहात्तरांपैकीं कितव्या नंबराचा रोग झाला आहे हें पाहण्याकरितां मीं मोटरहांक्याच्या [illegible]हिऱ्याकडे दृष्टि वळविली. तो गंभीर मुद्रेनें समोर पाहत होता. गीतेंतलें स्थितप्रज्ञाचें वर्णन त्याला तंतोतंत लागू पडलें असतें. मींही समोर पाहिलें. 'नमवी पद्मा भूमि हा चालतांना' अशा थाटांत एक पोलिसदादा मोटरीच्या रोखानें येत होते. ड्रायव्हरनें मागें वळूनही न पाहतां दोनतीन माणसांचीं झटकन् नांवें घेतलीं आणि त्यांना खालीं उतरून चालूं लागण्याचा हुकुम फर्माविला. मोटर थांबवून पोलिसाच्या डोळ्यांत धूळ टाकण्याची ही त्याची मुत्सद्देगिरी पाहून पेशवाईंत जन्म मिळाला असता तर या बुद्धीच्या सागरानें नाना फडणवीसावरही मात केली असती, असा विचार माझ्या मनांत आल्यावांचून राहिला नाहीं. ते विचारे 'पासिंजर' 'कई पलंगीं शयन' या तुकारामाच्या अभंगाची सत्यता विसाव्या शतकांतही कायम राहिलेली पाहून आश्चर्यचकित होत चालूं लागले. पोलिसच्या अंगावरून ते गेले. पण त्याला त्यांची दादच लागली नाहीं. आमच्या ड्रायव्हरनें उगीच मोटर थांबवली. ती अंगावरून गेली असती तरीही समोरून येणाऱ्या त्या महात्म्याला कांहीं पत्ता

लागला नसता, असें या वेळीं मला वाटल्यावांचून राहिलें नाहीं. शेवटीं सिंहाच्या चेहऱ्यानें पण मुंगीच्या चालीनें स्वारी मोटरीजवळ प्राप्त झाली. आंतील उतारूंची खानेसुमारी करण्यांत त्यानें प्रथम आपली सर्व बुद्धिमत्ता खर्च केली. ठरलेल्या संख्येपेक्षां एकही उतारू अधिक नव्हता ! नंतर स्वारीची नजर टपावरील सामानाकडे वळली. पुण्यप्रभाव नाटकांत स्वतःच्या घरांतल्या पेटींत सुदाम आधींच लपून बसलेला असतो व दामिनीचा नवरा बाहेर आला आहे असें वाटून नूपुरही त्याच पेटाऱ्याचा आश्रय घेतो असा गंमतीचा प्रसंग आहे. पोलिसमजकुरांनीं काल रात्रीं पुण्यप्रभाव फुकट पाहिलें असावें व त्यामुळें टपावरील ट्रंकेचा त्यांना संशय आला असावा असें मला प्रथम वाटलें. पण इतक्यांत मागच्या बाजूला उतारूंत कुजबुज सुरू झाली. हल्लीं गोव्यांतून पुष्कळ दारू चोरून इकडच्या बाजूला येते अशी खात्री झाल्यामुळें पोलिसांची दृष्टि सध्यां जरा सूक्ष्म झाली आहे, एवढा निष्कर्ष तिच्यांतून निघाला. इतक्यांत पोलिस महाशयांचें निरीक्षणही संपलें. त्यांनीं एका ट्रंकेकडे बोट करून ड्रायव्हरला विचारलें, 'काय आहे त्यांत ?' ड्रायव्हरनें माझ्याकडे पाहून उत्तर केलें, 'या साहेबांची ब्याग आहे ती.' साहेब आणि पोलिस यांची दृष्टभेट झाली. 'पुस्तकें आहेत त्या ट्रंकेंत' मीं ऐटीनें उत्तर दिलें. तसा कांहीं मी अट्टल खोटें बोलणारा नाहीं. पण प्रवासाला निघालेल्या मनुष्याच्या ट्रंकेंत काय आहे हें अक्षरशः सांगणें म्हणजे सत्यनारायणाला अगर मसाल्याला लागणाऱ्या गोष्टींची यादी करण्याइतकेंच कंटाळवाणें काम होतें. माझें उत्तर ऐकतांच त्या पोलिसाची मुद्रा प्रसन्न झाली. 'कॉलेजांत जातां वाटतं ?' त्यानें गंभीरपणानें प्रश्न केला. हंसत मुद्रेनें मीं उत्तर दिलें 'हो.'

त्यानंतर दोन तीन दिवसांत कितीतरी वेळां ही गोष्ट मीं माझ्या मित्र-मैत्रिणींना सांगितली. मात्र या प्रसंगाचें वर्णन करतांना ड्रायव्हरनें पोलिसांना कसें चकविलें या गोष्टीपेक्षां पोलिस माझ्याकडे पाहून कसा फसला, मला वीस वर्षांचा कॉलेजांत जाणारा विद्यार्थी मानून त्यानें माझ्या ट्रंकेची तपासणी कशी केली नाहीं, या गोष्टीवरच मी अधिक भर देत होतों. केवळ कटकट चुकविण्याकरतां, मी कॉलेजचा विद्यार्थी आहें असें मीं पोलिसाला भासविलें असतें तर तो प्रसंग रंगवून सांगण्यांत माझ्या मनाला इतकी मौज वाटली नसती ! पण मधुर चरण अगर सुंदर कडवें घोळून घोळूनच गाण्यांतला आनंद गायक वाढवीत नाहीं का ?

मनही गायकासारखेंच असतें. चाळिशीच्या घरांत गेलेल्या माझ्यासारख्या प्रौढाला यौवनाचें प्रशस्तिपत्र देतांना आपण या मनुष्याच्या अंतःकरणांतील आनंदाची भावना फुलवीत आहोंत याची त्या पोलिसाला कल्पनाही नसेल. पण माझ्या मनोलतिकेवर त्याच्या साध्या शब्दांनींही फुलोरा फुलला खरा !

दुसऱ्यानें आपल्याला तरुण मानावें ही मनुष्यमात्राची उपजत प्रवृत्तिच आहे. आय्. सी. एस.करितां वय चोरणाऱ्या उमेदवारांपेक्षां कांहीं कारण नसतांना वय चोरणाऱ्या सद्गृहस्थांची ( यांत सद्गृहिणींचाही अंतर्भाव होतोच ) संख्या किती तरी पटींनीं अधिक असेल ! पेन्शनींत जावें लागूं नये म्हणून तारुण्याला मान देणारे नोकर अगर आपल्या वयाच्या आंकड्याकडे पाहून वराचे डोळे पांढरे होऊं नयेत म्हणून यौवनाचा आश्रय करणाऱ्या कुमारिका यांची तारुण्य-भक्ति निरपेक्ष नसते. पण लेखनाच्या धंद्यांत वयोवृद्धत्व हें ज्ञानवृद्धत्व दर्शवीत असूनही, पोलिसानें मला वीस वर्षांचा युवक मानतांच माझें मन कसें प्रफुल्लित होऊन गेलें. असें कां घडावें ? मनुष्यमात्रांत यौवनाविषयीं अहेतुक पण उत्कट लालसा असते हेंच खरें !

दशरथ राजाला डोक्यांतला पहिला पांढरा केस दिसतांच त्यानें वसिष्ठ ऋषींना बोलावून आणून रामाला युवराज म्हणून अभिषेक करण्याची योजना निश्चित केली असें कुठेंसें मीं वाचलें आहे. पण मला तें मुळींच खरें वाटत नाहीं. वार्धक्याच्या निशाणापुढें मनुष्य सुखासुखी आपली मान लववणार नाहीं. वसिष्ठाच्या बोलावण्यच्या आधीं दशरथानें न्हाव्याला बोलावून आणून तो पांढरा केस छाटून टाकण्याची व्यवस्था खचित केली असेल ! केसांचे कलप, दांतांच्या कवळ्या, गंगावनें, इत्यादि जिन्नसांची विक्री करणाऱ्या व्यापाऱ्यांची मुलाखत एखाद्या समाजशास्त्रज्ञानें घेतल्यास माझेंच म्हणणें खरें आहे असें त्याला आढळून येईल. मनुष्यमात्र जगाच्या मोहिनीमंत्रानें नेहमीं भारलेला असतो. त्यामुळें जग त्याला तरुण समजूं लागलें कीं आपण तरुण आहोंत या भावनेंत तोही रमून जातो आणि तारुण्यांतील उमलता उत्साह त्याला प्राप्त होतो.

पण माणसाची ही तारुण्याची आसक्ति चांगली नाहीं असा अनेकांकडून आक्षेप घेतला जातो. ते म्हणतात, भोग भोगून कांहीं भोगलालसा कमी होत नाहीं. ययातीनें आपल्या मुलाचें तारुण्य राज्याच्या मोबदल्यानें विकत घेतलें. पण शेवटीं त्याच्या उपभोगांची कुठें तृप्ति झाली ? व्हॉरनॉफच्या पद्धतीनें मर्कटग्रंथि

बसवून घेणारे वृद्ध कांहीं दिवस प्रणयचेष्टा करूं शकले, तरी शेवटीं त्यांची करुणकथा मूळ पदावर येतेच म्हणे! तरुण म्हणवून घेणाऱ्या मनुष्याच्या हौसेच्या मुळाशीं तरी अतृप्त उपभोगांपेक्षां काय असूं शकणार ?

मला ही विचारसरणीच पटत नाहीं! तारुण्याचा भास मलाही आनंद देतो खरा. पण तो-प्रणयासारख्या विशिष्ट उपभोगांची शक्यता वाढली म्हणून नव्हे! तर जीवन उत्कटतेनें व सहृदयतेनें जगण्याची आपली मर्यादा अजून संपली नाहीं या गोड कल्पनेनें. सतरा वर्षांपूर्वी सावंतवाडीजवळच्या एका टेकडीवर मी आणि माझे मित्र केशवसुतांच्या कविता वाचण्यांत तल्लीन झालों असतांना अकस्मात् मोठा पाऊस आला. त्या पावसाची, पुस्तक सुरक्षित राखण्यापलीकडे, आम्हीं मुळींच पर्वा केली नाहीं. त्या दिवशीं आम्हीं घरीं परतलों तेव्हां केवळ आमचीं हृदयेंच काव्यरसानें आर्द्र झालीं नव्हतीं, तर कपडेही भिजून ओलेचिंब झाले होते! आतां मात्र पावसांत तसें भिजण्याचा धीर होत नाहीं मला! थंडी, पडसें, खोकला, न्युमोनिया वगैरेंची पलटणच्या पलटण एकदम डोळ्यांपुढें उभी राहते. पुढें शिरोड्याला आल्यावर भर मध्यरात्रीं चांदण्यांत समुद्रावर जाण्याचें आम्हीं मित्रमंडळींनीं कसें ठरविलें, त्या रात्रीं कडू कारलें खाण्याच्या पैजेंत मी कसा हरलों नाहीं, समुद्रावरून आम्हीं परत आलों तेव्हां पहांटेची नौबत सुरू झाली असूनही, अंथरुणाला पाठ न लावतां शाळेंत जाऊन मी शिकविण्यांत कसा रंगून गेलों—आतां तो उच्छृंखलपणाही उरला नाहीं आणि त्याच्या पाठीमागें असलेला उत्कट उत्साहही नाहीं. लहानपणीं अगदीं उंच मोटेवरून मीं विहिरींत उड्या टाकल्या आहेत. पण अलीकडे तसा प्रसंग आल्यावरोवर माझ्या मनांत एक प्रकारची भीति उत्पन्न झाल्यावांचून राहत नाहीं.

प्रीति ही तारुण्याची मूर्धाभिषिक्त देवता आहे. उलट वार्धक्यांत भीतीचेंच राज्य वाढत जातें. शारीरिक शक्तीच्या वरील गोष्टी सोडून द्या! पण तारुण्यांतील ध्येयवादाचा उत्साहही पुढें कोमेजून जात नाहीं काय ? विशी पुरी उलटली नाहीं तोंच एका खेड्यांतल्या खाजगी शिक्षणसंस्थेला वाहून घ्यायचें मीं ठरविलें. त्या वेळेपेक्षां आतां अनुकूल परिस्थिति असूनही असल्या नव्या कार्याविषयीं माझें मन साशंक होतें! उंचावरून पुरांत उडी टाकायची असो अथवा उच्च ध्येयासाठीं जीवितसंग्रामांत उडी टाकायची असो, तारुण्यच निधडेपणानें तें काम

करूं शकतें. सर्पाला दोर मानून त्याच्या आधारानें भर मध्यरात्रीं प्रणयिनीच्या मंदिरांत चढणारा तुळशीदास ऐन पंचविशींतला तरुणच असला पाहिजे! चाळिशींत अगर पन्नाशींत पतीचें पत्नीवरील प्रेम कमी होतें अशांतला भाग नाहीं. कदाचित् तें अधिक सात्त्विकही होत असेल. पण अशा पतीला पत्नीला भेटण्याची कितीही तळमळ लागली तरी तो तिनीसांजा होण्याच्या आंतच सासुरवाडीला पोंचण्याची दक्षता घेईल. त्यांतूनही उशीर झालाच, तर तो त्राटिकेंतल्या प्रतापरावाप्रमाणें राजरोस दरवाजा ठोठावील! आडदांडपणानें खिडकींतून चढण्याचा प्रयत्न करणार नाहीं. आणि चुकून खिडकीकडे गेलाच तर तिच्यांतून लोंबकळणाऱ्या दोरीलाच साप मानून तो इतक्या मोठ्यानें ओरडेल कीं घरांतील मंडळीच काय, पण चौकीवरील शिपाईही जागे होऊन तिथें धांवत येतील.

तारुण्य ही पहांटेची स्वप्नसृष्टि आहे, मर्त्य जगाला बिलगलेली यक्षभूमि आहे. आणि म्हणूनच मोटरीची तपासणी करणाऱ्या त्या अनामिक पोलिसानें—थोडा वेळ कां होईना–रम्य तारुण्याचें मोहक वलय माझ्याभोंवतीं निर्माण केल्याबद्दल त्याचे आभार मानल्यावांचून मला राहवत नाहीं. प्रणयकथा व प्रणयगीतें सर्व काळीं सर्व देशांत लोकप्रिय असतात, त्यांचें कारणही तारुण्याची ही अमर तृषाच नाहीं का? आपण अजून शिखरावर आहों, उताराला लागलों नाहीं, आपल्या दृष्टीच्या टप्प्यांत येणारें क्षितिज व्यापक आहे, या आभासानेंही मनुष्याला केवढा उत्साह प्राप्त होतो! तो किती तरी नवे नवे गगनचुंबी संकल्प करूं लागतो. आणि तसेंच पाहिलें तर जीवनाची गोडी सिद्धीपेक्षां संकल्पांनींच वाढविली आहे. आतां जिंकायला जग उरलें नाहीं म्हणून शिकंदर ज्या क्षणीं ढळढळां रडला, त्याच क्षणीं तो वृद्ध झाला अशी इतिहासाची साक्ष आहे. कल्पनेंत रममाण होणारे कवि रम्य तें बाळपण म्हणून अज्ञानमूलक आनंदाची खुशाल स्तुति करोत. सैनिकापासून ग्रंथकारापर्यंत आणि माळिणीपासून राणीपर्यंत सर्वांचीं हृदयें सदैव मूकपणानें गुणगुणत असतात, 'बाळपण रम्य असेल, म्हातारपण हें दुसरं बाळपण असल्यामुळं तेंही रम्य असेल! पण तारुण्य रम्यतम आहे.'

१९३७

## झोंका १२

अगदीं कंटाळून गेलों होतों मी. आणि त्या पत्रांचीं उत्तरें तर उलट डांकेनेंच जायला हवीं होतीं. एक विद्यार्थी पकडला आणि बसविला लिहायला. पडल्या पडल्या मी पत्रांतला मजकूर सांगत होतों. तो सांगतांना कांहींतरी चुकल्याचुकल्यासारखें वाटत होतें यांत संशय नाहीं. टेलिफोनवरून पतिपत्नींचा प्रणय-संवाद कितीही वेळ चालला तरी प्रत्यक्ष भेटींतील मूकसंभाषणाचा आनंद त्यांतून कसा निर्माण होणार? प्रियजनांना लिहावयाचीं पत्रें दुसऱ्याकडून लिहून घेतांना अशीच अतृप्ति वाटते. पण दुधाची तहान चहावर भागविल्याशिवाय गत्यंतरच नव्हतें मला! गणपति मिळाला तेव्हांच व्यासाचें महाभारत लिहून झालें!

सह्या करण्याकरितां तीं ढीगभर पत्रें मी चाळूं लागलों तों मघाशीं चुकल्याचुकल्यासारखें कां वाटत होतें याचा उलगडा एका क्षणांत झाला. प्रत्येक पत्रावर १-५-३७ च्या ऐवजीं १-४-३७ ही तारीख आमच्या गजाननमहाराजांनीं घातली होती. ध चा मा करण्यापैकींच प्रकार होता हा! मेची पहिली तारीख कामगार-दिनाची म्हणजे पर्यायानें विररसाची. पण टांकाच्या फटकाऱ्यानें तिला 'एप्रिल फूल' करण्याचें श्रेय सदरहू बाललेखकानें घेतलें होतें. तब्बल एक महिन्याचें अंतर! एवढ्यांत किती घडामोडी होतात याची त्या विद्यार्थ्याला कल्पनाच नसावी! चैत्री पौर्णिमेला मारुतीनें जन्मतःच सूर्यबिंब धरण्याकरितां बुभुःकार केला. पण आपण चुकून एक महिना मागें गेलों कीं फाल्गुनी पौर्णिमाच गर्जून आपल्यासमोर उभी रहायची! आश्विनांतली अमावास्या लक्ष्मीपूजनाची आहे. मात्र वरच्याप्रमाणें एक महिन्याची चूकभूल झाली, तर तीच सर्वपित्री ठरायची! एकनाथानें हिशेबांतील एका पैची चूक शोधण्याकरितां कितीतरी आण्यांचें दिव्याचें तेल खर्च केलें होतें हें त्या विद्यार्थ्यानें कुठेंच वाचलें नसावें!

तथापि पत्रांतील तारखा दुरुस्त करतां करतां त्या विद्यार्थ्याच्या चुकीविषयीं मला सहानुभूति वाटूं लागली. आजच मे महिना सुरू झालेला! गेले तीस दिवस

तो एप्रिलच्या जगांत होता. त्या जगाचे संस्कार सहजासहजीं कसे पुसले जावेत? पुण्यामुंबईला गेल्यावर पहांटे जाग आली कीं खिडकींतून बाहेर पाहून माडांचे भरदार शेंडे दिसले नाहींत म्हणजे मीही क्षणभर गोंधळून जातोंच कीं नाहीं? मनुष्यप्राणी ज्या परिस्थितीशीं समरस होतो ती क्षणार्धात सोडणें त्याच्या जीवावर येतें. किंबहुना बुद्धीनें ती सोडायचें ठरविलें तरी भावनांचा नाजुक गोफ कांहीं सुखासुखी उलगडत नाहीं. अठ्ठावीस वर्षें ओसाड बेटावर राहिलेल्या रॉबिन्सन क्रूसोला इंग्लंडला परत जाण्याची संधि मिळाली तेव्हां तो सुद्धां तिथल्या झाडांकडे आणि खडकांकडे पाहून ओक्साबोक्शीं रडल्यावांचून राहिला नसेल.

या वृत्तीला संवय म्हणा, पुराणप्रियता म्हणा अथवा रूढीचें दास्य म्हणा, ती प्रत्येक मनुष्यांत असते यांत संशय नाहीं. माझ्या एका मित्राचीच मोठी मजेदार गोष्ट आहे. स्वारी फिरायला गेली म्हणजे विचारब्रह्मांत अशी गुंग होऊन जायची कीं–कोण देहातें सांभाळी? कित्येक वर्षांचें बिऱ्हाड या राजश्रींनीं ज्या दिवशीं सोडलें, त्या दिवशीं एक प्रहसन चांगलेंच रंगलें. अंधार पडल्यावर विचारतंद्रींत गृहस्थाचे पाय वळले ते जुन्या बिऱ्हाडाकडे! हातानें दारावरची विजेची घंटा दाबली, कानांना आंतील चिल्यापिल्यांची किलबिल ऐकूं आली आणि दार उघडतांच आंत शिरून एका पिल्लाला उचलून 'बब्या' म्हणून त्याचा मुकाही घेतला या प्रेमळ पित्यानें. पण प्रथम बब्याच्या चेहऱ्याकडे आणि नंतर त्या तोतया बब्याच्या मातुःश्रींच्या मुखमंडलाकडे दृष्टि जातांच भयंकर गफलत झाल्याची खात्री होऊन स्वारीनें जो सुबाल्या ठोकला–तो वेग तासभर टिकविण्याची शक्ति असती तर ऑलिंपिक सामन्यांत सुद्धां धांवण्याच्या शर्यतींत तो पहिला आला असता! हा प्रसंग आठवला कीं शेक्स्पीअरचें Comedy of Errors आणि गोल्डस्मिथचें She Stoops to Conquer हीं दोन्ही नाटकें माझ्या डोळ्यांपुढें एकदम उभीं राहतात!

पण त्याला एकटयालाच कांहीं आपण हंसायला नको. सहवासानें उत्पन्न होणाऱ्या संवयींचे, परिचयामुळें निर्माण होणाऱ्या प्रेमाचे, आपण सर्वच बंदे गुलाम आहोंत. १९११ सालीं दिल्ली दरबारच्या दिवशीं माझ्या शेंडीचें उच्चाटन करण्याचा समारंभ मीं पार पाडला. पण शिरच्छेदाची शिक्षा झालेला मनुष्यसुद्धां जेवढा विचार करणार नाहीं, तेवढा काथ्याकूट करून मी या सुधारणेला प्रवृत्त झालों होतों. कुणी विचारलें तर माझ्या एका मित्रानें मागें उभें राहून न्हाव्याला

खूण केल्यामुळें शेंडी छाटली गेली असें सांगायलाही मी मुळींच मागेंपुढें पाहत नसें. त्यावेळीं मी बालबच्चा होतों म्हणावें तर पुढें दोन तपांनीं मिशांवर तोच प्रयोग करतांना माझी तशीच केविलवाणी स्थिति झाली ! फक्त लोकांना द्यावयाच्या थापांच्या स्वरूपांत काय फरक पडला असेल तो ! पायजमा आणि डबल ब्रेस्टचा कोट या गोष्टी प्रथम जेव्हां माझ्या अंगावर बेतल्या, तेव्हां मोजमाप घेतां घेतां शिंपीदादा चोरून मिस्किलपणानें माझ्याकडे पाहत नाहीं ना अशी शंका मला किती वेळां आली म्हणतां ! पुरुषासारख्या पुरुषाची साध्या नवीन गोष्टीचा अंगीकार करतांना अशी स्थिति होते. मग बायकांची गोष्ट तर विचारायलाच नको ! इथेंही त्या गजगतीनेंच चालायच्या ! पाठीवर सोडलेली वेणी आणि विनाकच्छ पातळ नेसण्याची पद्धति प्रौढ स्त्रियांना मनांतून काय पसंत पडत नाहीं म्हणतां ? गोष्टच नको ! पण……

पण लोक काय म्हणतील ? जुनें सोडून नव्याचा स्वीकार करतांना लोक काय म्हणतील हा प्रश्न मनांत येणें स्वाभाविक आहे. पण हे नुसते दाखवायचे दांत झाले ! खरोखर मनांतून लोकांची फारशी पर्वा कुणीच करीत नाहीं ! आणि क्षणभर लोकमताला फार महत्त्व आहे असें मानलें तरी आपल्या घरांत तरी आपलेंच राज्य असतें ना ? मग कुठल्याही प्रौढेला पाठीवर सुंदर वेणी सोडून आरशापुढें अगर आपल्या पतीपुढें उभें राहायला काय हरकत आहे ! एरवीं हजार कामें करायला तिला वेळ मिळेल. पण स्वतःच्या मनांत असूनही ही गोष्ट करायला तिचें मन घेणारच नाहीं.

त्याबद्दल मी तिला दोष मात्र देणार नाहीं. कात टाकतांना सापाची प्राणांतिक स्थिति होते म्हणतात. अंगवळणीं पडलेल्या गोष्टी सोडतांना सामान्य मनुष्याचें मनही असेंच भांबावून जातें. आमच्या गांवांत फिरायला जाण्यासारखीं किती तरी रमणीय स्थळें आहेत. पण टेकडी अगर समुद्र सोडून दुसरीकडे कुठेंही गेलें तरी फिरल्याचें समाधानच मिळत नाहीं मला. शिवलीलामृताचा अकरावा अध्यायच मला अधिक आवडतो, याचें तरी दुसरें कारण काय आहे ? खरें म्हटलें तर त्यांतल्या महानंदेच्या आख्यानापेक्षां पुढें आलेलें श्रियाळ–चांगुणेचें आख्यान अधिक रसाळ आहे. पण बहिणीला वाचून दाखविण्याच्या निमित्तानें अकरावा अध्याय इतके वेळां माझ्या डोळ्यांखालून गेला आहे कीं 'हरहर शिव म्हणून । उडी निःशंक घातली' या ओळी आठवतांच चितेच्या भडकलेल्या ज्वाळांनाही

लाजविणारें महानंदेच्या मुखावरील तेज, तिच्या मुखांतील 'हरहर शिव' हे भक्तिभावपूर्ण उद्गार ऐकतांच त्या ज्वालांनाही सुटणारा कंप, सर्व कांहीं एखाद्या कुशल चित्रकारानें रंगविल्याप्रमाणें डोळ्यांना दिसूं लागतें. चिलयाच्या आख्यानाशीं माझा तितका दाट परिचय झाला नाहीं. त्यामुळें त्यांतील चित्रें अधिक रसपूर्ण असूनही मला इतकीं स्पष्ट दिसत नाहींत.

सहवासानें उत्पन्न होणारी ही भावना थोडीफार अंध असते हें मी अमान्य करणार नाहीं. पण या अंध भावनेनेंच जगांतल्या असंख्य घरांत आणि समाजांतल्या किती तरी थरांत आजपर्यंत शांति नांदवली असेल. परिचयाच्या पोटीं जर प्रेम जन्माला आलें नसतें तर पन्नाशीची झुळुक लागल्यावरही घटस्फोटाची मागणी करणारीं दांपत्यें विपुल दिसलीं असतीं. आणि मैत्री या शब्दाला जगांतच नव्हे तर कोशांतही अर्थ उरला नसता ! 'नववधू प्रिया मी बावरतें' ही तांब्यांची सुंदर कविता शृंगारपर असो वा परमार्थपर असो, सहवासानें प्रिय झालेल्या गोष्टीविषयींचा मानवी मनाचा ओढा तिच्यांत किती सुंदर रीतीनें चित्रित केला आहे !

त्या विद्यार्थ्यानें लिहिलेल्या पत्रांतील तारखा दुरुस्त करतां करतां कंटाळलेलें माझें मन म्हणालें, 'मनुष्य स्थितिप्रिय अथवा सनातनी कां होतो हें कळलें मला ! पण त्यामुळें प्रगतीला अडथळा होत नाहीं का ? या मुलानें फक्त जुनी तारीखच लिहिली ! इतर माणसें जुन्या, निरुपयोगी गोष्टी उराशीं कवटाळून बसतात. हें असेंच चालूं द्यायचें काय ?' बिलकुल नाहीं. थोड्या विलंबानें कां होईना, नव्याचा स्वीकार करण्याइतकें मनुष्याचें मन लवचिक राहिलेंच पाहिजे. मुलांमुलींची वाढ होत असतांना त्यांना रशियाप्रमाणें नवीन संस्कारांच्या शाळांत घातलें कीं तीं वेड्याप्रमाणें जुन्या चिंध्या कधींच गोळा करीत बसणार नाहींत. परिचिताकडे मनुष्याचा स्वाभाविक ओढा असतो हें कांहीं खोटें नाहीं. पण लग्नाच्या वेळीं मुलीला माहेर सोडतांना रडूं कोसळलें म्हणून सासरीं ती काय रडतच बसते ? पहिल्या दिवशीं सासरचें घर तिला इतकें अपरिचित वाटतें कीं, एखाद्या यक्षगंधर्वानें तिला अलगद उचलून माहेरीं आईच्या अंथरुणाजवळ नेऊन ठेवायचें कबूल केलें तर क्षणभरही विचार न करतां ती त्याच्याबरोबर परत जायला तयार होईल. तिथली अंगणांतली तुळस आणि गोठ्यांतलें वासरूं पाहून तिच्या माहेरच्या स्मृतीच जागृत होतील. त्या दिवशीं स्वप्नांतही

झोंपाळ्यावर बसून ' झोंका घेऊं या, झोंका देऊं या ' असें गुणगुणत ती माहेराला जाण्याचाच विचार करील.

पण थोड्या दिवसांनीं माहेरीं न्यायला तयार होणाऱ्या यक्षगंधर्वांना ती दुरूनच नमस्कार करील, अंगणांतली तुळस आणि गोठ्यांतलें वासरूं पाहून तिला आपल्या संसाराचींच चित्रें दिसूं लागतील आणि स्वप्नांत झोंपाळ्यावर बसून ती गुणगुणूं लागेल—

' दार वाजलें, उठूनि धांवलें<br>पाहिलें, परंतु नाहिं कोणि पातलें.'

लवकरच ती आई होईल आणि आपल्या आईला विसरून जाईल.

तुम्हीं म्हणाल—उद्यां अगर परवां पत्रें लिहिणारा तो विद्यार्थीही मे ऐवजीं एप्रिलचा आंकडा घालणार नाहीं. पण जूनच्या पहिल्या तारखेला तो पुन्हां महिनाभर मागें हटेल ना ? कबूल ! पण हें एकदोन दिवसच घडेल. असली माघार ही पुढें उंच झोंका जावा म्हणून मागें रेटलेल्या झोंपाळ्यासारखी असते हें आतां तुम्हीं सुद्धां मान्य कराल.

म. ग्रं. सं. ठाणें.

# सुखाचा शोध

## १३

माझ्या लहानपणीं 'सुखाचा शोध' ही लेखमाला एका लोकप्रिय मासिकांत प्रसिद्ध होत असे. ती विद्वत्तापूर्ण असेलही. पण मीं तिच्यांतली एक ओळही वाचली नसल्यामुळें तो शोध शेवटीं लागला कीं नाहीं हें त्या वेळीं मला कळलें नाहीं. मात्र गोष्टी वाचण्याकरितां त्या मासिकाचीं पानें चाळतांना जेव्हां जेव्हां ही लेखमाला माझ्या वाटेंत येई, तेव्हां तेव्हां माझें बालमन हंसल्याशिवाय राहत नसे. तें हास्य म्हणजे कूट-प्रश्नच होता एक! 'सुख म्हणजे अमेरिका, ग्रामोफोन, मोटर यांच्यासारखी शोधून काढायची गोष्ट आहे का?' असेंच जणूं कांहीं तें मूकपणानें विचारी. सुखाचा शोध अजून लागायचा आहे; म्हणजे जग आतांपर्यंत दुःखांतच होतें म्हणायचें तर, असाही विचित्र विचार त्यावेळीं मनांत क्षणभर भिरभिरून जाई.

पण जग पूर्णपणें दुःखांत असल्याचें कोणतेंच लक्षण त्यावेळीं माझ्याभोंवतीं मला दिसत नसे. नदीवर मुलांप्रमाणें मोठीं माणसेंही मुटके टाकून घाटावरील मंडळीच्या अंगांवर पाणी उडवीत, चारचार मैलांवर असलेला क्रिकेटचा सामना पाहण्याकरितां बाळगोपाळांचे थवेच्या थवे भर उन्हांतून जात आणि उन्हांतच बसत, दंडधारी आणि मानापमान हीं नाटकें पाहण्याकरितां व्यापाऱ्यांपासून डॉक्टरांपर्यंत सर्वांत अहमहमिका चाले, रंगपंचमी दिवशीं धडधाकट सदरा घालून घराबाहेर पडायची सोयच नसे आणि गांवाबाहेर फिरायला जाऊन शेतांतल्या भुईमुगाच्या ओल्या शेंगा खात बसण्यांतली गोडी कांहीं थोड्याथोडक्या मंडळींना ठाऊक नव्हती! माझ्या त्या चिमण्या जगांत दुःख औषधालाही नव्हतें असें मात्र नाहीं. आईपासून तालीम-मास्तरापर्यंत अनेक लोक माझ्या सुखाचा वारंवार विरस करीत असत. पण सुखाचा मुद्दाम शोध करण्याइतकें तें जगांत दुर्मिळ नाहीं अशीच माझी त्या वेळीं खात्री होती.

बाळपणाचें धुकें विरून जाऊन जगाच्या सत्य स्वरूपावर अनुभवाचा पूर्ण प्रकाश आतां पडला असला तरी अजूनही मला तसेंच वाटतें. सुख हें परिसा-

प्रमाणें आहे अशी त्याचा शोध करीत बसणारांची समजूत आहे कीं काय कुणाला ठाऊक ! तेवढा परिस पैदा केला कीं आपल्या लोहाराच्या दुकानाचें क्षणांत कुबेराच्या अलकेंत रूपांतर होईल असें या शोधकांपैकीं प्रत्येकाला वाटत असावें ! पण जगांत परिस आहे या गोष्टीवर विश्वासच नाहीं माझा ! या पृथ्वीच्या पाठीवरील सोनें नेहमीं धुळींतच सांपडतें. ज्यांना सुवर्णकण हवे असतील त्यांनीं सोन्याच्या खाणींतील धूळच शोधली पाहिजे. सुखही तसेंच आहे. आपल्या जागेपणींच्याच नव्हे, तर स्वप्नांतील लहान सहान अनुभवांतूनही तें ओसंडून वाहत असतें. आपण राजे झाल्याचीं अथवा एखाद्या अप्सरेनें आपल्याला माळ घातल्याचीं स्वप्नें पडतात त्याविषयीं मी बोलत नाहीं. पण ज्या स्वप्नांत आपला एखाद्या पर्वतशिखरावरून कडेलोट केला जातो, विमानांतून चंद्राला हात लावतां लावतांच आपण खालीं कोसळून पडतों किंवा एखाद्या अजगरानें आपल्याला गिळल्यामुळें आपण त्याच्या पोटांत प्राणांतिक धडपड करूं लागतों, तीं स्वप्नें सुद्धां एक प्रकारचें सुखच देतात. हें सर्व खोटें आहे अशी खात्री ज्या क्षणीं होते तो क्षण किती आनंदाचा असतो ! जणूं कांहीं आपला पुनर्जन्मच झाला आहे असें त्यावेळीं आपल्याला वाटतें.

जागेपणीं तर आनंद आपल्याभोंवतीं पदोपदीं गोकुळांतल्या श्यामसुंदराप्रमाणें मुरलीचे मंजुळ सूर काढीत विविध रूपांनीं नाचत असतो. सकाळच्या चहाचा पहिला घोट, पोस्टांतून आलेलें चारच ओळींचें प्रिय व्यक्तीचें पत्र, दुपारीं कामानें आणि घामानें कंटाळून गेल्यावर आलेली वाऱ्याची झुळूक, वाटेनें जातां जातां तारेवर दिसणारीं चिमणी पाखरें, गवताच्या इवल्याशा काडीला आलेलीं चिमणीं चिमणीं फुलें, मनांतल्या मनांत घोळत असलेला 'अंतरिंचा ज्ञानदिवा मालवूं नको रे' अथवा 'रुणुझुणु ये रुणुझुणु ये झणकारित वाळा' असला गोड चरण, देवळांत कुणीतरी वाजविलेल्या घंटेचा वायुलहरीवरून नाचत येणारा मधुर नाद, समुद्राच्या वाळूचा लुसलुशीतपणा, लाटांचा पाठशिवणीचा खेळ, चंद्राचा ढगांत चाललेला लपंडाव—ही यादी कधींच संपणार नाहीं !

हे सुखाचे क्षण धनिकांना आपल्या तिजोऱ्यांत अडकवून ठेवतां येत नाहींत आणि सत्तेला संगिनीच्या पहाऱ्यांत त्यांना बंदिवानही करतां येत नाहीं. ते प्रत्येकाचे आहेत. समाजधर्म माणसापेक्षां निसर्गालाच सहज समजतो यांत शंका नाहीं.

केवळ घराच्या चार भिंतींच्या आंत सुखाच्या केवढ्या खाणी असतात याची तरी सुखाचा शोध करीत भटकत फिरणाऱ्या लोकांना कुठें कल्पना असते ? ते अमृताकरितां स्वर्ग धुंडाळायला जातील. पण खरे अमृतघट तर त्यांच्या घरींच असतात. बोरकरांनीं या छांदिष्ट लोकांना विचारलेला प्रश्न किती मार्मिक आहे !

अमृत घट भरले तुझ्या घरीं
कां वणवण फिरसी बाजारीं ?
मोत्या इवला मनी सानुली
कुशींत कवळुनि त्यांना बसली
प्रेमें किति तव राजसवाळी
हें बघुनि कधीं रमलास उरीं ?
वडील वाचिति गाथा पोथी
काल तिथें तूं क्रमिलास किती ?
किंवा आई वळिते वाती
वदलास तिजशीं कधिं ऊरभरी ?
पाडस घरचें कितिदां आलें
गळा करुनि वर तुला बिलगलें
गोंजारुनि त्या कधिं खाजविलें
कधिं दलें दिलिस त्या घांसभरी ?

जाइजुईच्या फुलांप्रमाणें असले प्रमळ क्षण मनुष्याला फार लहान-कित्येकदां अगदीं क्षुद्र वाटतात. पण Trifles make perfection and perfection is no trifle ( पूर्णता म्हणजे अनेक अपूर्ण गोष्टींचें संमेलन ) ही उक्ति सुखाइतकी दुसऱ्या कशालाच लागू पडणार नाहीं. क्षणाक्षणानें विद्या आणि कणाकणानें द्रव्य संपादन करावें असें एक संस्कृत सुभाषित आहे ना ? सुखांत विद्येचा विकास आणि लक्ष्मीचा विलास यांचा संगम होत असल्यामुळें तें क्षणांप्रमाणें कणांनींही वाढत असतें.

पण नेमकें हेंच आपल्याला अनेकदां कळत नाहीं. मनुष्य हा मनुष्याचा शत्रु आहे असें वर्डस्वर्थ म्हणतो ! पण त्यापेक्षांही एक कटु सत्य आहे. मनुष्याचा सर्वांत मोठा शत्रु तो स्वतःच आहे. गीतेच्या दृष्टीनें नव्हे, तर अगदीं व्यवहाराच्या

दृष्टीनें. सुखी होण्याकरितां मनुष्य सदान् कदा दुःखी होत असतो. लहानपणीं पाळण्यावर टांगलेल्या सुंदर चिमण्या सोडून तो चांदोबाचा हट्ट धरील, तरुणपणीं गृहाचें नंदनवन करणाऱ्या पत्नीकडे पाठ फिरवून तो वाऱ्यावरल्या एखाद्या अप्सरेच्या मागें धांवेल आणि म्हातारपणीं जगाबरोबर धांवतां येत नाहीं म्हणून वाटेंतल्या दगडावर डोकें आपटीत बसेल. इसापनीतींतील सांबराच्या सुंदर शिंगांनींच त्याचा घात घेतला. मागूं ती गोष्ट आपल्याला मिळाली पाहिजे हा अहंकारच मनुष्याच्या सुखाचा सत्यानाश करीत असतो. त्याला जग हवें; पण तें स्वतःच्या सुखाकरितां ! जगाच्या सुखाचा ओझरता विचारही त्याच्या मनाला सहसा शिवत नाहीं.

रवींद्रांची Gift ( देणगी ) या नांवाची एक रूपककथा आहे. सुवर्णरथांत बसून राजाधिराज येत आहेत असें ऐकतांच भिक्षेनें भरलेली आपली झोळी कांखेला लावून भिकाऱ्याची स्वारी मोठ्या आशेनें रस्त्याच्या कडेला उभी राहते. रथ त्याच्यापाशीं थांबतो. भिकाऱ्याचा आनंद गगनांत मावेनासा होतो. पण आंतले राजाधिराज खालीं उतरून त्याच्याचपुढें हात पसरतात आणि भीक मागतात ! सोन्याच्या रथांत बसून फिरणाऱ्या राजानें आपल्यापाशीं भीक मागावी ? उदात्त अभिमानाच्या दृष्टीनें केवढा विलक्षण प्रसंग ! पण त्या स्वार्थी भिकाऱ्याला त्याची जाणीवच झाली नाहीं. त्यानें झोळींतून एक दाणा काढून राजाच्या हातावर टाकला. राजा न बोलतां मुकाट्यानें निघून गेला. भिकारी खोपटींत येऊन झोळी जमिनीवर ओतून पाहतो तों सर्व धान्यांत एक सोनेरी दाणा चमकत आहे. त्यानें राजाला जो दाणा दिला होता त्याच आकाराचा होता तो ! लहान नाहीं आणि मोठाही नाहीं. त्या दाण्याकडे पाहून तो भिकारी ढळढळां रडूं लागला.

सुखासाठीं धडपडणारे आणि तें मिळत नाहीं म्हणून रडणारे सारे लोक या भिकाऱ्यासारखीच चूक करीत नाहींत का ? विश्वमोहिनी सुवर्णरथांतून येत असलेली पाहून आपण हुरळून जातों. पण पुढें येऊन तिनें हात पसरला कीं आपण मुलखाचे कृपण होतों. कमींत कमी काय देतां येईल हें आपण पाहूं लागतों ! आणि द्यावें तसें घ्यावें हा तर सुखाचा मूलमंत्र आहे. किंबहुना आधीं दुसऱ्याला दिल्याशिवाय—त्यागाच्या अग्निदिव्यांतून पार पडल्यावांचून—मिळत

नाहीं अशी जगांत एकच अपूर्व गोष्ट आहे–सुख! प्रसववेदनांचे प्राणांतिक कष्ट सोसल्याशिवाय मातेला तरी अपत्याच्या मुखाचें दर्शन कुठें होतें?

सुखाचा शोध करणारे वर्तमानपत्रांतून आपल्या या हरवलेल्या गोष्टीविषयीं जाहिरात कां देत नाहींत याचें मला लहानपणीं कोडें वाटे! नापत्ता झालेल्या मुलांविषयीं अशा पुष्कळ जाहिराती मीं वाचल्या होत्या. आतां मात्र मला वाटतें–त्यांना अशी जाहिरात देणें अशक्य आहे! जाहिरातींत आपल्या हरवलेल्या गोष्टीचें अगदीं बारीक सारीक वर्णन द्यायला हवें! आणि सुखाचें इतकें सूक्ष्म रूप ज्यांच्या डोळ्यांत ठसलें आहे, त्यांना तें आपल्या आसपासच कुठें तरी खेळत आहे हें कळायला फारसा वेळ लागणार नाहीं. फार फार तर, लहान मुलांच्या संवयीप्रमाणें तें कुठें तरी लपून बसलेलें असेल! दूर नाहीं, अगदीं जवळच!

१९३७

# अर्पण-पत्रिका



माझें एखादें नवें पुस्तक छापखान्याकडे गेलें कीं तें कुणाला अर्पण करावें या गोड कल्पनातरंगांत मी गुंगत राहतों. लग्नपत्रिकेप्रमाणें अर्पण-पत्रिका हा सहज थट्टेचा विषय होऊं शकतो हें मलाही कळतें; नाहीं असें नाहीं. कुत्र्यांचा अथवा घोड्यांचा शोक असलेल्या संस्थानिकाला उद्देशून ' यांच्या ठायींची अपूर्व रसिकता पाहून हें पुस्तक अत्यंत आदरानें अर्पण केलें आहे ' असें जेव्हां एखादा ग्रंथकार म्हणतो, तेव्हां वाचकांनीं हंसूं नये तर काय करावें ? तसें पाहिलें तर पेढेबर्फी तयार करणाऱ्या कारखानदाराला एखाद्यानें आपलें पुस्तक—मग तें खव्यावरलें नसेना का—अर्पण करण्यांत गैर असें कांहीं नाहीं. पण तसली एक अर्पण-पत्रिका वाचून मला स्वतःलाच हंसूं कोसळलें होतें. अर्पणपत्रिकेंत नांव नमूद करणें आवश्यक असलें तरी धंद्याचा उल्लेख कशाला हवा ? आणि तो करायचा म्हटलें तर वय, वंशवृक्ष, बायका, मुलांचीं नांवें, इत्यादि गोष्टींचा तरी उल्लेख कां करूं नये ? पण भावनेच्या भरांत म्हणा वा मुत्सद्देगिरीमुळें म्हणा, अर्पणपत्रिकांत असल्या गमती प्रवेश करतात हें मात्र खरें. कुणीही कुणाला पुस्तक अर्पण करतो तें प्रेमानेंच असलें पाहिजे. पण वाचकांना कदाचित् हें कळणार नाहीं म्हणूनच कीं काय अनेक ग्रंथकार ( त्यांत मीही आहेंच ) आपल्या प्रेमाचा उल्लेख करतात ! यांतही सप्रेम, प्रीतिपूर्वक वगैरे सूक्ष्म भेद आहेतच ! एका धोंड्यानें अनेक पक्षी मारण्याची युक्तिही कित्येक अर्पणपत्रिकांत आढळते. ' मानसमंदिरांतल्या देवतेच्या चरणीं ' ही अर्पणपत्रिका याच मासल्याची नाहीं का ? इसापनीतींतल्या दोन बायकांच्या दादल्यानें एखादी अंकलिपि लिहून ती '—स ' अर्पण केली असती तर मला वाटतें त्याच्या डोक्याचें इतक्या लवकर टक्कल झालें नसतें ! प्रत्येक बायकोला एकांतांत हा ग्रंथराज मीं तुलाच अर्पण केला आहे असें सांगून तो दोघींनाही दीर्घकाळ झुलवूं शकला असता. त्याचा तीनशें बायकांचा जनानखाना असता तरी या '—स ' च्या तोडग्यामुळें त्याच्या डोक्यावरील केंसालाही धक्का लागला नसता !

'अर्पण-पत्रिका म्हणजे एक प्रकारचें प्रदर्शन आहे; पण प्रेम ही कांहीं प्रदर्शनांत ठेवण्याची वस्तु नाहीं!' हा अथवा असेच दुसरे आक्षेप घेणारांची भूमिका मात्र मला मान्य नाहीं. शहाजहाननें मुमताजवर प्रेमरसाचा जो वर्षाव केला असेल, तो चंद्राला सुद्धां कळला नसेल आणि राजवाड्याच्या भिंतींना कान असूनही त्यांचे प्रेमालाप ऐकायला मिळाले नसतील! पण या मूक प्रेमाचें स्मारक करण्याच्या वेळीं तें अत्यंत रमणीय व दर्शनीय व्हावें अशी दक्षता त्या रसिक बादशाहानें घेतलीच कीं नाहीं? अर्पण-पत्रिका म्हणजे तरी काय? तें प्रेमाचें स्मारकच असतें.

स्मारक शब्दांत एक प्रकारचें कारुण्य आहे हें मात्र कांहीं खोटें नाहीं. मनुष्य आपल्याला सोडून गेला कीं त्याची आठवण काळाच्या प्रचंड पावलांनीं उडणाऱ्या धुळीनें बुजून जाऊं नये म्हणून आपण स्मारकें करतों. मग आपल्या आयुष्यांत लीलेनें संचार करणाऱ्या आणि त्याला उजाळा देणाऱ्या व्यक्तींना पुस्तकें अर्पण करणें म्हणजे त्यांचें व आपलें प्रेम संपुष्टांत आल्याचा उघड उघड कबुलीजबाबच नाहीं का? या प्रश्नाचें सविस्तर उत्तर न देतां मी एवढेंच म्हणेन—मानवी मन चंचल आहे—विसराळू आहे—कृतघ्न आहे! अर्पणपत्रिकेला एवढें महत्त्व आलें आहे तें यामुळेंच!

लहानपणापासून आपल्या आयुष्यांत आलेल्या आणि आपणाला सुख देऊन मुकाट्यानें निघून गेलेल्या व्यक्तींची नोंद आपल्यापाशीं कुठें असते? मनुष्याच्या मनाला सुवर्णाक्षरांनीं कधीं कांहीं लिहितांच येत नाहीं! त्याचा सारा धुळाक्षरांतला कारभार! एक पावसाळा उलटला कीं गेलीं मागचीं अक्षरें धुवून. कित्येक वेळां कांहीं कांहीं विशिष्ट माणसावांचून जगणें अशक्य आहे असें आपणाला वाटूं लागतें. पण थोडासा काळ लोटला कीं आपण त्या माणसांना पूर्णपणें विसरून जातों. काळ मनाच्या जखमा बऱ्या करतो म्हणतात! पण मला वाटतें मनांत फुललेल्या कोमल भावनांचा फुलोराही तो कोळपवून टाकतो. मोठेपणीं लहान-सहान कारणासाठीं आईच्या अंगावर धांवून जाणाऱ्या मुलाला लहान असतांना आकाशांतला गडगडाट ऐकून आपण कसे भ्यालों होतों, आईला घट्ट मिठी मारून तो बंद करण्याविषयीं आपण बोबड्या बोलांनीं तिला कसें सांगितलें होतें आणि तिनें पोटाशीं घट्ट धरल्यामुळें आपली भीति कशी नाहींशी झाली होती या गोष्टीचें जर ऐन वेळीं स्मरण होईल—पण तसें कुठलें व्हायला? मनाच्या चाळणींतून

कृतज्ञतेचा सुवास केव्हांच निघून जातो ! दुःखाचे वेडेवांकडे कांटे मात्र तिच्यांत वर अडकून राहतात.

मुलांमुलींना ' वरें सत्य बोला यथातथ्य चाला ' या थाटाचा उपदेश मी केव्हांच करीत नाहीं. मी त्यांना फक्त एक गोष्ट सांगतों. त्यांनीं डायरीप्रमाणें एक छोटें पुस्तक ठेवावें. या पुस्तकांत आपण अनुभवलेल्या प्रत्येक प्रेमळ प्रसंगाची नोंद करायला त्यांनीं विसरूं नये. मग त्या प्रेमाचें स्वरूप किती का लहान असेना ! पुढें जगाच्या कटु अनुभवानें तोंड वेडेवांकडें करण्याची पाळी येते त्यावेळीं हा जुना मध फार उपयोगी पडतो. व्यवहाराच्या आंचीनें भावना सुकूं लागतात तेव्हां त्यांना असल्या प्रेमळ स्मृतीचा ओलावा देऊं लागतात. एके काळीं माझा जीवश्चकंठश्च असलेला एक मित्र अलीकडे संधि सांपडेल तेव्हां माझी निंदा करितो असें मीं ऐकिलें. अर्थात् त्याच्याबद्दल वाईट बोलण्याचा मोह मलाही अनावर झाला. पण आयुष्यांतल्या एका अत्यंत निराशेच्या प्रसंगीं वडील भावाप्रमाणें माझ्या पाठीवरून हात फिरवून 'वेडा आहेस तूं ! हत्ती गेला आणि शेंपूट राहिलंय् ! त्याचं कसलं आलंय् एवढं भय ?' या शब्दांनीं त्यानें मला जो धीर दिला, तो मी अजून विसरलों नाहीं. प्रतिक्रिया म्हणून त्याच्या विरुद्ध बोलण्याची इच्छा उत्पन्न झाली, तेव्हां माझ्या मनानें नेमका हा प्रसंग पुढें केला. लगेच माझ्या तोंडाला कुलुप पडलें.

सुवासाप्रमाणें वाऱ्यावर उडून जाणाऱ्या कृतज्ञतेला शब्दांच्या बंधनांत अत्तराप्रमाणें कोंडून ठेवण्याचा प्रयत्न म्हणजे अर्पणपत्रिका ! मनुष्य इतर सर्व गोष्टी विसरेल; पण अहंभावामुळें आपल्या पुस्तकांचा विसर त्याला कधींच पडणार नाहीं. शुक्राचार्यांच्या पोटांत शिरून कचानें जशी संजीवनी विद्या संपादन केली, तशा अर्पणपत्रिकाही लेखकाच्या पुस्तकांत प्रवेश करून त्याच्या विस्मृतीवर म्हणा वा कृतज्ञतेच्या अभावावर म्हणा विजय मिळवितात.

पुस्तक बहुधा अर्पण केलें जातें एकाच व्यक्तीला. पण प्रत्येक वेळीं तें कुणाला अर्पण करावें हें गोड कोडें सोडवितांना मी माझ्या गत आयुष्याचा बारकाईनें आढावा घेऊं लागतों. जमेच्या बाजूला असलेल्या लहानमोठया रकमा कुणाकडून आल्या आहेत हें पाहून माझें मन गहिंवरून येतें. अशिक्षित मोलकरणीचें मातृप्रेम, वयानें कितीतरी लहान असलेल्या युवकाचें बंधुप्रेम, केवळ योगायोगानें लाभलेलें भगिनीप्रेम, फार काय विषमानें बेशुद्ध असलेल्या स्थितींत ' आई आली

का ?' या प्रश्नामागोमाग ' मास्तर आले का ? ' या प्रश्नांत व्यक्त झालेलें शिष्यप्रेम —प्रेमाचीं इतकीं विविध व विलक्षण स्वरूपें अशा वेळीं प्रतीत होतात कीं आयुष्याच्या प्रवासांत पायांत रुतलेल्या कांट्यांचा विसर पडतो, सुगंधमय अशा नवीनच सृष्टींत आपण प्रवेश केला आहे असा भास होतो, मनुष्याच्या अंतःकरणाच्या श्रेष्ठपणावरील श्रद्धा द्विगुणित होते, आणि असें वाटूं लागतें कीं कितीही पुस्तकें लिहिलीं तरी तीं कुणाला अर्पण करावीं या विवंचनेंत आपल्याला कधींच पडावें लागणार नाहीं ! या लांबलचक यादींत माझी बर्फासारखी पांढरी शुभ्र मांजरी सुली तर आहेच ! पण माझ्या घरासमोरच्या टेंकडीवरील एक खडकसुद्धां आहे हं ! जेरोम. के. जेरोमनें चिलमीलाच नाहीं का आपलें एक पुस्तक अर्पण केलें ?

१९३७

## रहस्य !

'When I was a spy' हें पुस्तक काल रात्रीं जेवल्यानंतर मीं सहज वाचायला घेतलें. पुस्तक बरेंसें वाटलें तर चार आठ दिवसांत संपवूं, नाहींतर जिथें कंटाळा येईल तिथेंच त्याला रामराम ठोकूं, असा मीं मनांत विचार केला होता.

लहानपणीं कुठलेंही पुस्तक अगदीं अधाशीपणानें वाचीत असें मी ! पण मेवामिठाई, पुस्तक आणि मित्र या तिन्हींच्याही बाबतींत वयोपरत्वें आपली वृत्ति बदलते यांत शंका नाहीं. लहानपणीं बाजारांतून पेढयांचा पुडा आईकडे आणून देतांना त्याचा दोरा माझ्या हातून नकळत सैल झाला नाहीं असें क्वचित्‌च घडे ! पण पेढयांचे व्यापारी जाहिरातींच्या द्वारें प्रकृति सुधारण्याची हमी घेत असतांनाही हल्लीं पेढयांना मी मुळींच शिवत नाहीं. बाळपणीं प्रत्येक शाळासोबती आपला अगदीं जिवलग मित्र वाटतो आपल्याला ! मराठी शाळेंत नामसादृश्यामुळें पानिपतावर गेलेल्या भाऊसाहेबांचा मी अवतार आहें असें मलाच वाटत होतें असें नाहीं. माझा मुसलमान दोस्त इब्राहिमही स्वतःला इब्राहिमखान गारदी मानून माझ्याशीं दोस्ती करीत असे. आज तीस वर्षांनंतर माझ्या आयुष्यांत येणाऱ्या-आणि लवकरच त्यांतून जाणाऱ्याही—मित्रांच्या आणि माझ्या स्नेहसंबंधाकडे पाहिलें कीं लहानपणाच्या त्या भोळ्या भावाचें स्मरण होऊन जसें हंसूं येतें, तसें मन क्षणभर सद्गदितही होऊन जातें.

उगमापाशीं स्फटिकाप्रमाणें स्वच्छ असलेलें नदीचें पाणी पुढें गढूळ व्हायचें हेंच खरें ! विस्तार व खोली यांचा लाभ कांहीं उगीच होत नाहीं जगांत ! बाळपणींची भावडी मनोवृत्ति राहिली नसल्यामुळें, मी आतां अनेक मित्रांशीं जरा बेताबातानेंच वागतों आणि पुष्कळ पुस्तकेंही अर्धवटच वाचतों. पण महायुद्धाच्या वेळीं देशाभिमानानें प्रेरित होऊन गुप्त हेराचें काम करणाऱ्या बेल्जिअन तरुणीची ती आत्मकथा वाचतांना माझा हा सावधपणा कुठल्या कुठें नाहींसा झाला. काळाचा झपझप चालणारा प्रवास घड्याळाच्या टिकटिकीच्या रूपानें शांत रात्रीं आपलें अस्तित्व जाणवतो. पण हें पुस्तक वाचतांना एकदां सुद्धां मला त्याची चाहूल

ऐकूं आली नाहीं. माझ्या खोलीचें दार उघडेंच होतें. पण अंगणांत चांदणें पडलें होतें कीं अंधार होता हें ईश्वरसाक्ष सांगण्याची पाळी जर माझ्यावर आली असती तर माझी गणना वेड्यांतच झाली असती. म्हणूनच डोळे चुरचुरून थोडीशी तक्रार करीत, पण उत्कंठित मनापुढें त्या बिचाऱ्यांचें काय चालणार ?

पुस्तक संपवून मीं घड्याळाकडे पाहिलें. तीन वाजून गेले होते. मला आयुष्यांतल्या अशाच रात्री आठवल्या. लहानपणीं ‘ उषःकाल ’ आणि ‘कालिकामूर्ति ’ या कादंबऱ्या मीं रात्रभर जागूनच वाचल्या होत्या. दहा वर्षांमागें हार्डीची ‘Two on a tower’ अशीच अपरात्रीं संपवून पहांटेची नौबत होईपर्यंत बाहेर पसरलेल्या अंधाराकडे मी पाहत बसलों होतों.

हीं चारही पुस्तकें वाङ्मयगुणांच्या दृष्टीनें कितीतरी भिन्न आहेत ! मीं वाचलेल्या या देशभक्त तरुणांच्या आत्मकथेपेक्षां बुद्धीला चालना देणारीं अगर हृदय हलवून सोडणारीं कांहीं थोडींथोडकीं पुस्तकें वाचलीं नव्हतीं मीं ! शॉ आणि इब्सेन यांचीं तीनचार नाटकें अथवा चेकाव्ह व ओ हेन्री यांच्या कांहीं लघुकथा मीं अजून विसरलों नाहीं. पण त्या सर्वांभोंवतीं दिव्याचा प्रकाश फार फार तर दहा वाजेपर्यंत जळणाऱ्या दिव्याचा प्रकाश—मला दिसतो. मध्यरात्रीला साक्षी ठेवून वाचलेलीं अशीं पुस्तकें त्यांत फारच थोडीं ! अर्थात्, अशा पुस्तकांत कांहीं तरी निराळाच आकर्षकपणा असला पाहिजे, नाहीं ?

खोलीच्या बाहेर येऊन मीं पाहिलें. कुणालाही ओळखूं येऊं नये म्हणून रजनीनें कृष्णवस्त्र अंगाभोंवतीं अगदीं लपेटून घेतलें होतें. मात्र इतकी दक्षता घेऊनही क्षणोक्षणीं पृथ्वीकडे पाहून आपले हजारों डोळे मिचकावण्याचा मोह तिला अनावर होत होता. माझ्या मनांत आलें, या डोळे मिचकावण्याचा अर्थ काय बरें असेल ? कोणतीं दृश्यें दिसल्यामुळें रात्र पृथ्वीला अशी हंसत असेल ? चटकन् उत्तर आलें, विश्वांतलीं सारीं रहस्यें रात्रीलाच कळत नाहींत का ? सूर्यप्रकाशांत मनुष्याच्या जीवनाचें नाटक सुरू असतें. पण रात्रीचा पडदा पडला कीं प्रत्येक व्यक्ति जगाच्या रंगभूमीवरून स्वतःच्या मंदिरांत येते. तिच्या अंतःकरणांतल्या आशा-आकांक्षा प्रगट होण्याला यापेक्षां अनुकूल वेळ दुसरी कोणती असणार ? माणसांना पडणारीं स्वप्नें दिसत असल्यावांचून का रजनीदेवीचे हे अनंत डोळे असे मिस्किलपणानें हंसत असतील ! केशवसुतांनीं दिवसापेक्षां रात्र श्रेष्ठ ठरवितांना अनेक काव्यमय कारणें सांगितलीं आहेत.

पण एक अतिशय सुंदर कारण सांगायला ते विसरले. दिवसा मनुष्य स्वप्नसृष्टींत बहुधा प्रवेश करीत नाहीं ! चुकून माकून त्यानें केलाच, तर त्या दिवास्वप्नांत रात्रीं निर्माण होणाऱ्या स्वप्नसृष्टीच्या रहस्यपूर्ण नवरसांचा त्रुटित ओघसुद्धां आढळायचा नाहीं.

बाह्यतः ज्या विकारांचें निदान करतां येत नाहीं त्यांचा उगम अनेकदां रोग्यांना पडणाऱ्या स्वप्नावरून निश्चित होऊं शकतो. मानवी मन किती रहस्यप्रिय आहे याचा आणखी दुसरा पुरावा कशाला हवा ? मात्र तो हवा असल्यास नुकत्याच चालूं लागलेल्या बालकाच्या लीला पाहाव्यात. स्वारी दाराआड अगर कोपऱ्यांत लपून बसते आणि शोधायला आलेली नाई अगर आई पुढें गेली म्हणजे अशी खुदकन् हंसते कीं त्या दिवशीं संध्याकाळीं बाळाची दृष्ट काढायला कुणीच विसरणार नाहीं. लपंडावाची आवड हें रहस्यमय मानवी वृत्तीचें बालरूपच नव्हे का ?

आणि म्हणूनच मनुष्य जितका स्वतःचें रहस्य लपवून ठेवायला उत्सुक तितकाच तो दुसऱ्याचें रहस्य जाणायलाही उत्कंठित असतो. ' When I was a spy ' या कथेत मी रंगून गेलों त्याचें मुख्य कारण हेंच होतें. अबला मानली गेलेली स्त्री देशासाठीं केवढी वीरवृत्ति प्रगट करते याचें चित्रणही या कथेंत आहे. पण निव्वळ देशाभिमानानें रंगलेलीच कथा असती तर तिचा उत्तरार्ध मी दुसरे दिवशीं सकाळींही वाचला असता. त्या रात्रीं हातांतलें पुस्तक अगदीं खालीं ठेववेना याचें कारण गुप्त हेरांचें काम करणाऱ्या नायिकेवर एकामागून एक येणारे ते विलक्षण प्रसंग ! अपरात्रीं एका खिडकींतून बाहेर येणाऱ्या पांढऱ्या हातांत गुप्त बातमीचा कागद देणें, मुक्या शिपायाचें सोंग घेऊन शत्रुपक्षाला टेलिफोननें मिळणाऱ्या माहितीचा उगम नाहींसा करणें, आपल्यावर आषक्त झालेल्या एका अधिकाऱ्याबरोबर गुप्त बातमीकरतां राहून शील सांभाळणें—साऱ्याच अद्‌भुत गोष्टी !

मनुष्य म्हणजे वयानें वाढलेलें मूल हें तत्त्व अशा वेळीं तीव्रतेनें प्रचीत होतें. सिंदबाद खलाशाची अगर अलीबाबा धरून एकेचाळीस चोरांची चटकदार गोष्ट वाचतांना लहानपणीं अगदीं तहानभूक विसरून जात असें मी ! इतके पावसाळे लोटले. पण माझ्या मनाच्या रहस्यप्रियतेचा तो अद्‌भुत रंग अजूनही विटलेला नाहीं ! विज्ञानाचे अध्यापक असलेले माझे एक बुद्धिवान् स्नेही नाटकाचा पहिला

अंक वाचून झाला कीं शेवटचीं पानें आधीं चाळून पाहतात. हें पाहिलें म्हणजे क्रमशुद्ध पायऱ्यांनीं करावे लागणारे कंटाळवाणे शास्त्रीय प्रयोग या गृहस्थाच्या हातून कसे होत असतील याची परक्याला शंका आल्यावांचून राहत नाहीं. या शंकेला ते उत्तर मात्र मोठें मार्मिक देतात, 'शिकवायच्या शास्त्रीय प्रयोगांचें रहस्य मनुष्याला आधींच ठाऊक असतें !'

अमेरिका, ध्रुवप्रदेश अथवा नंगा पर्वत यांचा शोध लावूं पाहणाऱ्या मानवी प्रवृत्तीचा उगम केवळ साहसांत नाहीं. त्या साहसालाही जागृत करणारी एक गुप्त शक्ति असते. ती म्हणजे मनुष्याची रहस्यज्ञानाची उत्कट इच्छा ही होय. मोठ्या माणसांच्या चरित्रांपेक्षां त्यांच्या आत्मचरित्रांवरच वाचकांच्या उड्या पडतात याचें तरी दुसरें काय कारण आहे? व्यक्तीच्या जीवनप्रवाहांत लपून राहिलेलीं रहस्यें पृष्ठभागावर हळूच डोकावण्याचा संभव आत्मचरित्रांतच अधिक ! शेरिडननें आपल्या School for Scandal' या नाटकांत एका कुटाळकंपूच्या मर्कटलीला मोठ्या मजेदार रीतीनें दाखविल्या आहेत ! मिस् पायपरच्या शेळीला जुळें झालें ही गोष्ट लेडी डंडिझीच्या कानांवर पडते ! कानांवरच म्हटली पाहिजे; कारण सदरहू बाई पूर्णपणें बहिरी होती ! या बहिऱ्या बाईनें कुमारी पायपरालाच जुळीं मुलें झाल्याची बातमी लगेच पुढें पोंचविली. वाईट बातमी आगीसारखी झटपट पसरते. दुसरे दिवशीं जिकडे तिकडे पायपर या कुमारीमातेची चर्चा सुरू झाली, एवढेंच नव्हे तर त्या जुळ्या मुलांचा बाप कोण असावा, हेंही लोकांनीं ठरवून टाकलें. मला वाटतें, अशा प्रकारच्या कंड्यांच्या मुळाशींही परनिंदे-इतकीच रहस्यप्रियतेची हौस असते. फरक एवढाच कीं खऱ्याखुऱ्या रहस्याच्या अभावीं गोष्टीचा रंग जाऊं नये म्हणून आपल्या पदरचा मीठमसाला घालतांना हीं माणसें मागेंपुढें पाहत नाहींत ! जन्माला आलेल्या मनुष्याचें एकच भविष्य नक्की सांगतां येतें व तें म्हणजे तो कधीं तरी मरणार हें होय. पण हें ठाऊक असूनही आपलीं दैनिक, साप्ताहिक व मासिक भविष्यें आणि तींही निरनिराळ्या वर्तमानपत्रांतलीं—भाविकतेनें वाचणारे किती तरी लोक सध्यां दिसतात. दैनिक भविष्यांतील आजचा दिवस चांगला आहे याचा अर्थ आजची खाणावळींतली आमटी चांगली होणार आहे, साप्ताहिक भविष्यांतील 'आठवडा' लाभदायक आहे ही मंगल भविष्यवाणी कुणातरी मित्राबरोबर एखादा बोलपट फुकट पाहायला मिळून

खरी होऊं शकेल. आणि मासिक भविष्यांतील 'कन्याराशीच्या लोकांनीं संभाळून राहावें' हा इशारा या महिन्यांत पाहुण्यांची घरांत गर्दी होणार असें सुचवीत आहे, हें अशा व्यवहारचतुर माणसांना एरवीं सहज कळलें असतें. पण उद्यांच्या पडद्याआड लपून बसलेलीं रहस्यें पाहण्याच्या उत्कंठेंत अगदीं अस्सल व्यवहारी माणसें सुद्धां पागल होऊन जातात.

पण मनुष्यमात्राची रहस्यज्ञानाची उत्सुकता कितीही विलक्षण असली तरी तिची संपूर्ण तृप्ति कधींच होत नाहीं. महात्माजींचे 'सत्याचे प्रयोग' मीं मोठ्या आदरानें वाचले आहेत. परंतु ते वाचून गांधीजींच्या अंतरंगांतील किती तरी गोष्टी आपल्याला अजून कळायच्याच आहेत, अशा रुखरुखींत मीं तें पुस्तक संपविलें आहे. 'यावज्जीवहि काय मी न कळलें आप्तांप्रती नीटसें। मित्रांतेंहि कळे न गूढ न कळे माझें मलाही तसें' याही गडकऱ्यांच्या ओळी मोठ्या विभूतीपासून क्षुद्र व्यक्तीपर्यंत सर्वांच्याच बाबतींत खऱ्या नाहींत काय ? माझ्या मागील आयुष्याकडे मी पाहतों तेव्हां त्यांतील कित्येक प्रसंगांकडे पाहतांना माझा मीच आश्चर्यचकित होऊन जातों. माझ्या तोंडून हे बेफाम शब्द गेले असतील ? मी असा उद्धटपणानें वागलों असेन ? कळून सवरून मी असें खोटें बोललों असेन ? सतराव्या वर्षी एक विशिष्ट मुलगी दृष्टीला पडावी म्हणून कीर्तनाची बिलकुल आवड नसतांना एका देवळांत मी सात दिवस नियमितपणानें गेलों असेन ? स्टीव्हन्सन्च्या डॉक्टर जेकेल व मि. हाइड या कथेंतल्याप्रमाणें प्रत्येक मनुष्यांतही एक सज्जन व एक दुर्जन यांचें बेमालुम मिश्रण झालेलें असतें हेंच खरें ! मनुष्याचे आत्मेच दोन झाल्यावर त्याचें आत्मचरित्र कधींही पूर्ण सत्य होऊं शकणार नाहीं हें उघडच आहे. ख्रिश्चन धर्मांत पापमुक्त होण्याकरितां अंतकाळीं धर्मगुरूपाशीं आपल्या पापांचा पाढा वाचण्याची पद्धत आहे. त्यावेळीं सुद्धां मनुष्य आयुष्यमार्गांतल्या खडान्खडा गोष्टी कबूल करीत असेल असें मला वाटत नाहीं. दुःखाच्या भरांत अगर भीतीनें ग्रस्त होऊन मनुष्य आपल्या हृदयमंदिराचें दार उघडतो. पण मंदिरांतल्या अंतर्भागांत त्यानें आपल्याला येऊं दिलें, तरी त्यांतील गुप्त भुयाराचा मात्र तो कोणालाही मागमूस लागूं देणार नाहीं. जिच्या सहवासांत वर्षांतील बाराही महिने वसंत फुलतो, अशा पत्नीच्या अथवा ज्यांच्या स्मितांत सदैव अरुणोदयच विलसत असतो अशा अपत्यांच्या डोळ्यांकडे पाहतांनाही मधूनच हें पाणी अथांग आहे असा भास माणसाला होतोच होतो ! तो खरा असो वा खोटा असो, मनुष्यप्राण्याची रहस्याची आवड त्यांत प्रतिबिंबित होते यांत संशय नाहीं. १९३७

# गोवाऱ्यांच्या शेंगा १६

आंघोळ करीत असतांना किरिस्तावीण भाजीवाली व माझी पत्नी यांचा संवाद सहज कानांवर पडला. गोवाऱ्यांच्या शेंगा माझी बायको अगदीं वेंचून घेत होती. सैन्यांत भरती करतांना शिपायांची सुद्धां इतक्या कसोशीनें कुणी तपासणी करीत नसेल! बऱ्याचशा शेंगा जून जून म्हणून परतच केल्या तिनें! हा निवडणुकीचा सामना शेवटीं चुरशीचा तर होणार नाहीं ना अशी शंका माझ्या मनांत आली. शिवाय अलीकडच्या बऱ्याच मंडळीप्रमाणें मलाही साम्यवादाची सोईस्कर झुळुक लागलेलीच आहे. तेव्हां, हरिणावर बाण सोडूं नकोस म्हणून दुष्यंताची विनवणी करणाऱ्या ऋषीचा आव आणून मीं पत्नीला म्हटलें, 'सगळ्या कोंवळ्या शेंगा तूंच घेतल्यास तर तिचं कसं होईल? सगळी भाजी खपायला नको का तिची?' माझ्या या प्रश्नाला हिटलर–मुसोलिनीप्रमाणें सौभाग्यवतीनें ताडकन् उत्तर दिलें, 'भाजी खाण्याकरितां करायचीय् मला! टाकून द्यायला नाहीं!' कवीनें सेनापतीला अगर गवयानें मोटरहांक्याला त्याच्या कामाविषयीं सल्ला देण्यांत फारसा शहाणपणा नसतो! अर्थात् मी गप्प बसलों.

मात्र अंग पुसतां पुसतां अनेक चित्रविचित्र कल्पना माझ्या मनांत येऊन गेल्या. साऱ्या भाजींतसुद्धां कोंवळ्या आणि जून शेंगा एकत्र नांदत नाहींत! मग जगांत पंचविशींतल्या तरुणांचें साठींतल्या वृद्धांशीं पदोपदीं बिनसावें यांत नवल कसलें? लगेच एक थट्टेखोर विचार मनांत आला–जुनें जाळा, पोळा, मोडा, तोडा, फोडा अशा अर्थाच्या कविता करणारांना गोवाऱ्यांच्या शेंगा ऊर्फ चिटक्या हा विषय किती छान आणि नावीन्यूपूर्ण आहे! बस्स! 'फेंकून द्या त्या जून शेंगा. कोंवळ्या लुसलुशीत शेंगाच आम्हीं खाणार. आम्हांला जुनें नको; नवें हवें! क्रांतीचा विजय असो!' अशा अर्थाची कविता किती आवेशपूर्ण होईल!

घरांत येतांच त्या कोंवळ्या लुसलुशीत शेंगांना हात लावण्याची इच्छा मला अनावर झाली ! राणीसाहेबांनीं सौदा तर छान केला होता ! अगदीं शम्पथेला जून शेंग नव्हती कुठें ! पण जगांत एकाचें सुख तेंच दुसऱ्याचें दुःख होतें. त्या भाजीवालीपाशीं साऱ्या जूनच शेंगा राहिल्या ! त्या आतां कोण विकत घेणार ? सारी भाजी खपली तर विचारीला दुपारीं पोटभर जेवायला मिळायचें ! आतां त्या जून शेंगा कुणी घेणार नाहीं–अरेरे !

बाकी परदुःख फार लवकर शीतळ होतें म्हणा !

थोड्या वेळानें बाजारांत कांहीं कामाला गेलों आणि पाहतों तों त्या भाजीवालीच्या साऱ्या शेंगा खपून गेलेल्या ! जग हा वेड्यांचा बाजार आहे, त्यांत वाटेल तें खपतें, असें मीं स्वतःचें समाधान करण्याचा प्रयत्न केला. पण इतक्या जून शेंगा कुणी कशाला विकत घेतल्या असाव्यात हें कांहीं केल्या कळेना मला ! कुतूहल म्हणजे अखंड किल्ली मिळालेलें गुदगुल्या करणारें यंत्रच असतें एक ! तें माणसाला थोडेंच स्वस्थ बसूं देतें ! मीं भाजीवालीला विचारलें, ‘ त्या जून शेंगा खपल्या का ? ’ हंसत हंसत तिनें उत्तर दिलें, ‘ तुमच्यापेक्षां एक पैसा अधिक मिळाला कीं ! शेंगा मात्र तेवढ्याच होत्या हं ! ’ तहान भागविण्याकरितां एखादें पेय प्यावें आणि त्यानें ती उलट वाढावी तसें झालें. जून चिटक्या महागाईनें घेणें म्हणजे कांहीं दांडीयात्रेला निघणें, बंदिवासांतून सुटका करून घेण्याकरितां भर समुद्रांत उडी टाकणें अगर एखाद्या प्रतिभासंपन्न कृतीनें नोबेल प्राइज मिळविणें, अशांपैकीं अद्भुततेची छटा असलेली गोष्ट नव्हे ! पण त्या जून गोवाऱ्या कुणी घेतल्या हें त्या भाजीवालीला मीं शेवटीं विचारलेंच. माझें आश्चर्य द्विगुणित झालें. आमच्या शेजारच्या घरींच स्वागत झालें होतें त्यांचें !

घरीं येऊन बायकोला चकित करण्याकरितां मीं ही ताजी बातमी सांगितली. पण तिनें शांतपणानें उत्तर दिलें. ‘ गोवाऱ्यांतल्या बिया कचकन् फोडतां आल्या तरच भाजी खाल्ल्यासारखं वाटतं त्यांना ! जून शेंगा म्हणजे अगदीं अप्रुवाईची गोष्ट मानतात तीं माणसं ! ’

तीं माणसें ! म्हणजे आमची गणना कशांत होते ? इतक्या जून–जरवट शेंगा खाणारांची राहणी अगदीं रानटी असेल म्हणावें तर तेंही खरें नव्हतें. त्यांच्या घरचीं पातळें आमच्याइतकींच तलम असत आणि फेब्रुवारी सुरू झाला कीं मलमलीचे सदरे शिवायचें काम दरवर्षी शिंप्याला त्यांच्याही घरून मिळे.

दुपारीं भाजींत मीठ कमी पडल्याची तक्रार करीत असतांना पलीकडच्या घरची मंडळी जून शेंगांची भाजी कशी खात असतील हा विचार माझ्या मनांत आल्यावांचून राहिला नाहीं. मग मात्र माझें मलाच हंसूं आलें. त्या घरच्या माणसांच्या आवडीनिवडी आमच्यासारख्याच असल्या पाहिजेत असें गृहीत धरल्यामुळें मी इतका गोंधळांत पडलों होतों ! पण त्या तशाच कां असाव्यात ? अगदीं निराळ्या असल्या म्हणून कुणाचें काय बिघडलें ? गोवाऱ्यांच्या शेंगांची चव म्हणजे वात्सल्य अगर प्रणय यांच्यासारखी कांहीं एखादी नैसर्गिक भावना नव्हे कीं उत्तर ध्रुवावरील एस्किमोपासून न्यूयॉर्कमधील सौंदर्यराज्ञीपर्यंत अगर पुण्यांतील सनातन्यापर्यंत तिचा सर्वांना सारखाच अनुभव आला पाहिजे. 'भिन्नरुचिर्हि लोकः' या सूत्रावरच तर साऱ्या सृष्टीची उभारणी झाली आहे !

भर उन्हाळ्यांत हापूसच्या आंब्याची फोडसुद्धां न उष्टावणारी माणसें कांहीं दुर्मिळ नाहींत. ऐन दुपारीं आकाश रखरखीत निखाऱ्यांचा वर्षाव करीत असतांना फिरायला जाणाऱ्या व्यक्तीही अनेकांनीं पाहिल्या असतील. गंधर्व मंडळीचें स्वयंवर नाटक बघणें अशक्य झाल्यामुळें अर्ध्या नाटकावरून उठून गेलेले एक रसिक माझ्या माहितीचे आहेत. सिंक्लेअर लुइसची 'Babbit' ही कादंबरी पन्नास पानांपुढें वाचणें माझ्या एका पदवीधर मित्राला अगदीं असह्य झालें होतें. एका उपवधू कुमारानें सल्लागार म्हणून मला आणि दुसऱ्या एका स्नेह्याला वधूपरीक्षेकरितां आपल्याबरोबर नेलें होतें. वधूच्या घरच्या फराळाचे ढेंकर दिल्यानंतर, एकाच्या मताचा दुसऱ्यावर परिणाम होऊं नये म्हणून त्यानें आम्हां दोघांनाही आपलीं मतें लिहून चिठ्ठ्या द्यायला सांगितल्या. परीक्षेच्या भापेंतच निकाल द्यायचें ठरलें. मोठ्या उत्सुकतेनें भावी वरराजांनीं माझी चिठ्ठी पहिल्यांदा उघडून वाचली. 'पहिल्या वर्गांत पास. गुण शेंकडा पासष्ट.' दुसरी चिठ्ठी बोलती झाली—'नापास. शिकस्त शेंकडा वीस मार्क !' आम्हां तिघांचेही चेहरे त्या वेळीं पाहण्याजोगे झाले होते. पण प्रत्येकाला त्यांपैकीं दोनच दिसत होते हें त्यांतल्या त्यांत भाग्य म्हणायचें !

रुचीची अगर अभिरुचीची ही भिन्नता सर्व काळीं, सर्व स्थळीं आढळते. पण वैचित्र्य हा जीवनाचा आत्मा आहे या गोष्टीइतकें दुसऱ्या कशाचेंच मनुष्याला विस्मरण होत नसेल ! या विचित्र विस्मरणामुळेंच एका क्षणांत विझून जाणारीं धर्मभेदांचीं अग्निकुंडें शतकानुशतकें भडकत राहिलीं आहेत. क्रूसपुढें नम्र

होणाऱ्या त्रिशूळाची थट्टा करावीशी वाटते ! विष्णूनें मोहिनीरूप धारण केल्याची कथा ऐकून आनंदानें नाचणारे डोळे मेरी कुमारी माता होती हें ऐकतांच मिस्किल-पणानें हंसूं लागतात ! कालिदास भवभूतीसारख्या भिन्नभिन्न प्रतिभावंतांचे भक्त आपल्या दैवतांचें काव्यबिम्ब सर्व कांहीं विसरून एकमेकांवर गालिप्रदान करण्यांत निमग्न होतात ! लहनशा कारणानें जातीजातींत दंगे होतात आणि वर्तमानपत्रें रटाळ मजकुरानें व दवाखाने जखमी झालेल्या लोकांनीं भरून जातात !

एका हिमालयांतून निघालेल्या गंगा व सिंधु ! त्यांचे उगम किती जवळ जवळ आहेत. पण मुखें ? कुठें बंगालचा उपसागर आणि कुठें आरबी समुद्र ! हें दिसत असूनही मनुष्य स्वतःच्या कोत्या जगांत इतका गुरफटून गेलेला असतो कीं बाहेरच्या जगानें आपल्या मनांतल्या गाण्याचा एकसारखा ताल धरावा असें त्याला वाटतें. तो धरला नाहीं कीं जग बेताल झालें म्हणून आरडाओरड करायला केलीच स्वारीनें सुरुवात ! कोंकण पाहायला येणाऱ्या पाहुण्यांपैकीं ' इथं घाम फार येतो ' म्हणून कुणी कुरकुर केली कीं मी त्याला ताजें आडसर खायला देतों. शहाळ्यांतल्या गोड पाण्याची मिटक्या मारीत तो तारीफ करूं लागला कीं मी हळूच म्हणतों, ' ज्या हवेमुळं इथं सारखा घाम येतो त्याच हवेनं हें पाणीही गोड होतं हं ! ' काश्मीरांत शेगडी पोटाशीं धरली नाहीं तर कुडकुडून मरायला होण्याइतकी थंडी पडते म्हणे ! पण तेवढी थंडी पडते म्हणून तर तिथें नंदनवन फुलतें. उद्यां काश्मीरची हवा राजपुतान्यासारखी झाली तर आगगाड्यांनीं फुकट प्रवासाच्या योजना जाहीर केल्या तरीसुद्धां कुणी प्रवासी या विख्यात भूमीकडे ढुंकून पाहायचा नाहीं.

एकच प्रवास पायांनीं, सायकलनें, बैलगाडींतून आणि मोटरीनें केला कीं वैचित्र्याची मोहिनी सहज कळून येते. आगगाडीच्या खिडकींतून बाहेर डोकावून पळणाऱ्या झाडाझुडपांकडे पाहण्यांत मौज आहेच आहे. पण आगबोटीच्या कठड्यावर क्षणोक्षणीं रेलून, गदगदा हलविल्या जाणाऱ्या जल-लतिकांचा फुलोरा पाहण्याचा आनंद जितका भिन्न तितकाच आकर्षक नाहीं का ? विमानांत बसून पांखराप्रमाणें जगाकडे पाहण्यांत खूपखूप गंमत असली पाहिजे हें आतां लहान मुलालाही पटतें. पण पाणबुडींतून प्रवास करतांना अगर खोल खाणींत उतरतांना मनाला होणाऱ्या गुदगुल्या कांहीं कमी कौतुकाच्या नसतील.

विमानें आणि पाणबुड्या यांच्यासारख्या दूरच्या गोष्टी कशाला हव्यात? नुसत्या पायीं चालण्यांत सुद्धा वैचित्र्याचा आनंद भरपूर मिळतो. लष्करी शिपायाप्रमाणें केलेली रपेट आणि एखाद्या लहान मुलाचें बोट धरून विहिणीप्रमाणें टाकलेलीं पावलें या दोन्हींतही सुख आहे. डोंगरावरील खडकांतून मेंढराप्रमाणें पटापट उड्या मारीत उतरणें आणि समुद्रकांठच्या मऊमऊ वाळूंत कुरल्यांसारखें भुर्रकन धांवणें या दोन्हींतही किती मौज वाटते! चालण्यापेक्षांही पोहण्यांत वैचित्र्याचा अनुभव अधिकच प्रत्ययाला येतो. उताणें पडून, पाण्यांत बुडून, एका कुशीवर राहून, हात वर्तुळाकार फिरवून कितीतरी तऱ्हांनीं पोहतां येतें. सुंदर काव्याप्रमाणें पोहण्यांतही क्षणाक्षणाला आनंद नवीन रूप धारण करतो यांत संशय नाहीं.

जगांतल्या लहानसहान वस्तूंतही लपलेल्या मधुर आनंदाचीं हीं अनंत रूपें ओळखतां आलीं तर जीवन आकर्षक होण्याला विलंब का लागणार आहे? पण आपल्या स्वतःच्या आवडीपेक्षां निराळी मुद्रा धारण करून आनंदाची मूर्ति आली कीं माणसाच्या कपाळाला आंठ्याच पडतात. ऊन पाण्यानें आंघोळ करण्याची संवय असणाराच्या अंगावर, थंड पाणी पाहूनच कांटा उभा राहतो! उन्हाळ्याच्या दिवसांत दमून घामानें ओलेचिंब झाल्यावर नदीच्या डोहांत उडी मारण्याचा आनंद त्यानें अनुभवलेलाच नसतो! गुलाबाचे फुललेले ताटवे रमणीय दिसतातच! पण जास्वंदीला लटकलेलीं फुलें काय कमी शोभिवंत असतात? प्रोफेसर फडके आणि डॉक्टर केतकर यांचें लेखन मी आजपर्यंत सारख्याच उत्सुकतेनें वाचत आलों याचें कारण तरी हेंच नाहीं का?

असें असूनही जून गोवाऱ्यांच्या शेंगा माणसें कशीं खातात याचें आश्चर्य मला वाटलें हें मात्र खरें! सामान्य मनुष्यानें आपलें मन कितीही मोठें केलें तरी जग त्याच्यापेक्षां अनंत पटींनीं विशालच असतें. तथापि प्रत्येक नव्या अनुभवाला तरी आपल्या मनांत आपण सहानुभूतीनें जागा द्यायला हवी! बस्स! ठरलें! उद्यां मुद्दाम जून चिटक्या घेऊन त्यांची भाजी करायला सांगायचें!'

मन व्यापक करण्याचा माझा हा अभिनव उपक्रम मीं पत्नीला सांगतांच ती म्हणाली, 'करायला काय जातंय् माझं? पण पैज लावतें हवी तर. ती भाजी खाऊन दाखवावी आपण! आज भाजींत थोडंसं मीठ कमी पडलें तर—'

या 'तर' नेंच जगांतल्या साऱ्या तत्त्वज्ञानाला पांगळें करून सोडलें आहे!

१९३७

# एक पैसा

१७

माझ्या मित्राचा तो लेख उलट टपालानें पाठविण्यासाठीं मीं लगेच वाचला आणि बुकपोस्ट करण्याकरितां तो गुंडाळूं लागलों. त्याच्यावरचा कागद अर्धवट फाटलेला असा पलीकडेच पडला होता. मीं तो सहज उचलून पाहिला. तीन पैशांचें तिकिट होतें त्याच्यावर !

लेख गुंडाळतां गुंडाळतां खिडकींतून सहज बाहेर दृष्टि गेली. मुसळधार पाऊस पडत होता नुसता ! आकाशाचा चेहरा पुनः पुनः काळवंडे आणि तावा-तावानें उच्चारलेल्या शिव्याशापांप्रमाणें पावसाच्या धारा कोसळत ! क्षणभर स्वारीचा राग निवळला असाही भास होई. पण पुन्हां ये रे माझ्या मागल्या. त्याच काळ्याकुट्ट आठ्या आणि तेच ताडताड शब्द !

कुठल्याही अलौकिक दृश्यांत मनुष्याला कवि करण्याचें सुप्त सामर्थ्य असावें ! नाहीं तर टीचभर दोऱ्यानें चार कागद गुंडाळीत बसलेल्या माझ्या मनांत पर्जन्याच्या रजतरज्जूंनीं स्वर्ग पृथ्वीला आपल्याकडे ओढीत आहे अशी कल्पना कां यावी ? रुद्राला प्रलयकाळची अधिदेवता मानणाऱ्या पौराणिक संकेताचें सौंदर्यही याच वेळीं मला प्रचीत झालें. मधून काळें, मधून पांढरें दिसणारें आकाश नव्हतें तें ! भस्मचर्चित कृष्ण जटांनीं अलंकृत झालेल्या भगवान शंकराच्या मस्तकाचा भास होत होता तिथें ! सळसळ खालीं कोसळणाऱ्या त्या काय पर्जन्यधारा होत्या ? छे ! शंकरानें कंठांत धारण केलेल्या सर्पांच्या माळाच असाव्यात त्या ! त्यामधून लखकन् चमकणारी ती वीज ! शंकराच्या तृतीय नेत्राची उघडझांप अशीच असायची !

पण या जगांत काव्याला हां हां म्हणतां व्यवहाराची दृष्ट लागते. नववधूनें वडील माणसांचा डोळा चुकवून स्वारीला गोविंद विडा देण्याकरितां यावें आणि खाशांनीं आंबट तोंडानें आमटी खारट झाल्याची तक्रार करावी असें नेहमींच घडतें. आतांही तसेंच झालें. मी जो लेख पाठवीत आहें तो या पावसानें भिजला तर ? एकदम हा प्रश्न माझ्यापुढें उभा राहिला. या पावसांत एका

पातळ कागदाच्या मलमली सदऱ्यापेक्षां त्याच्या अंगावर अधिक कांहीं तरी असणें जरूर आहे हें मला पटलें. एक जुनें वर्तमानपत्र घेऊन त्याचा ओव्हर-कोटच चढविला मीं त्याच्या अंगावर !

लेख बांधून झाला. पण एक शंका मनांत उभी राहिली. आतां या बुकपोस्टाला तीन पैशांचें तिकिट चालेल का ? घरांत वजनाचा कांटा नाहीं. रविवार असल्यामुळें पोस्टांतही वजन करण्याची सोय नाहीं. या ओव्हरकोटामुळें त्या लेखाचें वजन वाढलें तर आहेच. मग तीन पैशांऐवजीं चार पैशांचें तिकिट लावूनच द्यावा तो पोस्टांत टाकून. उगीच एका पैशाकरितां—

एका पैशाकरितां मी किती वेळ विचार करीत होतों हें आतां इतरांना तर खरें वाटणार नाहींच ! पण खुद्द मलाच माझ्या त्या मनःस्थितीचें आश्चर्य वाटतें. मात्र एक तीन पैशांचें तिकिट व एक चार पैशांचें तिकिट समोर ठेऊन, जगावें कीं मरावें याचा विचार करणाऱ्या हॅम्लेटप्रमाणें मी कितीतरी वेळ त्यांच्याकडे पाहत होतों खरा ! शेवटीं जोहार करणाऱ्या रजपुताच्या आवेशानें मी त्या बुक-पोस्टाला तीन पैशांचें तिकिट लावून लगेच तें पोस्टांत टाकण्याकरितां पाठवून दिलें.

तुम्ही म्हणाल, आपल्या चिक्कूपणाचें इतकें रसभरित वर्णन कशाला करतो आहे हा गृहस्थ ? पण मी चिक्कू नाहीं हीच तर यांतली मख्खी आहे. ज्याच्याकडे तो लेख पाठवायचा होता तो मित्र माझ्या घरीं आला असता तर त्याच्या आदरातिथ्याकरितां पांच सोडून दहा रुपये खर्च करायलाही मीं मागें-पुढें पाहिलें नसतें. बारीक अक्षर काढलें कीं पाकिटाचा मजकूर कार्डांत मावतो, ही युक्ति मीं पाहिली असली तरी तिचा अवलंब अद्यापि मीं कधींच केला नाहीं. अशीं पत्रें लिहिणें म्हणजे आपल्या स्नेह्यासोबत्यांना अकारण सूक्ष्मदर्शक यंत्राच्या खर्चांत घालणेंच नव्हे का ? पत्रानें काम भागण्यासारखें असतांना तार करण्या-इतका माझा उधळा स्वभाव ! पण त्या दिवशीं मात्र तें चार पैशांचें तिकिट लावायला कांहीं माझा हात पुढें झाला नाहीं.

मला वाटतें, ज्याला आपण मनुष्याचा स्वभाव म्हणतों तो असा एकजिनसी, एकरूप असतो ही कल्पनाच मुळांत थोडीशी चुकीची आहे ! शेषाला हजार डोकीं आहेत व तो आपल्या सहस्र मस्तकांवर पृथ्वी धारण करतो या जुन्या कल्पनेंत काय अर्थ आहे तें मला ठाऊक नाहीं ! बहुधा तें मनुष्याच्या मनावरील रूपकही

असावें ! तुम्हीच पाहा, मनुष्याला तरी एक मन आहे कुठें ? समुद्रावरल्या लाटांप्रमाणें त्याच्यांतही हजारों मनें एकसारखा पाठशिवणीचा खेळ खेळत असतात.

प्रत्येक मनुष्य आपल्या आयुष्यांत एक चटकदार कादंबरी लिहूं शकेल असें म्हणण्याचा तरी अर्थ हाच नाहीं का ? डोक्यावर इरलें घेऊन मुसळधार पावसांत शेतांत नडणी करणाऱ्या अशिक्षित बाईचें जीवन अथवा काळा झगा घालून शेंकडों विद्यार्थ्यांसमोर घरीं पाठ केलेलें प्रवचन करणाऱ्या पंडितांचें आयुष्य बाह्यतः किती रुक्ष-अगदीं कायम ठशाचें दिसतें. क्षणोक्षणीं पालटणारें, आनंदानें फुलणारें आणि दुःखानें कोमेजणारें, कुणाला कल्पनाही नसेल अशा कोलांट्या घेणारें असें जर माणसाचें मन नसतें तर अशा माणसाचें आयुष्य हा यंत्रशास्त्रावरील ग्रंथ झाला असता एक. पण शेतकऱ्याच्या दरिद्री झोंपडींतही नवरस नाचतात आणि प्रोफेसराच्या काळ्या झग्यांतूनही फुलपांखरांचे थवे बाहेर पडतात ! मनुष्याच्या बहुरूपी मनाचीच ही किमया आहे. नाहीं का ?

आणि म्हणूनच कुणी शांत स्वभावाबद्दल मला शिफारसपत्र दिलें कीं मी मनांतल्या मनांत हंसतों ! लहानपणीं थोरल्या भावाबरोबर आपल्या गांवाला नेत नाहींत असें कळतांच मीं विहिरीच्या कांठावर आंत पाय सोडून बसलों होतों, हें त्या बिचाऱ्याला कुठें ठाऊक असतें ? लहानपणींची गोष्ट तरी कशाला हवी ? अगदीं १९३७ ची घ्या. हा लेख लिहायला बसलों त्याच्या आधीं घटकाभर घडलेलीच मजा पाहा ना ! मीं माझ्या खोलींत येऊन दार लावून घेतलें. इतक्यांत बाहेरून कुणी तरी चहाची आठवण केली. मीं एकदम उत्तर दिलें, ' आतां नकोय चहा मला ! ' हें काय शांतपणाचें लक्षण ? सुप्त ज्वालामुखीचे कढ पृथ्वीलाच जाणवतात, त्याच्या पृष्ठभागावरील द्राक्षाच्या मळ्यांत फिरणाऱ्या माणसांचीं तोंडें गोड व्हायला कांहींच हरकत असत नाहीं, हें मनुष्याच्याही बाबतींत नेहमींच अनुभवाला येतें.

या अनेक मनांमुळेंच कुणाही माणसाविषयींच्या आपल्या कल्पना थोड्याफार चुकीच्याच ठरतात ! डोक्यावर कर्जाचा डोंगर असून मान लवभरही न लववणारा आणि हितशत्रूंच्या वाग्बाणांनीं आनंदित होणारा एक गृहस्थ मला नुकताच भेटला ! सहज मागच्या गोष्टी सांगतां सांगतां तो म्हणाला, 'मी एकदां

आत्महत्या करायला गेलों होतों !' 'स्वप्नांत काय वाटेल तें दिसतं.' मी म्हणालों. 'स्वप्न नाहीं, अगदीं सत्यकथा आहे ही ! सावत्र आईनं पांच रुपये चोरल्याचा आळ घातला माझ्यावर ! कांहीं केल्या झोंप येईना मला त्या रात्रीं. जीव द्यायला म्हणून मध्यरात्रीं नदीवर गेलों—'

साध्या मनुष्याचें आयुष्यही कादंबरीसारखें रंगूं लागलें तें असें ! मानवी संस्कृतीचीं आणि आयुष्यांतल्या अनुभवांचीं विविध पुटें वर बसल्यामुळें प्रत्येक मनुष्य आपल्याला विशिष्ट स्वभावाचा वाटतो खरा ! पण प्रत्येकाच्या आयुष्यांत कांहीं क्षण असे येतात कीं त्यावेळीं सुधारणेच्या सुंदर वस्त्रांचा संभार दूर राहतो आणि मनुष्याचें खरेंखुरें स्वाभाविक रूप प्रगट होतें. अर्थात् हें रूप रानटी असतें हें सांगायलाच नको. नाहीं तर चित्रपट पाहायला अगर प्रवास करायला चार मित्र असल्याशिवाय ज्याला गंमत वाटत नाहीं, त्या मनुष्यानें पोस्टाच्या तिकिटांत एक पैसा वांचविण्याचा प्रयत्न कशाला केला असता ?

एक मोठे सत्यनिष्ठ गृहस्थ आहेत. मराठी भाषेचा कोश करण्याचें काम त्यांच्याकडे दिलें तर 'सत्य,' 'तत्त्व,' 'ध्येय,' 'शास्त्र,' 'तर्क,' 'बुद्धिवाद' वगैरे शब्दांनींच तो ते भरून काढतील. लक्ष्मीला पसंत पडणाऱ्या धंद्यांत पडल्यामुळें तर त्यांची तत्त्वनिष्ठा अधिकच खुलून दिसते ! परवां या गृहस्थांना एका शाळेच्या संमेलनांत बोलण्याचा प्रसंग आला. शाळा चार पांच गृहस्थांनीं काढली होती. त्यांतील प्रमुखांशीं कशामुळें तरी बिनसलें होतें याचें ! उरलेल्यांपैकीं एक होते त्यांचे जीवश्चकंठश्च मित्र ! बाकीचे आपले साधारण ओळखीचे ! भाषणांत शाळेच्या संस्थापकाचा उल्लेख करण्याची वेळ आली. तेव्हां या आधुनिक युधिष्ठिरानें आपल्याशीं रहस्य नसलेल्या प्रमुख मनुष्याचें नांव अजिबाद गाळून टाकलें, आपल्या मित्राचें नांव अभिमानानें उच्चारलें आणि पक्षपाताचा आरोप येऊं नये म्हणून त्याला 'वगैरे' या शब्दाची जोड दिली ! जगांत सत्यनिष्ठ लोकांकडूनच सत्याचें किती सहजासहजीं विडंबन होऊं शकतें ! मनुष्यांतल्या रानटी मनानें थोडीशी हालचाल केली कीं वरचीं सुधारणेचीं तलम वस्त्रें हां हां म्हणतां फाटून जातात हेंच खरें !

पंचपतिव्रतांत गणना होणाऱ्या सीता-द्रौपदीच्या कथा तरी हेंच दर्शवीत नाहींत काय ? मायावी राक्षसाच्या हांका ऐकूनही लक्ष्मण जाईना, तेव्हां सीतेनें

त्याच्याविषयीं भलताच संशय घेतला अगर द्रौपदीच्या मनांत कर्णाविषयीं अभिलाष उत्पन्न झाला इत्यादि वर्णनें मानवी मनाचें यथार्थ स्वरूप चित्रित करतात ! मनुष्याचें मन हा अनंत नद्यांचा सागर आहे. तें चित्रविचित्र रंगांनीं रंगलेलें चित्र आहे ! व्हिक्टर ह्यूगोच्या Les Miserables कादंबरींतील नायकाप्रमाणें तें पोटाकरितां पावाच्या तुकड्याची चोरी करील, शिक्षा भोगीत असतांना प्राणाची पर्वा न करतां पळून जाईल, संकटांत आश्रय देणाऱ्या मनुष्याच्या घरींच चोरी करील आणि आपल्या चोरीकडेही आईच्या प्रेमळ दृष्टीनें पाहणारें हृदय दिसतांच पश्चात्ताप पावून इतका त्याग करील कीं तो पाहून साधुसंतांनींही आश्चर्यचकित व्हावें.

याचा अर्थ मानवी मन निव्वळ लहरी आहे असा नाहीं ! त्याच्यांतले देवदानव कसे जागृत होतात, त्यांच्या तुमुल युद्धांत अनेकदां राक्षसांचाच विजय कां होतो, किंबहुना मानवी मनांतल्या राक्षसांचें निर्मूलन करण्याची कल्पना व्यवहारापेक्षां काव्यांतच अधिक शोभणारी आहे किंवा नाहीं इत्यादि प्रश्नांचीं उत्तरें समाजशास्त्र व मानसशास्त्र यांतील तज्ज्ञांनींच दिलेलीं बरीं !

तिकिट लावतांना एका पैशाची बचत करूं पाहणारें माझें मन अगदीं अस्सल राक्षस कुळांतील नसेल ! पण त्याला निदान सातव्या आठव्या दर्जाच्या एखाद्या भुतानें तरी पछाडलें असावें खास !

मात्र शास्त्रीय दृष्टीला माझ्या त्या क्षणिक क्षुद्रपणाचें समर्थन करतां येणारच नाहीं असें नाहीं. मी चिक्कू नसेन पण माझ्या पणजोबाचे खापरपणजोबा तिमाजी नायकांचे परात्पर गुरु शोभण्याइतके कृपण असतील. माझी ती आनुवंशिकता तर त्या क्षणाला जागृत झाली नसेल ना ? त्या दिवशीं पावसामुळें माझें फिरणें चुकलें होतें. त्या कंटाळलेल्या मनःस्थितीमुळेंही मला त्या एका पैशाचा मोह उत्पन्न झाला असेल ! नाहीं कुणी म्हणावें ? कदाचित् छे ! बहुधा—माझ्या सुप्त मनांत त्या मित्राविषयींचा कसला तरी राग, हिरवळींत लपून बसणाऱ्या जिवाणूप्रमाणें दडून राहिला असेल.

अरे हो ! आतां आठवलें सारें ! मागें मी मुंबईला गेलों होतों तेव्हां बंदरावर यायचें कबूल करूनही स्वारीनें गुंगारा दिला होता मला ! त्याचा सूड—

रानटी मनुष्याला बाणांचा उपयोग केल्याशिवाय कुणाचाही सूड घेणेंच शक्य नव्हतें. पण आतां विसाव्या शतकांत जग इतकें सुधारलें आहे कीं बाणांचें काम न लावलेलें पैशाचें तिकिटही करूं शकतें.

पण हा एका पैशाचा प्रश्न तरी कां उद्भवला? माझ्या मित्राचा लेख पावसांत भिजूं नये ही सद्भावनाच त्याच्या मुळाशीं नव्हती का?

०१.३७

# चांदण्यांत



सृष्टींतली सर्वांत सुंदर वस्तु कुठली याविषयीं एकमत होणें कठीण आहे असें प्रथमदर्शनीं प्रत्येकाला वाटतें. प्रवेशपरीक्षेला बसणाऱ्या पांचपन्नास विद्यार्थ्यांचेंच काय तें संस्कृत चांगलें असतें. प्रण जगन्नाथ शंकरशेट शिष्यवृत्ति कित्येक वेळां दोनदोन विद्यार्थ्यांत वांटण्याची पाळी येतेच कीं नाहीं ? निसर्ग म्हणजे तर नावीन्याचें निधान, भव्यतेचें भांडार, सौंदर्याचा सागर, रमणीयतेचा रसनिधि ! निसर्गांतल्या विविध वस्तूंतलें वैचित्र्यही इतकें सौंदर्यपूर्ण असतें कीं त्यांची एकमेकांशीं तुलना करणें रसिक मनाला हास्यास्पद वाटल्यावांचून राहत नाहीं. फुललेला वटमोगरा आणि भरतीच्या लहरींनीं फेंसाळणारा समुद्र यांत अधिक रम्य काय आहे हें कसें ठरवायचें ? तारकांनीं शोभणाऱ्या आकाशाच्या विस्तीर्ण वेलापेक्षां एखादें चिमणें फुलपांखरूच अधिक मोहक दिसतें असें म्हणणाऱ्याला काय तुम्हीं वेड्यांतच काढाल ? प्रातःकाळ आणि सायंकाळ यांना तर कवींनींच देव्हाऱ्यांत बसविलें आहे. पण मध्यान्ह आणि मध्यरात्र स्वभावानें इतकीं रंगेल नसलीं तरी त्यांच्या शांत गांभीर्यांतही तेवढीच मोहकता असते असा माझा अनुभव आहे.

जों जों अधिक विचार करावा, तों तों हा प्रश्न अधिकच विकट आहे असें मनाला वाटतें. पण खरें पाहिलें तर तो मुळींच तसा नाहीं ! एखाद्या उखाण्याचें उत्तर अगदीं सोपें असतें. नेहमीं डोळ्यांपुढें असणारी एखादी वस्तु असते ती ! पण अतिपरिचयामुळें तें उत्तर आपल्याला सुचतच नाहीं ! तसेंच याही बाबतींत होतें. समुद्रमंथनांतून देवदानवांनीं सौंदर्याचें सारसर्वस्व धारण करणाऱ्या किती तरी वस्तु बाहेर काढल्या—लक्ष्मी, पारिजात, कामधेनु, अप्सरा, अमृत. मग रमणीयतेचीं हीं सर्व रूपें ज्याच्यांत समरसतेनें एकवटलीं आहेत, त्याला सौंदर्याच्या सिंहासनावर अभिषेक करायला काय प्रत्यवाय आहे ?

तुम्हीं म्हणाल, ' पुरे झाला हा लपंडाव. नांव सांगा कीं त्या वस्तूचें. ' कुठलें नांव सांगावें हीच तर पंचाईत पडली आहे मला ! म्हणजे लोकांनीं तिला

एकसारखीं नांवें ठेवल्यामुळें नांवांची संख्या वाढली आहे असें नाहीं हं ! आई आपल्या बाळाला किती नांवांनीं हांक मारते ? राजा, चिमण्या छकुल्या, सोनुल्या–सृष्टिमातेनेंही आपल्या या लडिवाळाचें कौतुक करतांना त्याला इतक्या विविध नांवांनीं आळविलें आहे कीं–चंद्रमा, इंदु, सोम, हिमकर, सुधाकर, शशांक, रजनीनाथ, तारापति ! लहानपणीं अमरकोशाचें भारी भय वाटत असे मला ! माझ्याप्रमाणेंच धास्ती घेतलेले अनेक लोक असतील. तेव्हां ही यादी इथेंच पुरी करणें बरें ! नाहीं ?

माझी चंद्राची निवड अनेक सोंवळ्या वाचकांना पसंत पडणार नाहीं हें मी जाणून आहें. ते एकमेकांकडे डोळे मिचकावून तोंडांतल्या तोंडांत कांहीं तरी पुटपुटतील, कुठल्या तरी पुराणांचीं नांवें उच्चारतील आणि म्हणतील, 'छीः ! डाग लगलाय् त्याला ! छे छे ! असल्या कलंकित वस्तूला सौंदर्याच्या सिंहासनावर बसवावयाचें ? अब्रह्मण्यम् !' बिचाऱ्यांना कल्पनाही नसेल कीं हा कलंक हेंच चंद्राचें सर्वांत मोठें भूषण आहे. विश्व निर्माण झालें तेव्हां सर्व वस्तूंना चंद्राचा अतिशय मत्सर वाटूं लागला ! मग आपल्या लाडक्या राजाला दृष्ट लागूं नये म्हणून सृष्टिमातेनें त्याची दृष्ट काढून तीट लावली ही त्याला ! सर्वांच्या मत्सराचा विषय होणें विषेश गुणावांचून शक्य तरी आहे का ? हवें तर सध्याच्या अनेक साप्ताहिकांना विचारा. ज्यांच्यावर वेळोवेळीं तीं अवास्तव टीका करतात तींच माणसें लोकांचीं अधिक आवडतीं असतात.

आमच्या रसिक संस्कृत कवींनीं चंद्राविषयींचे संकेतसुद्धां किती सुंदर कल्पिले आहेत पाहा. चंद्र हा मदनाचा सखा. तसें पाहिलें तर वसंत हा मदनाचा अधिक जिवलग मित्र आहे. पण चंद्र हाही बारा महिने हंसणारा मूर्तिमंत वसंत ऋतूच नाहीं का ? चतुर्थीचें चांदणें पृथ्वीला नवपल्लवांनीं नटवितें, तर पौर्णिमेचें चांदणें चराचराला वासंतिक धुंदीनें उन्मत्त करून सोडतें. दुसरा चंद्रकांताचा संकेत पाहा. चंद्रोदय झाला कीं चंद्रकांत पाझरूं लागतो. नुसत्या दर्शनानें दगडालाही पाझर फुटावा हा सौंदर्याचा केवढा मोठा विजय आहे ! घरांतल्या चिमण्या पाडसानें आपणहून दिलेला पापा, रमणीचें चोरून घेतलेलें चुंबन आणि आईनें अगर वडिलांनीं मायेनें पाठीवरून फिरविलेला हाताचा स्पर्श या सर्वांचा मनोहर संगम चांदण्यांत झालेला आहे यांत शंका नाहीं. चकोराचा संकेत सुद्धां कांहीं

कमी आकर्षक नाहीं. आकाशांतून पाझरणाऱ्या अमृताचें या ध्येयवादी पांखराला एवढें विलक्षण वेड असतें कीं पृथ्वीवरील सर्व गोष्टी तुच्छ मानून तो चंद्रिकेची आतुरतेनें मार्गप्रतीक्षा करीत असतो.

चकोराच्या या वेडाचें मला तरी हंसूं येत नाहीं. दिव्य सौंदर्याचें वेड म्हणजेच प्रतिभा. ज्याला चंद्रानें वेड लावलें नाहीं, असा कविच झाला नाहीं अजून ! शेले त्याचा फिक्कटपणा पाहून तो प्रेमविव्हल झाल्याचा तर्क करतो, तर कालिदास चंद्रावरील कलंकही त्याची शोभा वृद्धिंगत करतो म्हणून सांगत सुटतो. प्रिय माणसांचें सारेंच प्रिय वाटतें हें अशा वेळीं पूर्णपणें पटतें. माझ्यासारख्या गद्याळलेल्या मनुष्यानेंही 'चंद्रकोर नीरांजन, लावि रजनि चपल चरण' असें भाऊबीजेच्या चंद्रकोरीचें परवां जातां जातां वर्णन केलें. मग कोल्हटकरांनीं मूकनायकांत अष्टमीच्या चंद्राची जी शोभा वर्णन केली आहे, ती किती बहारीची असेल ! 'चंद्र चवथिचा' किंवा 'चंद्र किं ग ढळला' हे अर्धेमुर्धे चरण सुद्धां संजीवनीमंत्रानें प्राणसंचार व्हावा त्याप्रमाणें आपलें मन अवर्णनीय सौंदर्यानें भारून टाकतात. मग मंदिराच्या खिडकींत बसलेली रमणी व आकाशांत चमकणारा चंद्र पाहून एका संस्कृत कवीला आपण मयसभेंत आहों असा भास झाला यांत नवल कसलें ? आकाशांतला चंद्र खरा कीं खिडकींतला चंद्र खरा यांचें कोडेंच पडलें त्याला ! इतक्यांत आकाशांतील चंद्राला ग्रहण लागलें. बिचारा खिडकीकडे आशेनें पाहतो तों केशकलापानें रमणीचा मुखचंद्रमाही झांकून गेलेला ! थोड्या वेळानें दोन्ही ग्रहणें सुटलीं पण त्यामुळें कोडें वेगळें सोडविण्याच्या कामीं त्या कवीला कांहीं फारसें साहाय्य झालें नसेल. श्यामसुंदर कादंबरींत आईला सोडून दूर गेलेला श्याम 'पौर्णिमेच्या दिवशीं तूं तेथून चंद्राकडे पाहत जा, मी येथून पाहत जाईन म्हणजे आपल्याला एकमेकांच्या भेटीचा आनंद होईल' असें जें लिहितो तें केवळ काव्य नाहीं. मानवी भावनांचा सृष्टींतला अगदीं जवळचा सखा चंद्रच आहे.

पुंडरीकाला भेटायला महाश्वेता अपरात्रीं तरलिकेसह गेली तेव्हां चंद्रानेंच तिला मार्ग दाखविला. लहानपणापासून आपण आवडीनें पाहिलेलें मृच्छकटिकच घ्या ना ! वसंतसेनेला घरीं पोंचविण्याकरितां दिवटीची जरूरी असते. पण चारुदत्ताचा नोकर म्हणतो, 'महाराज, घरांत तेलाचा एक थेंबही नाहीं. मग

दिवटी कसली पेटवूं ?' पण घर स्नेहशून्य झालें तरी चंद्र तसा होत नहीं. तो झटकन् वर येतो आणि दरिद्री चारुदत्त गाऊं लागतो—

रजनिनाथ हा नभीं उगवला
राजपथीं जणुं दीपचि गमला
नवयुवतीच्या निटिलासम किति
विमल दिसे हा ग्रहगण भोंवति
शुभ्रकिरण घन तिमिरीं पडति
पंकीं जेवि पयाच्या धारा

चंद्र लहानपणापासून प्रत्येकाचा मित्र असतो.

'चांदोबा चांदोबा भागलास का निंबोणिच्या झाडामागें लपलास का निंबोणिचें झाड करवंदी मानाचा वाडा चिरेबंदी' हें गाणें लहानपणीं मीं पाहिल्यांदा ऐकलें, तेव्हां निंबोण्यांचीं करवंदें करणाऱ्या या जादूगाराविषयीं मला विलक्षण प्रेम वाटूं लागलें. आपल्या संगमरवरी वाड्यांतून मामानें एकदां तरी खालीं यावें आणि मेतकुटानें कालवलेल्या गोड आटवलाचा माझ्या ताटांतला एक तरी गोड घांस खाऊन जावें म्हणून मी किती आशाळभूतपणानें त्याच्याकडे पाहत असें. पुढें खेळून उशिरां घरीं परततांना काळोखाचें भय मनांत येई, तेव्हां चंद्राची स्वारी आभाळांतल्या एखाद्या कोंपऱ्यांतून 'भिऊं नको' 'बाळ हो उगी,' असा धीर देत मला सोबत केल्यावांचून राहत नसे. माझ्या कॉलेजांतल्या दोन वर्षांत व्यावहारिक आपत्तींचीं भुतें मला अशीं भिववीत कीं कित्येकदां रात्रभर माझा डोळ्याला डोळा लागत नसे. अशा वेळीं खोलींतून बाहेर आलों कीं चंद्र आपल्या शीतल करांनीं मला गोंजारून म्हणे 'पाहा, जरा पलीकडे पाहा ! झाडांच्या सावल्यांशीं चांदणें कसें खेळत आहे. आयुष्यांतल्या आपत्तींशीं माणसानं असंच खेळायला नको का ?'

वाद्यांचा विलाप आणि भटांचे आलाप यांचें पार्श्वसंगीत सुरू झाल्यावर गोरज मुहूर्तावर माझें लग्न झालें. पण त्या वेळीं शांत चांदणी रात्रच भोंवतालीं पसरल्याचा भास झाला मला ! जीवनमार्गावरल्या सखीचीं माझीं अनेक सुखस्वप्नें खरीं झालीं. पण तीं पाहण्याकरितां

जळवलयाचे तरल रुपेरी नूपुर पदिं बांधुनी
खळखळत गुंग झरा नर्तनीं
पांढरा पारवा हूं हूं कोठें करी
क्षण मंद वायुनें लता हले कांपरी
जणुं शांतताच ही निःश्वसनातें करी
लपत छपत विधुकिरण खेळती हिरव्या पानांवरी

अशा गंधर्वसृष्टींत कांहीं जावें लागलें नाहीं मला ! माझ्या पत्नीच्या डोळ्यांतच चांदण्याचा झरा आहे हा शोध मला गृहप्रवेशाच्या वेळींच लागला. आतां तें चांदणें माझ्या मनांतलें होतें असें ती मुद्दामच तुम्हांला सांगेल. मीं तिला मुळींच विरोध करणार नाहीं. मात्र ' चोराच्या मनांत चांदणें ' या म्हणीची मी तिला हळूच आठवण मात्र करून देईन. मग पाहूं या–पाह्यला कशाला हवें ? चांदण्याला आपोआपच अधिक बहर येईल.

घरांत दोन चंद्रकोरी उदय पावल्यामुळें आतांशी आकाशांतल्या चंद्रकोरीकडे माझें मधूनमधून दुर्लक्ष होऊं लागलें आहे हें खरें ! पण वृद्ध शंकरानें त्याला आपल्या मस्तकावर आदरानें स्थान दिलें आहे हें कांहीं मी विसरलों नाहीं. कर्तृत्वाचें वय मागें पडलें कीं जगाकडून माणसाची उपेक्षा होऊं लागते. अहंकारानें ग्रस्त झालेल्या मनाला उतारवयांत ही उपेक्षा किती दुःसह होते हें मोठ्या लोकांच्या बाबतींत मीं पाहिलें आहे. अशा मनःस्थितींत चंद्रासारखा मनुष्याचें सांत्वन करणारा तत्त्वज्ञ कोणी नाहीं असें मला वाटतें. उगवत्या सूर्याची लोक पूजा करितात, मावळत्या सूर्याला भाविक अर्घ्यें देतात, पण अंधाराला शांतपणानें उजाळा देणारा चंद्र त्यांच्या खिजगणतींतही असत नाहीं. मध्यरात्री-नंतर आकाशांत हंसत हंसत प्रवास करणाऱ्या चंद्राचा मला कितीदां तरी हेवा वाटला आहे. अनेकदां मनांत येतें–आयुष्याचा असा प्रवास करणें मला कधीं तरी साधेल का ?

चांदण्याचा ऊन आणि पाऊस यांच्यासारखा जगाला प्रत्यक्ष उपयोग होत नसेल कदाचित् ! पण चंद्रावांचून जगाचें कधींच चालायचें नाहीं असें मला वाटतें. बुद्धिवादाचा कितीही उत्कर्ष झाला तरी शेवटीं भावनांनींच जीवनाला शीतलता लाभते. मोतिलाल आणि जवाहरलाल यांनीं हंसत हंसत कारागृहांत पाऊल

टाकल्याचीं वर्णनें रोमहर्षक आहेत; पण जवाहरलाल तुरुंगांत जाणार म्हणून आपल्या खोलींत जमिनीवर साध्या शेंदरीवर पडून राहिलेल्या मोतिलालांच्या मनाची जी तळमळ चालली होती ती त्या वर्णनापेक्षां कमी हृदयस्पर्शी आहे असें कोण म्हणेल? महर्षि कर्वे दशदिशा दणाणून सोडणारें वक्तृत्व करूं शकत नाहींत पण हिंगण्याच्या माळावरला प्रत्येक दगड त्यांनीं बोलका केला आहे तो काय भावनांच्या उत्कटतेवांचून? गांधीजींनीं दांडीयात्रेच्या वेळीं हातांत घेतलेला दंड आमच्या भारताला कुठल्याही राजदंडापेक्षां अधिक वंदनीय वाटतो तो उगीचच का? सेनापति बापट रस्ते साफ करण्याचें काम हंसतमुखानें करूं लागतात तेव्हां जनाबाईचें दळण विठ्ठलानें स्वतः दळल्याची अद्‌भुत कथा एका दृष्टीनें खरी आहे असेंच नाहीं का आपल्याला वाटत?

भावना हेंच जीवनांतलें चांदणें आहे. चंद्रिका मातीच्या घरावर संगमरवरी सौंदर्याचा साज चढविते आणि बाभळीच्या झाडाला नंदनवनांतील पारिजातका-इतकी मोहकता प्राप्त करून देते. नाहीं का? अमावास्येलाच सारी भुतावळ बाहेर पडते ही जुनी कल्पना कांहीं अगदीं अर्थशून्य नाहीं. चांदण्यांत पिशाच्चें बाहेर पडतील तर त्यांचें चटकन् यक्षगंधर्वांतच रूपांतर होईल.

मला एक विचित्र स्वप्न वारंवार पडत असतें. प्रलयाचें भयंकर दृश्य दिसतें त्यांत! गगनचुंबी गिरिशिखरें मातीला मिळत आहेत, आकाशांतल्या तारका दवबिंदूप्रमाणें टपटप खालीं पडत आहेत, राजमंदिरांचे आणि देवळांचे कळस, अजस्र विमानें आणि प्रचंड तोफा लांकडाच्या मोडक्या तुकड्यांप्रमाणें पाण्याच्या राक्षसी लाटांत पडत आहेत आणि बुडत आहेत—त्या दृश्यांतल्या भव्यतेपेक्षां भयानकतेचाच पगडा माझ्या मनावर अधिक बसतो. इतक्यांत कुठून तरी प्रेमळ शब्द येतात—' भिऊं नकोस. तुझ्या आवडीच्या एका वस्तूचें नांव घे. ती आणि तूं सुरक्षित राहाल. '

मी चटकन् चंद्राचें नांव घेतों.

स्वप्न खरें! पण त्यांत फार अर्थ भरला आहे असें तुम्हींसुद्धां म्हणाल. एका आंधळ्या म्हातारीनें नातवाच्या डोक्यावर छत्रचामरें पाहायला मिळावींत असें मागणें देवाजवळ मागितलें होतें ना? तशीच मागणी आहे ही! एका चंद्रामुळें साऱ्या सृष्टीचा पुनर्जन्म होऊं शकतो. त्याच्या किरणांत अमृत असतें या कल्पने-

मुळें नाहीं मी असें म्हणत. अगदीं तर्कशास्त्राच्या दृष्टीनें पाहा—प्रलयांतून चंद्र सुरक्षित राहिला म्हणजे सूर्याला काडीचाही धक्का पोंचणें शक्यच नाहीं. सूर्यावांचून चंद्र कसा प्रकाशूं शकेल ? सूर्यकिरणामुळें पृथ्वीवरील पाणी आकाशांत जाऊन मेघांचें रूप घेणार, योग्य वेळीं पाऊस पडणार, मग आपोआपच गवतापासून देवदारापर्यंत सर्व वनस्पती निर्माण होणार, इत्यादि इत्यादि भविष्य सांगायला कांहीं जोतिष्याची जरुरी नाहीं ! चंद्रामुळें सर्व निर्जीव सृष्टिच अशी निर्माण होईल असें नाहीं. माझ्यासारखा एक पुरुष एकलकोंडेपणानें पृथ्वीवर भटकत असलेला पाहून चंद्र अस्वस्थ होईल, मग मदन आपल्या मित्राच्या समाधानाकरितां या पुरुषाची सोबतीण म्हणून एक लावण्यमय रमणी निर्माण करील आणि मग—

मग पृथ्वीवर जिकडे तिकडे चांदणेंच चांदणें फुलेल.

१९३७

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रं. क्र. ६८२८
शाखा (स्थळ प्रत)
RFFBK-0006828

देशमुख आणि कंपनी,
१९१ शनिवार, पुणें २.

किंमत २ रुपये

वि. स. खांडेकर यांचीं
लघुनिबंधाचीं पुस्तकें

१ अविनाश
२ मंदाकिनी
३ कल्पलता
४ मंजिऱ्या
५ सायंकाल
६ तिसरा प्रहर
( छापत आहे )